
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२० | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### फेडरल रिझर्व्हमुळे शेअर बाजार विक्रमी उंचीवर



**मुंबई** : अमेरिकी फेडरल रिझर्व्हने चार वर्षांनंतर व्याजदरात केलेल्या कपातीचा जबरदस्त परिणाम देशातील शेअर बाजारांवर दिसून आला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने गुरुवारी विक्रमी उंचीवर झेप घेतली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २३६ अंकांनी उसळून ८३,१८४ या नवीन विक्रमी उंचीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने ८३,७७३ अंकांची झेप घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३८ अंकांनी वधारला व २५,४१५ या विक्रमी पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात निफ्टीने २५,६११ अंकांची पातळी गाठली होती.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आज वर्धेत

वर्धा : पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धेत शुक्रवार २० सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत स्वावलंबी मैदानावर सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे. या सोहळ्याला



पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, लघु, सूक्ष्म व मध्यम मंत्रालयाचे मंत्री जीतनराम मांझी, राज्यमंत्री जयंत चौधरी यांची उपस्थिती राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यानिमित्त प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देशभरातील कारागिरांच्या कलाकृतींचे प्रदर्शनही लावण्यात येणार आहे. कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती खरेदीसाठी उपलब्ध राहणार आहेत. सुरक्षेसाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### अमेरिकी कोर्टाचा भारताला समन्स

**नवी दिल्ली** : खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंतसिंग पन्नूच्या हत्येच्या प्रयत्नांच्या प्रकरणात अमेरिकी न्यायालयाने भारत सरकार, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना समन्स बजावला. या मुद्यावर भारताने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. न्यू यॉर्कच्या दक्षिण जिल्ह्याच्या न्यायालयाने भारत सरकार, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, रॉचे माजी सचिव सामंत गोयल यांना समन्स जारी केला आहे. हत्येच्या प्रयत्नातील आरोपी निखिल गुप्ता आणि विक्रम यादवलाही समन्स बजावण्यात आला आहे. पन्नूच्या हत्येचा कट रचल्याच्या आरोपात निखिल गुप्ताला झेक गणराज्याने मागील वर्षी अमेरिकेच्या विनंतीवरून अटक केली होती. झेक गणराज्याने जूनमध्ये त्याचे अमेरिकेला प्रत्यार्पण केले होते.

### प्रसिद्ध संगीतकार विपिन रेशमिया यांचे निधन

**मुंबई** : प्रसिद्ध पार्श्वगायक आणि संगीतकार विपिन रेशमिया यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते गायक हिमेश रेशमियाचे वडील होते. ८७ वर्षीय विपिन मागील काही दिवसांपासून मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमध्ये भरती होते. १८ सप्टेंबरला रात्री साडे आठ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांच्या पोटात दुखते

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा घणाघात
- हजारो महिलांच्या उपस्थितीत योजनेच्या लाभार्थींचा सन्मान



**बुलढाणा, १९ सप्टेंबर**

भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०४७ विकसित भारत संकल्पनेतून झाली आहे. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी केंद्र शासनाची 'लखपती दीदी जनधन योजना' त्याचप्रमाणे राज्य सरकारची 'लाडकी बहीण' या योजनेतून महिला सक्षमीकरण करणे तसेच बचत गटांना चालना देऊन बहिणींच्या आयुष्यात सुख-समाधानाचे दिवस येण्यासाठी महायुतीचे सरकार सक्षमपणे योजना राबवीत असताना विरोधकांच्या पोटात आता दुखत आहे. गेल्या ६० वर्षांत हप्ते घेणाऱ्या काँग्रेसच्या सरकारने राज्याचे व देशाचे वाटोळे केले, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केला.

आता लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी विरोधक न्यायालयात जात आहेत. परंतु ही योजना तसेच इतर सर्वसामान्यांच्या योजना बंद पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

बुलढाणा येथील शारदा ज्ञानपीठ मैदानावर 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना लाभार्थी सन्मान व महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमात ते आज गुरुवारी बोलत होते. व्यासपीठावर उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव, पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, आयोजक आ. संजय गायकवाड, आ. डॉ. संजय कुटे, आ. संजय रायमूलकर, आ. श्वेता महाले, आ. डॉ. राजेंद्र शिंगणे, आ. किरण सरनाईक, आ. वसंत खंडेलवाल, माजी आ. संचेती, खेडेकर यांसह पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आमचे सरकार देणारे आहे. हप्ते घेणारे नाही. याशिवाय शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याची योजना, लाडका भाऊ योजनेतून बेरोजगारांना रोजगार मिळून दहा हजार रुपये प्रशिक्षण भत्ता देण्यात येत आहे. उद्योगधंदे, रस्ते विकासाला दोन वर्षांत गती मिळाली आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलणार, आरक्षण धोक्यात येणार, अशा अफवा विरोधकांनी पसरविल्या.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी जम्मू-काश्मीरच्या रियासी जिल्ह्यातील कटरा येथे भव्य निवडणूक सभेला संबोधित केले. त्यानंतर त्यांनी केलेल्या रोड शोला देखील जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता

# तिरुपतीच्या प्रसाद लाडूंमध्ये जनावरांच्या चरबीचा वापर!

**हैदराबाद, १९ सप्टेंबर**

तिरुपती बालाजीच्या प्रसादाच्या लाडूंमध्ये जनावरांच्या चरबीचा वापर होत होता, असे म्हणत आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी माजी मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांच्यावर गंभीर आरोप केला. विशेष म्हणजे, या आरोपाच्या पुष्टीसाठी प्रयोगशाळेत लाडूची चाचणी करण्यात आली आणि लाडूमध्ये मासोळीचे तेल आणि बैलाची चरबी हे घटक असल्याचे निष्पन्न झाले.

या आरोपामुळे आंध्रप्रदेशात वाद निर्माण झाला आहे. तिरुमला तिरुपती देवस्थान हे जगभरात प्रसिद्ध आहे तसेच या ठिकाणी असलेले प्रसाद लाडू हे पवित्र मानले जातात.

**तपासणीत झाली पुष्टी**

चंद्राबाबू नायडू यांनी प्रसादाबाबत केलेला दावा सप्रमाण असून, या लाडूची प्रयोगशाळेत चाचणी करण्यात आली. त्याच्या अहवालानुसार, या प्रसादात मासोळीचे तेल आणि बैलाची चरबी सापडल्याचे वृत्त आहे. या अहवालाने चंद्राबाबूंच्या आरोपांना बळ मिळाले आहे. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्सच्या जाहीरनाम्यावर पाकिस्तान खूश

### पंतप्रधान मोदी यांचा घणाघात

**कटरा, १९ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यावर पाकिस्तान प्रचंड खूश आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केला.


काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स आघाडीचे पाकिस्तानात कौतुक केले जात आहे. पाकिस्तान त्यांच्या जाहीरनाम्यावर प्रचंड खूश आहे आणि उघडपणे या आघाडीला पाठिंबा दिला, असे मोदी यांनी कटरा येथील प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले.

पाकिस्तानच्या संरक्षणमंत्री उघडपणे काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सला पाठिंबा देण्यासाठी समोर आले. त्यांचा आणि पाकिस्तानचा अजेंडा सारखाच आहे. काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्सला जम्मू-काश्मिरात पाकिस्तानचा अजेंडा राबवण्याची इच्छा आहे, अशी टीका मोदी यांनी केली. काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सला आज कुणीही महत्त्व देत नाही. मात्र, पाकिस्तान त्यांच्यावर खूश आहे, असे मोदी म्हणाले.

५ ऑगस्ट २०१९ रोजी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० राष्ट्रपतींच्या आदेशाच्या माध्यमातून निष्प्रभ केले होते. नंतर सरकारने संसदेच्या दोन्ही सदनांत प्रस्ताव पारित करून जम्मू-काश्मीर आणि लडाख असे राज्याचे विभाजन केले होते. (वृत्तसंस्था)

### काँग्रेसच्या तोंडी पाकिस्तानची भाषा

**जम्मू, १९ सप्टेंबर**



पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांच्या वक्तव्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर घणाघात केला. पाकिस्तान आणि काँग्रेस नेहमी एकाच बाजूने असतात. काँग्रेस पाकिस्तानच्या भाषेत बोलतो, अशी टीका त्यांनी केली.

कलम ३७० आणि ३५ एला समर्थन देण्याच्या ख्वाजा आसिफच्या वक्तव्यावरून पाकिस्तान आणि काँग्रेस एकाच बाजूने असल्याचे सिद्ध होते. काँग्रेसचाही तोच विचार व अजेंडा आहे, असे अमित शाह यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

ख्वाजा आसिफ यांच्या वक्तव्याने काँग्रेसचा खरा चेहरा पुन्हा एकदा समोर आला, असे शाह यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि पाकिस्तानचा सूर नेहमी एकसारखाच असतो तसेच काँग्रेस नेहमी देशविरोधी शक्तींच्या बाजूने उभी असते, असा टोला अमित शाह यांनी लगावला.

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार असल्याचा काँग्रेस आणि पाकिस्तानला विसर पडला आहे. त्यामुळे कलम ३७० किंवा दहशतवाद काश्मिरात परतणार नाही, हे त्यांनी लक्षात ठेवावे, असे अमित शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)



गुरुवारी चेन्नईच्या एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर बांगलादेशविरुद्ध प्रारंभ झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी फटकेबाजी करताना रविचंद्रन् अश्विनने नाबाद शतक साजरे केले. ५०० बळी, ६ शतके अशी कामगिरी करणारा अश्विन एकमेव ठरला. भारताने दिवस अखेर पहिल्या डावांत ६ बाद ३३९ धावा उभारल्या होत्या

# वेद हे भौतिक, आध्यात्मिक ज्ञानाचा सागर : डॉ. मोहनजी भागवत

### वेदांच्या १० खंडांच्या तिसऱ्या हिंदी आवृत्तीचे प्रकाशन

**नवी दिल्ली, १९ सप्टेंबर**

वेद हे भौतिक आणि आध्यात्मिक ज्ञानाचा सागर आणि ब्रह्मांडाचे मूळ असून, संपूर्ण जगाला जोडण्याचे काम ते करीत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

पद्मविभूषण श्रीपाद दामोदर सातवळेकर लिखित चारही वेदांवरील भाष्याच्या तिसऱ्या हिंदी आवृत्तीचे राजधानी दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात प्रकाशन करताना डॉ. भागवत बोलत होते. महामंडलेश्वर स्वामी बालकानंद गिरी महाराज यावेळी अध्यक्षस्थानी होते.

वेद हे सनातन धर्माचा आधार आहे, वेदात ज्ञान, विज्ञान, धर्म, गणित, संगीत आणि चिकित्सा यांचा मुबलक प्रमाणात समावेश आहे. वेद आणि भारत एकच आहे, असे डॉ. भागवत म्हणाले. वेदातून समस्त विश्वाच्या कल्याणाचा मार्ग दाखवला आहे. वेद विश्वातील समस्त मानवतेला एकाकार करण्याचा मार्ग दाखवत आहे. सनातन संस्कृतीत जीव जगण्यासाठी स्पर्धा करावी लागत नव्हती, हीच शिकवण आम्हाला वेदांनी दिली आहे, असे डॉ. भागवत यांनी स्पष्ट केले. विश्वाच्या व्यापक कल्याणासाठी ऋषिमुनींनी वेदांची रचना केली,



पद्मविभूषण श्रीपाद दामोदर सातवळेकर लिखित पुस्तकाचे विमोचन करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत. सोबत महामंडलेश्वर स्वामी बालकानंद गिरी महाराज, दिनेशचंद्र आणि मान्यवर.

वेदांच्या अध्ययनामुळे समस्त मानवता प्रकाशित होत राहणार आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. आक्रमकांनी वेदग्रंथ आणि सनातन धर्माची शिकवण देणारे गुरुकुल नष्ट करण्याचा प्रयत्न केला; मात्र आमच्या ऋषिमूनींच्या कायमस्वरूपी स्मरणात असणारे वेद ते नष्ट करू शकले नाही. त्यामुळेच भारतीय संस्कृतीत वेद चिरस्थायी आहे आणि राहतील, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात बालकानंद गिरी महाराज यांनी केले. वेदांच्या १० खंडातील ८ हजार पृष्ठांच्या हिंदी अनुवादाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

स्वाध्याय मंडळ पारडी गुजरात तसेच लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाने हे बहुमोल काम केले आहे. विहिंपचे संरक्षक आणि केंद्रीय व्यवस्थापन समितीचे सदस्य दिनेशचंद्र यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद केली.

### ९८ व्या साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह ठरले

**पुणे, १९ सप्टेंबर**

आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाची निवड झाली असून, यासाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काम पाहिले.

सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आगामी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची राष्ट्रीय पातळीची बोधचिन्ह निवड स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत १००हून नामांकित स्पर्धकांकडून उल्लेखनीय अशी बोधचिन्हे तयार करण्यात आली होती. यापैकी संमेलनासाठी बोधचिन्ह निवडण्याची महत्त्वाची जबाबदारी सरहदकडून प्रसिद्ध व्यंग्यचित्रकार राज ठाकरे यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मिळालेल्या बोधचिन्हापैकी मंथन स्कूल ऑफ क्रिएटिव्हीटी ॲण्ड आर्टचे प्रसाद गवळी यांच्या बोधचिन्हाची अंतिम निवड करण्यात आली. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजमुद्रा आणि साहित्याची पारंपारिक लेखणी बोधचिन्हात स्पष्ट दिसत आहे तसेच सरहदचे बोधचिन्ह सरळ आणि साधे असल्यामुळे निवडण्यात आले आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

# सोलापूरकरांसाठी गुडन्युज | विमानसेवेसाठी आठवडाभरात मिळणार परवाना

- दिल्लीत झाली उच्चस्तरीय बैठक
- हैदराबाद, मुंबई, गोवासाठी निघाली निविदा
- अलायन्स एअर अन् फ्लाय ९१ या २ कंपन्या इच्छुक
- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

बहु प्रतिक्षित असलेल्या होटगी रोड येथील विमानतळासाठी आवश्यक असलेल्या ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सेक्युरिटी व 'डीजीसीए'ची मंजुरी मिळालेली असून, आता या विमानसेवेसाठीचा आवश्यक परवाना येत्या आठवडाभरात मिळणार आहे. गुरुवारी दिल्ली येथील बैठकीत अलायन्स एअर आणि फ्लाय ९१ या दोन कंपन्यांनी सहभाग दर्शविला. त्यानंतर गोवा, मुंबई आणि हैदराबादसाठी निवीदाही जाहीर करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना दिली.

सोलापूरकरांचे अनेक दिवसांचे विमानसेवेचे स्वप्न होते. येत्या विधानसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यात वरील दोनपैकी कोणती कंपनी



सोलापूरसाठी विमानसेवा देईल यावर लवकरच शिक्कामोर्तब होणार आहे. आता विमान प्रवासासाठी सोलापूरकरांना मोजकेच दिवस वाट पहावी लागणार आहे. यासाठी गुरूवारी दिल्लीत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक झाली असून, यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आ. सचिन कल्याणशेट्टी हेही उपस्थित होते. भारतीय विमानतळ प्राधिकरणने सोलापूर विमानतळावरून विमानसेवा सुरू होण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रवासी सुविधा पुरविल्यानंतर 'विकास' व 'डीजीसीए'ने अखेर विमानतळावरून प्रवासी सेवा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यानंतर आता विमानतळ विमानसेवेच्या 'टेकऑफ'साठी सज्ज झाले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विमानतळाचे उद्घाटन होण्याची शक्यता आहे.

### एकेक मार्गावर हळूहळू विमानसेवा सुरू होणार

सोलापूरहून विमानसेवा सुरू करण्यासाठी आज २ विमान कंपन्या इच्छुक असल्याचे दिसून आले. यात फ्लाय ९१, अलायन्स एअर यांचा समावेश आहे. सोलापूर विमानतळाची धावपट्टी लहान असल्याने या विमानतळावर केवळ 'एटीआर ७२' या दर्जाचे विमान उतरू शकते. असे विमान छोट्या विमान कंपन्यांच्या ताफ्यात आहेत. एकेक मार्गावर या विमानसेवा सुरू होणार असून, भविष्यात विविध ठिकाणी विमान उड्डाणे अपेक्षित आहेत. याचा फायदा सोलापूरकरांना होणार असून, ही विमानसेवा सुरू केल्याने अनेक उद्योजकही सोलापूरला येतील.

**- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार

### ६५ कोटीची केली विकासकामे

केंद्र सरकारकडून उडान-आरसीएसच्या माध्यमातून आलेल्या निधीतून सोलापूर विमानतळासाठी ६५ कोटींची विविध विकासकामे केली आहेत. सोलापूर विमानतळासाठी आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षण सुरु असून, सदरील मनुष्यबळ लवकरच सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. डीजीसीएच्या परवानाही येत्या आठवडाभरात मिळणार आहे. सोलापुरातून देशभरात विमानसेवा सुरू झाल्यास येथील दळणवळणाला गती मिळणार असून, प्रवाशांना थेट विमानाने दूरपर्यंत कमी कालावधीत पोहोचणे शक्य होणार आहे. आता राहिलेले वॉल कंपोंडचेही काम गतीने सुरू असून, येत्या ८ ते १० दिवसांत विमानतळावरील सर्व कामे पूर्ण होणार आहेत.

**- बानोथ चॉपला,** विमानतळ व्यवस्थापक

### २००९-१० ला विमानसेवा सुरू झाली अन् बंद पडली

सोलापूर विमानतळाचा मुद्दा यंदाच्या लोकसभा निवडणुकीतही चांगलाच गाजला आहे. सोलापूर विमानतळ सुरू करण्याचं आश्वासन सर्वच उमेदवारांकडून देण्यात आलं होतं. आता, लवकरच ही विमानसेवा सुरू होणार असल्याचे दिसून येते. सन २००९-१० च्या दरम्यान सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील आणि तत्कालिन ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रयत्नामुळे विमानसेवा सुरू झाली होती. मात्र, किंगफिशर कंपनी आर्थिक नुकसानीत आल्याने विमान सेवा बंद पडली आणि तेव्हापासून ही सेवा बंदच आहे. आता ही विमानसेवा पूर्ववत होणार असल्याने शहरवासियांतून समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### भंडारकवठे येथे जनावरांच्या आठवडी बाजाराला सुरुवात

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील महत्त्वाचे व कर्नाटक महाराष्ट्र सीमा भागात मध्यवर्ती गाव भंडारकवठे गावामध्ये दर गुरुवारी येथे आठवडा भाजीपाला बाजार भरतो. १९ सप्टेंबरपासून आता या ठिकाणी आठवडा भाजीपाला बजाराबरोबर जनावरांचा देखील बाजार भरवण्यात आला आहे. या बाजाराचा शुभारंभ दक्षिण सोलपूर आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. आठवडा जनावर बाजार चालू झाल्यामुळे परिसरातील व्यापारी, शेतकरी, नागरिकांना सोईचे ठरणार असल्याची माहीती विद्यमान सरपंच भीमाशंकर बबलेश्वर यांनी तरुण भारत प्रतिनिधिशी बोलताना सांगीतले. आठवडा बाजारामुळे कर्नाटकातील उम्रज, रेवतगाव, गोविंदपुर, उम्रानी व तेलगाव, बाळगी, सादेपुर, निबंर्गी, विंचूर, कुसुर या महाराष्ट्रातील गावातील व्यापारी, शेतकरी व नागरिकांना सोईचे गाव आहे. या ठिकाणी लोकमंगल साखर कारखाना असल्यामुळे कामगार वर्ग देखील मोठया प्रमाणात आहे. यावेळी तालुका सरचिटणीस यतीन शहा, तंटामुक्त अध्यक्ष उमेश पाटील ग्राम विकास अधिकारी एम. जी. गाडेकर, ग्रामपंचायत सदस्य सोमनिंग कमळे, पुतु बबलेश्वर, हणमंत पुजारी (उमराणी), हणमंत पुजारी (पैलवान), नागनाथ बिराजदार तदेवाडी, महादेव बहिगोंड, नागनाथ पाटील उपस्थित होते.

### महाराष्ट्र विद्यालयाच्या योगपटूचे क्रीडा स्पर्धेत यश



**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**


जिल्हास्तरीय योगासन स्पर्धाचे न्यू इंग्लिश स्कूल मंगळवेढा या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील ५५ खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालयाची योगपटू श्रेया कैलास करळे हिने तृतीय क्रमांक मिळविला. तिची पुणे विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे. गोळाफेक प्रथम सना फकीर, सागर भोसले, हॅमर थ्रो प्रथम हुसेन शेख, थाळीफेक द्वितीय हुसेन शेख, १०० मीटर धावणे द्वितीय चेतन देवकते, उंच उडी प्रथम ऋषिकेश घोडके, उंच उडी द्वितीय श्रावणी कांबळे व १०० मीटर धावणे द्वितीय विशाखा मते यांनी यश मिळविले. त्यांची जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना क्रीडाशिक्षक पी. डी. पाटील, योगेश उपळकर, विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, व्ही. एस. पाटील, बी. के. भालके, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे यांनी अभिनंदन केले.



### लायन्स क्लब बार्शीतर्फे शिक्षकरत्न पुरस्कारांचे थाटात वितरण

**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**

लायन्स क्लब बार्शीच्यावतीने शिक्षकरत्न पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.प्रा. पंडित लावंड, शिवव्याख्याते प्रा. विशाल गरड, प्रा. बालाजी राऊत, मधुकर जाधव, सुधीर खाडे, अनिकेत कारंडे, सुरेशआबा राऊत, आनंद धुमाळ यांना माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी व लायन्स इंटरनॅशनलचे लिओ प्रांतीय सभापती ॲड. विकास जाधव यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी लायन्स क्लबचे अध्यक्ष रवींद्र कसपटे होते. यावेळी सचिव राणाप्रताप देशमुख, खजिनदार बालकिशन जाजू, लायन्स क्लब बार्शी चेतनाच्या अध्यक्षा अमृता कसपटे सचिव भाग्यश्री देशमुख, खजिनदार वर्षा साखरे, लिओ क्लबचे अध्यक्ष अनिकेत जगदाळे, प्रशांत पंडित उपस्थित होते. प्रास्ताविक रवींद्र कस्पटे यांनी केले. सूत्रसंचालन राहुल साखरे यांनी केले तर आभार राणा प्रताप देशमुख यांनी मानले. कार्यक्रमासाठी अक्षय बंडेवार, बापूसाहेब कदम, नंदकुमार कल्याणी, गिरीश शेटे, ओंकार शहाणे, दत्तात्रय कदम, अजय काळे यांनी परिश्रम घेतले.



### बार्शीत बागवान सोशल फाउंडेशनतर्फे मिठाई वाटप

**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**

हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या जुलूसमध्ये बागवान फाऊंडेशनच्यावतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी डीवायएसपी जालिंदर नालकुल, बार्शी शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, बागवान फाउंडेशनचे जुबेर बागवान, कदीर बागवान, अनवर बागवान, शोएब सैयद, धनंजय जगदाळे, बालाजी देवकते, रफीक शेख, एजाज शेख, युसूफ जमादार, बादशाह बागवान, संगीता पवार, झोबाडे, सुनंदा चौहान, साहील बागवान, इमरान खान आदी उपस्थित होते.

# पंढरपूरच्या आंदोलनास राज्यभरातून वाढता पाठिंबा

**उपोषणाचा अकरावा दिवस; दोघांची प्रकृती खालावली, उपोषणस्थळी अर्धनग्न आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ सप्टेंबर-**

एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी आमरण उपोषणास बसलेल्या सहा जिल्ह्यातील सहा तरुणांच्या आंदोलनास राज्यभरातून वाढता पाठिंबा मिळत असून ठिकठिकाणाहून समाजबांधवांचे जथ्थेच्या जथ्थे आंदोलनस्थळी दाखल होत आहेत. त्यामुळे पोलिसांवरील ताण वाढला असून कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी आंदोलनस्थळी आरसीपी पथकाची नियुक्ती केली आहे.

पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानावर मागील अकरा दिवसांपासून सुरू असलेल्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी उपोषणास बसलेल्या दीपक बोराडे, माऊली हळणवर, गणेश केसकर, विजय तमनर, यशवंत गायके, योगेश धरमपैकी माऊली हळणवर व गणेश केसकर यांची प्रकृती खालवली आहेत. त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले असून त्यांचे वजन ८ ते १० किलो एवढे कमी झाले आहे. त्यांना चक्कर येऊन ते स्टेजवरच पडले. त्यांना तात्काळ दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. परंतु डॉक्टरांच्या उपचारानंतर ते पुन्हा आंदोलनाच्या ठिकाणी आले. हक्क मिळण्यापर्यंत आपल्या निर्धारावर ते ठाम आहेत.



#### आज राज्यस्तरीय बैठक

पंढरपूर येथील आंदोलनाची धार आणखी तीव्र होत असून शुक्रवारी दुपारी ४ वाजता आंदोलनस्थळी राज्यभरातील समाजातील प्रमुख, नेते, मंडळींची बैठक होणार असून यामध्ये पुढील आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

#### मोहोळच्या समाज बांधवांची रॅली

मोहोळ तालुक्यातील धनगर समाज मोटरसायकलची रॅली घेऊन पंढरपूर येथे दाखल झाला. सरकार वेळ काढूनपणा करत असल्यामुळे याचा निषेध म्हणून त्यांनी अर्धनग्न आंदोलन केले आणि जोरदार घोषणाबाजी केली. अनिरुद्ध खताळ यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली आली होती.

### धनगर समाजाचा उद्या चलो करमाळाचा नारा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १९ सप्टेंबर-**




करमाळा तालुक्यातील सकल धनगर जमात बंधू भगिनींच्या वतीने धनगर जमातीला एसटी मधून आरक्षण मिळण्यासाठी चलो करमाळाचा नारा देण्यात आला आहे.

धनगर जमातीच्या अनुसूचित जमाती (ST) च्या आरक्षण अंमलबजावणीच्या आग्रही मागणीकरीता पंढरपूर येथे गेली अकरा दिवसापासून सहा जन आमरण उपोषणास बसलेले आहेत. त्यांनी आरक्षणासाठी जीवाची बाजी लावलेली आहे. काही कार्यकर्ते अगदी सुरुवातीपासून या आंदोलनात योगदान देत आहोत. सरकारकडून या आंदोलनाची दखल घेऊन कार्यवाही व्हावी. सध्या आरक्षण एका महत्त्वपूर्ण वळणावर आहे. उपोषण कर्त्यांचे आत्मबल वाढविण्यासाठी व सरकारकडून आरक्षण अंमलबजावणी तात्काळ करण्याकरिता करमाळा तहसीलमार्फत सरकारला निवेदन दिले जाणार आहे. म्हणून शुक्रवारी २० सप्टेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजता तहसीलदारमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी करमाळा तहसीलदार कार्यालयात मोठ्या संख्येत उपस्थित राहणार आहेत.



### धनगर समाजाच्या आरक्षण लढ्यास पाठिंबा : महादेव कोगनुरे

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**

धनगर समाज बांधवांच्या आरक्षणसाठीच्या लढ्याला नक्कीच यश मिळेल, आमचा तुम्हाला पाठिंबा आहे, आमरण उपोषणकर्त्यांसमवेत महादेव कोगनुरे यांनी भेट घेऊन संवाद साधला.

धनगर समाजाच्या एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी यासाठी पंढरपूर येथे चालू असलेल्या राज्यव्यापी आमरण उपोषणस्थळी आज भेट देऊन एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेस नेते महादेव कोगनुरे यांनी राज्यातून उपस्थित असलेल्या उपोषणकर्त्यांची विचारपूस केली. एमके फाउंडेशन वतीने आरक्षण लढ्यास पाठिंबा दिला. उपोषणकर्ते माऊली हळणवर यांची प्रकृती स्थिर नसल्याने ते दवाखान्यात उपचार घेत असल्याने त्यांची विचारपूस करण्यासाठी तसेच या राज्यव्यापी आरक्षण लढ्यास पाठिंबा देण्यासाठी महादेव कोगनुरे यांनी दवाखान्यात त्यांची भेट घेतली. समाजाविषयी सुरू असलेल्या लढ्यात आम्ही सक्रिय सहभागी असल्याचे सांगत संवेदना व्यक्त केल्या. याप्रसंगी कोगनुरे यांच्या समवेत दक्षिण सोलापूरचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण पाटील उपस्थित होते.

# बेमुदत ठिय्या आठव्या दिवशीही सुरुच

**आ. राजेंद्र राऊत आपल्या भूमिकेवर ठाम; १०३ ग्रामपंचायती, ६३ संघटनांनी दिला पाठिंबा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**




मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे व यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे,तसेच कोणतीही अट न घालता राज्यातील सर्वच समाज घटकांतील मुला-मुलींना सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे या मागणीसाठी आमदार राजेंद्र राऊत यांनी गुरुवारपासून सुरू केलेल्या ठिय्या आंदोलनाच्या आठव्या दिवशी ही विविध संस्था, संघटना, व्यापारी असो,ग्रामपंचायती यांचा पाठिंबा मिळत आहे. आज मोठ्या संख्येने महिला देखील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुढे येत आहेत.

गेल्या गुरुवारपासून आमदार राऊत यांनी बार्शीतील शिवसृष्टीमधील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बेमुदत ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली आहे. आजच्या सहाव्या दिवशी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिवसभर शहर ग्रामीण भागातील बांधव येत होते. माझे बेमुदत आंदोलन आहे. समाजात संभ्रम आहे. तो दूर होणे गरजेचे आहे. किती दिवस हा प्रश्न असाच भिजत ठेवणार आहोत. एकीकडे मराठा समाज आणि दुसरीकडे ओबीसी समाज आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षात भीती आहे. त्यामुळे कोणीच पुढे येताना दिसत नाही.




आता समाजाने आपल्या आमदारांकडे विनंती आणि प्रसंगी दबाव टाकण्याची गरज आहे. मी माझ्या मागण्यांवर ठाम आहे. शेवटी काय करायचे याचा निर्णय समाजबांधव घेतील.कारण शेवटी समाज हा मालक आहे, असे आ. राजेंद्र राऊत यांनी स्पष्ट केले.

# श्रीपूरच्या कारखान्यातच कर्मचाऱ्याची आत्महत्या

**ब्रिमा सागर डिस्टलरीमधील घटनेने श्रीपुरात खळबळ**

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. १९ सप्टेंबर-**



श्रीपूर (ता. माळशिरस) येथील ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टिलरी मद्य निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्ये गुरुवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास संतोष नामदेव मोरे (वय ४८) कायम सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्याने सकाळ ८.१५ च्या सुमारास नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने श्रीपूरमध्ये खळबळ उडाली.

संतोष मोरे हा नेहमीप्रमाणे सकाळ सत्रात सकाळी ८ वा. कामावर आला व नेमून दिलेल्या कामाच्या ठिकाणी पुठ्ठ्याचे बॉक्स तयार करण्यात येत असलेल्या दुसऱ्या मजल्यावर गेला, त्या ठिकाणी असणाऱ्या नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर काही अवधींनी अन्य कामगार तेथे गेल्यावर त्यांना हे दृष्य दिसल्याने त्यांनी सुरक्षा विभागास याची माहिती दिली. त्यांनी याबाबत पोलीस स्टेशनला खबर देताच अकलूज पोलीस स्टेशनचे एपीआय चौधरी, एएसआय बाळासाहेब पानसरे, त्यांच्या इतर सर्व पोलिसांनी घटनास्थळी दाखल झाले. ही बातमी नातेवाईकांना समजताच तेही दाखल झाले. यावेळी संतोष मोरे यांचे नातेवाईक, लोकप्रतिनिधी, काही कामगारांनी मृतदेह खाली घेण्यासाठी विरोध केला. अधिकारी या घटनेस जबाबदार आहेत, असा आरोप करत मुख्य अधिकाऱ्यांना तात्काळ अटक करा, त्यानंतरच मृतदेह खाली घ्या, यामुळे पोलीस, नातेवाईक आणि स्थानिकांमध्ये बराच वेळ बाचाबाची होऊन तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु पोलिसांनी समजूत काढली व शवविच्छेनास नातेवाईक, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या समक्ष पंचनामा करून सरकारी दवाखान्यात मृतदेह शवविच्छेदनास नेण्यात आला.

#### नातेवाईकांनी मृतदेह घेतला ताब्यात

संतोष मोरे यांनी आत्महत्या करण्यास अधिकारी कारणीभूत आहेत. त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही या भूमिकेमुळे पोलिस प्रशासना पुढे पेच निर्माण झाला होता. परंतु संयमाने परिस्थिती हाताळत पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी केलेला शिष्टाई यशस्वी ठरली. यामुळे संतोषच्या मृतदेहावर रात्री ८.३० वा. अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मंद्रुप पोलिसांकडून अवैध दारू विक्रीवर कारवाई

**पाच लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**



मंद्रुप पोलिसांनी अवैध दारू वाहतूक करणाऱ्या दोन जणांवर कारवाई करून ४ लाख ९५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तेरामैल औराद रस्त्यावरुन अवैध दारू वाहतूक होत असल्याची बातमी मिळताच मंद्रुप पोलिसांनी नरसगोंडे वस्तीजवळ लाल रंगाच्या स्विप्ट कारची चौकशी केली. कारमध्ये विनापरवाना विदेशी दारु असल्याचे कारचालकांनी सांगितले.

अक्षय महेश पाटील (रा. सुलेरजवळगे, ता. अक्कलकोट) असे विनापरवाना वाहतूक करणाऱ्याचे नाव आहे. त्याच्याकडून कार ३ लाख ५० हजार व विविध कंपनीचे विदेशी दारु ८५ हजार असे ४ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. मंद्रुप ते कंदलगाव रस्त्यावरून दुचाकीवरून अवैध दारू वाहतूक करणाऱ्या मलप्पा चंद्राम सलगरे (रा. कंदलगाव) याच्याकडून ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही कारवाईत ४ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे, संदीप काशीद, संदीप काळे, माजिद शेख, कृष्णा पवार, राजकुमार जिराळ, चंद्रकांत सुतार, सचिन मसलखांब व अंकुश मोरे यांनी केली.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आ. समाधान आवताडेंनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ सप्टेंबर-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या तसेच अर्ज करून पात्र ठरले आहेत. परंतु पैसे जमा झाले नाहीत अशा विविध मुद्यांवर आ. समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तहसील कार्यालयाच्या सभागृहात दोन्ही तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

पंढरपूर व मंगळवेढा शहर तसेच तालुक्यातील जास्तीत-जास्त महिला भगिनींना या योजनेचा लाभ होण्यासाठी या अभियानामध्ये पात्र महिलांना बहुसंख्येने सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. अधिकाऱ्यांसह जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना जिल्हा सदस्य वर्षा शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख पै.अशोक चौंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य जगन्नाथ रेवे, नाथा काशीद माजी उपसभापती सूर्यकांत ढोणे, राजू पुजारी उपस्थित होते.

आतापर्यंत मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेसाठी पंढरपूर शहरमधून १८ हजार ३२३ एवढ्या महिलांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १७ हजार २९१ महिलांचे अर्ज मंजूर झाले आहेत तर ९९ अर्ज काही त्रुटीमुळे बाकी आहेत. मतदारसंघातील २२ गावातून या योजनेसाठी २७ हजार ७७८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २७ हजार ६७२ अर्ज मंजूर झाले आहेत तर उर्वरित १०६ अर्ज सुद्धा त्रुटी दुरुस्तीनंतर मंजूर केले जाणार आहेत.

मंगळवेढा तालुक्यातील एकूण ५१ हजार ५२५ महिलांचे या योजनेसाठी अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ४९ हजार ९०६ पात्र महिलांचे अर्ज मंजूर झाले आहेत व १ हजार ९१६ महिलांचे काही त्रुटी अभावी अर्ज बाकी आहेत परंतु त्या त्रुटी दूर करून तेही अर्ज लवकरच मंजूर करण्यात येतील.

# बार्शीत पैगंबर जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा; ठिकठिकाणी स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**

हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त शाहीर अमर शेख चौक, मदिना मस्जिद येथून जुलूस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली शोभायात्रेची सुरुवात करण्यात आली. या शोभायात्रेत घोडे, टू व्हीलर, फोर व्हीलर, टेम्पो रिक्षा यावर मक्का मदीनेचे तैलचित्रे, प्रतिकृती ठेवण्यात आली होती. या शोभायात्रेत लहान मुले, युवक, ज्येष्ठ नागरिक हजारोच्या संख्येने सामील झाले होते.




म. हाजी सजन बागवान परिवार व ईकरा गारमेंट, इलियास जालनेवाले मित्रमंडळाच्यावतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी सामाजिक नेते भाऊसाहेब आंधळकर उपस्थित होते. पुढे एसटी स्टँड चौक, नवीन पोलीस स्टेशन या ठिकाणीही शोभायात्रेचे स्वागत करुन विविध सामाजिक संघटना, भवानी पेठ मित्रमंडळाच्यावतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. यापुढे तेल गिरणी चौक, पान खुंट या ठिकाणी तांबोळी समाजाच्यावतीने शोभायात्रेचे स्वागत करुन मार्केट कमिटीचे माजी चेअरमन ॲड. रणवीर राऊत यांच्या हस्ते मिठाईचे वाटप करण्यात आले. पुढे पटेल चौक, मंगळवार पेठ, इकराई चौक लिंबूवाली सवारी या ठिकाणी आ. राजेंद्र राऊत यांनी शुभेच्छा देत मिठाई वाटप केली. महेदवीनगर येथे खा. ओमराजे निंबाळकर, माजी मंत्री दिलीपराव सोपल, बार्शी नगरपालिका माजी गटनेते नागेश अक्कलकोटे यांनी स्वागत केले. यावेळी डीवायएसपी नालकुल, बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुकडे यांच्या हस्ते मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी बहुजन आघाडीचे धनंजय जगदाळे, शोएब सय्यद, सुनंदाताई चव्हाण, संगीता पवार यांनी बागवान सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष जुबेर येडशीकर, उपाध्यक्ष अनवर बागवान, सचिव कदीरभाई बागवान, पवार, झोंबाडे, रफिक शेख यांनी शोभायात्रेचे स्वागत केले. दस्तगीर दर्गा, जुना गांधी पुतळा, सोमवार पेठ युन्नूस शेख, राजू शिकलकर मित्रपरिवाराने मिठाईचे वाटप केले. बागवान समाज, इम्तियाजभाई तांबोळी, माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, कादर तांबोळी, बागड, लबेक गुप, याराना ग्रुप, गणेश नान्नजकर, नागजीभाऊं नान्नजकर मित्रमंडळ, हिंद ॲग्रीकल्चरतर्फे मिठाईचे वाटप करण्यात आले.

#### मिरवणुकीनंतर तात्काळ स्वच्छता मोहीम

या शोभायात्रेचे विशेष आकर्षण लबेक ग्रुपच्यावतीने शोभायात्रा पुढे गेल्यानंतर खाऊ वाटपाचा कचरा उचलण्यात येत होता. दुपारी तीन वाजता अमर शेख चौक, मदिना मस्जिद या ठिकाणी मदिना मज्जिदचे इमाम अन्वारुल हक यांनी फातेहा प्रार्थना करुन शोभायात्रेचा समारोप केला. या शोभायात्रेत दहा हजारांपेक्षा जास्त नागरिक सहभागी झाले होते. बार्शी शहर पोलीस स्टेशनच्या वतीने चोख बंदोबस्त. ठेवण्यात आला होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### महायुतीला काहीही करून दंगल पेटवायची आहे : जितेंद्र आव्हाड

**ठाणे दि. १९ सप्टेंबर:**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भिवंडीतील घटनेवरुन महायुती सरकारवर गंभीर आरोप केला आहे. ''या सरकारला काहीही करून दंगल पेटवायची आहे. त्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुकी वेळी योग्य बंदोबस्त करणाऱ्या भिवंडीतील



पोलीस उपायुक्ताची तातडीने बदली करण्यात आली, असे गंभीर आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केली. ते म्हणाले,भिवंडीमध्ये पोलिसांनी योग्यवेळी हस्तक्षेप केला नसता तर दोन समाजात दंगल झाली असती मात्र तिकडच्या बीजेपीचा राजकीय नेता दंगल घडवू इच्छित होता आणि ही दंगल झाली नाही. त्याचे परिणाम डीसीपीला भोगावे लागले. याचा अर्थ स्पष्ट आहे. या सरकारला काहीही करून दंगल पेटवायची आहे आणि पोलिसांना हत्यार म्हणून पुढे पाठवायचे आहे'', मी पोलिसांनाच विनंती करेल. तुम्ही हत्यार बनवू नका. असे सांगून ते म्हणाले की, गणपती विसर्जनाच्या आधी दंगल होता होता वाचली. पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. सगळ्यांना पळवून लावले हे काही लोकांना आवडलेले नाही. त्यामुळे सरकारने त्या पोलीस अधिकाऱ्याची, त्याची उचलबांगडी केली. दंगल थांबवणं हा पोलिसांचा गुन्हा आहे का?'', असा सवाल आव्हाड यांनी केला. मी आता सगळ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांना विनंती करणार आहे की, सगळ्यांनी एकत्र या. आपण सर्व त्या ठिकाणी जाऊ. देशाचं शोषण करणाऱ्यांविरोधात आपण सगळे उभे राहू. शोषण करताना ते ताकदवान होत गेले तर आपण काहीच करू शकणार नाही. ज्याचं शोषण होतं त्याला आपण ताकद दिली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

### सोमेश वैद्यांची भाजपाकडे उमेदवारीची मागणी; मळसिद्ध मुगळेंची संवाद यात्रा

**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून अनेक इच्छुक उमेदवार आतापासून फिल्डिंग लावत आहेत. अशात सोमेश वैद्य यांनी भाजपाच्या माजी नगरसेवकांच्या शिफारसीसह वरिष्ठांकडे उमेदवारीची मागणी केली आहे तर जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे यांनी मंद्रुपमधून विधानसभेची पूर्वतयारी म्हणून विकास संवाद यात्रेचा शुभारंभ केला आहे. स्वयंम् शिक्षा





फाऊंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांनी दोन महिन्यांपासून दक्षिणमध्ये विविध सामाजिक कार्यक्रमांमधून जनसंपर्क दौरा सुरू केला आहे. कोणत्याही परिस्थितीत दक्षिणची विधानसभा लढवायचीच असा निर्धार करून वैद्य मतदारसंघात दौरा करीत आहेत. पुण्याचे भाजपा आमदार महेश लांडगे यांचे स्वीय सहायक म्हणून प्रशासकीय काम करताना भाजपाचे विचारमूल्ये व तत्त्वांचे पालन करीत आहेत. शिवाय भाजपाचे लोकहित व कल्याणकारी कामाची पध्दत परिचित असल्याने वैद्य यांनी भाजपाच्या उमेदवारीस पसंती दिली आहे. उमेदवारीची पहिली पायरी म्हणून त्यांनी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्याकडे रितसर मागणी अर्ज दिला आहे. विशेष म्हणजे वैद्य यांच्यासाठी भाजपच्या सहा माजी नगरसेवकांनी शिफारस केल्याने भाजपामध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. आ. देशमुख यांचे समर्थक म्हणून परिचित असणारे भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे यांनी मंद्रुप येथील मळसिध्द मंदिर येथे नारळ वाढवून विकास संवाद यात्रेचा शुभारंभ केला आहे. वरिष्ठ नेत्यांचे आदेश म्हणून विकास संवाद यात्रा सुरु केली असून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारीची मागणी केली आहे. मुगळे यांचा कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून सीना-भीमा खोऱ्यात दांडगा जनसंपर्क आहे. शिवाय मंद्रुपमध्ये दिग्गज नेत्यांना पराभूत करून सत्तापरिवर्तन घडवून आणल्यामुळे मुगळे यांची विशेष ओळख आहे. तरूणांना रोजगार व सर्वांगिण विकासाचे मुद्दे घेऊन मतदारांशी संपर्क साधत आहेत.

### कुर्डूवाडीतील रेल्वे पुलाचे काम पूर्ण करा : आ. संजयमामा शिंदे

**कुर्डूवाडी, दि. १९ सप्टेंबर-**

कुर्डूवाडी रेल्वे गेट नं.३८ येथील पुलाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, तात्काळ या पुलाचे काम पूर्ण करण्याची मागणी आ. संजयमामा शिंदे यांनी डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर यांच्याकडे केली आहे. कुर्डूवाडी हे मोठ्या लोकसंख्येचे शहर असून या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे.



त्यामुळे कुर्डूवाडी शहर रेल्वे हद्दिकडील भाग, भीम नगर, लेंगरे वस्ती, रेल्वे कॉलनी, करमाळा रोड, बार्शी नाका या भागातील नागरिकांची लोकसंख्या जवळपास १५ हजारांच्या आसपास असून जवळच्याच भोसरे गावातील लोकसंख्या १०-१५ हजार आहे. आजूबाजूच्या खेड्यातून अनेक नागरिक याच भागातून शेतीमाल खरेदी-विक्री करणे, शालेय विद्यार्थी, रुग्ण, बँक या कामासाठी कुर्डूवाडी शहरात येत आहेत. त्यामुळे तातडीने शहारातील रेल्वे गेट नं. ३८ येथील पुलाचे काम तात्काळ सुरू करावे, अशी मागणी लेखी पत्राद्वारे डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, मध्य रेल्वे,सोलापूर यांच्याकडे आ. संजयमामा शिंदे यांनी दिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की रेल्वे गेट नं. ३८ जवळील पुलाखालच्या नाल्यातून रहदारी सुरू आहे. बाब ही अत्यंत गंभीर असून एखादा व्यक्ती अत्यंत आजारी पडली तर त्याला शहराला वळसा घालुन बायपासने शहरात जावे लागत आहे. त्यामुळे त्याच्या जीवीतास धोका होण्याची शक्यता देखील जास्त आहे. त्यामुळे कुर्डूवाडी रेल्वे गेट नं. ३८ येथील पुलाचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे असे म्हटले आहे.

### महिंद्राचा नवा वीरो बाजारात

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

युटिलिटी वाहने आणि ३.५ टनांपेक्षा कमी वजनाची एलसीव्ही वाहने बनवणारी भारतातील आघाडीची कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने महिंद्रा वीरो बाजारपेठेत दाखल केल्याची घोषणा केली आहे, याची किंमत ७.९९ लाख रुपयांपासून पुढे आहे. ३.५ टनांपेक्षा कमी वजनाच्या एलसीव्ही वाहनांच्या सेगमेंटमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी डिझाईन केलेला वीरो अधिक प्रगत सुरक्षा आणि केबिनमध्ये प्रीमियम अनुभव या सर्वांचा लाभ महिंद्रा वीरोमध्ये घेता येणार आहे.अध्यक्ष,वीजय नाक्रा म्हणाले,महिंद्रा वीरो ३.५ टनांपेक्षा कमी वजनाच्या एलसीव्ही वाहनांच्या सेगमेंटमध्ये आमचे नेतृत्वस्थान अधिक बळकट करेल.

# अजित पवारांना हव्यात किमान ६० जागा!

### देवगिरीतील बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि १९ सप्टेंबर :**

गणेशोत्सव संपल्याने राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला जोर धरला आहे. सत्ताधारी महायुतीत अजूनही जागा वाटपाचा तोडगा निघालेला नसून घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. सध्याची स्थितीत ८० जागांची मागणी करून किमान ६० जागा घ्यायचा निर्धार पक्षाने केला आहे. अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर बुधवारी झालेल्या बैठकीत पक्षाचे प्रमुख नेते व आमदारांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याचे समजते.

बैठकीला प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, छगन भुजबळ,हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील आदी उपस्थित होते.

लोकसभेवेळी भाजपाने सांगितल्याप्रमाणे केवळ चार जागा लढविल्या होत्या. त्यापैकी केवळ रायगडची एकच जागा जिंकता आली त्यामुळे विधानसभेला जास्तीत जास्त जागा लढवून कार्यकर्त्यांना संधी द्यावी अशी मागणी यावेळी इच्छुकांनी केली. उमेदवारी मिळाली नसल्यास अनेक जण मूळ शरद पवार गटात प्रवेश करण्याच्या पवित्र आहेत त्याबाबत उघडपणे काहींनी आपला निर्धार बोलून दाखवला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक ही अजित पवार गटासाठी प्रतिष्ठेची असून त्यांना ताकद दाखवण्यासाठी



किमान ९० नसल्यातरी ८० जागांची मागणी करावयाची व तडजोडीत ६० जागा पदरात पाडून घ्यायच्या. शिवाय महामंडळांबाबत पुन्हा सत्ता आल्यानंतर ३३ टक्के वाटा घ्यायची, अशी रणनिती ठरवण्यात आली आहे.

२०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ५४ आमदार निवडून आले होते. त्यापैकी ४१ आमदार अजित पवार यांच्यासोबत आहेत, मात्र सर्व ५४ जागा घेण्याबरोबरच गेल्यावेळी २ क्रमांकावर असलेल्या आणखी १५ ते २० जागाची मागणी केली जाणार आहे,

भाजप आणि शिवसेनेचा सध्याचा जागांचा आग्रह पाहात ८० ते ९० जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळण्याची शक्यता नाही. त्याचप्रमाणे अजित पवार यांना सोबत घेण्याबाबत भाजपा व शिंदे गटातील अनेक नेत्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे.त्यामुळे जागा वाटपात फारसे न ताणता जास्ती जास्त जागा मिळवायच्या व त्या कोणत्याही परिस्थितीत निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अनेक आमदारांनी अजित पवारांना साथ दिली असून काही अपक्ष आणि काँग्रेसच्या आमदारांनी अजित पवारांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या सर्व आमदारांना पुन्हा उमेदवारी देण्याचेही पक्षाने निश्चित केले आहे. त्यामुळे विद्यमान आमदारांचे तिकीट कापले जाणार नाही हे स्पष्ट आहे.

#### बैठकीला आमदारांची दांडी

बैठकीला सर्व आमदारांना पाचारण करण्यात आले असलेतरी अनेकजण बैठकीला उपस्थित नव्हते. लोकसभेवेळी झालेला दारूण पराभव व शरद पवार यांच्याबाबत मतदारांमध्ये असलेल्या सहानुभूतीमुळे अनेकजण घरवापसी करण्याच्या पवित्र्यात आहेत.त्यामुळे त्यांनी विविध कारणे देत बैठकीला हजर राहण्याचे टाळल्याचे सांगण्यात आले.

#### सद्या महामंडळ नाही

या बैठकीत महामंडळांबाबतही चर्चा करण्यात आली. शिंदे गटाकडून त्यांच्या नेत्यांना महामंडळं देण्यात आली आहेत. तशी घोषणाही करण्यात आली. मात्र भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने तशी कोणतीही घोषणा केली नाही. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागांवर काहींची वर्णी लावली जाईल ,असे ठरले आहे. मंत्रिमंडळात सरसकट सर्वांना संधी मिळणार नाही. त्यामुळे सत्ता आल्यानंतर काहींना महामंडळ देण्यात येईल अशी रणनिती पवार गटाने आखली आहे.

# राहुल गांधींना धमक्या देणाऱ्याच्या विरोधात काँग्रेसचे राज्यभर आंदोलन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ सप्टेंबर:**

विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांना जीवघेण्या धमक्या देणाऱ्या सताधारी भारतीय जनता पक्ष व शिवसेनेच्या बेताल नेत्यांविरोधात काँग्रेसने राज्यभर रस्त्यावर उतरून आंदोलन केले. खासदार राहुल गांधी यांना धमक्या देणाऱ्यांना भाजपा-शिवसेनेने आवर घालावा व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी , या मागणीसाठी महाराष्ट्र काँग्रेसच्या वतीने गुरुवारी राज्यभरात निदर्शने करण्यात आली.

मीरा भाईंदर येथे प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टार, माजी मंत्री सतेज बंटी पाटील, हुसेन दलवाई, आमदार भाई जगताप यांच्यासह नेते, पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी आंदोलन करत भाजपाच्या तालिबानी वृत्तीचा निषेध केला.

मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कुलाबा येथीस घरासमोर मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. शिवसेना आमदार संजय गायकवाड यांचे निलंबन करण्याची मागणी केली.




पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयसमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, आमदार रविंद्र धंगेकर, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश सरचिटणीस अभय छाजेड, माजी महापौर कमल व्यवहारे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जळगाव शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील आकाशवाणी चौकात शहर जिल्हाध्यक्ष शाम तायडे यांच्या नेतृत्वात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना ( )व राष्ट्रवादी काँग्रेसचे() नेतेही आंदोलनाला उपस्थित होते. यावेळी भाजपाचा तरविंदर मारवा, रवनीत बिट्टू, अनिल बोंडे व शिंदे गटाचा संजय गायकवाड यांच्या अटकेची मागणी करण्यात आली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रतिभा शिंदे जळगावच्या माजी महापौर जयश्रीताई महाजन यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'वन नेशन वन इलेक्शन' म्हणजे राष्ट्राध्यक्ष पद्धत आणण्याचा डाव

### जयंत पाटील यांची टीका

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ सप्टेंबर :**

आपल्या देशात संघराज्य पद्धत आहे मात्र देशात वन नेशन वन इलेक्शन आणून अमेरिकेसारखी राष्ट्राध्यक्ष पद्धत आणणे हा भाजपचा डाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेली लोकशाही चौकट समूळ नष्ट करण्याचे पहिले पाऊल आहे ,अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.



केंद्रीय मंत्रिमंडळाने वन नेशन वन इलेक्शन या निवडणूक प्रक्रियेला मंजुरी दिली. याबाबत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, देशाची घटना बदलण्याच्या मनसुब्यामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपला फटका बसला होता. आता पुन्हा घटना बदलण्याचा प्रकार भाजप समोर आणत आहे ,अशी टीका त्यांनी केली. भाजपाने नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका टाळलेल्या आहेत. ते वन नेशन वन इलेक्शनची भाषा बोलतात हे आश्चर्यकारक आहे. मागे लोकसभा निवडणुकीत सात टप्प्यांमध्ये निवडणूक घेण्यात आली. त्यातही गोंधळ झाला अशा परिस्थितीत वन नेशन वन इलेक्शन करणे शक्य आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



# आप्पा गणपती प्रतिष्ठान व जायंट्स ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

दाजी पेठेतील आप्पा गणपती प्रतिष्ठान व जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दाजीपेठ येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन आप्पा गणपती प्रतिष्ठानचे संस्थापक मेघनाथ येमुल यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी आप्पा गणपती युथ फाउंडेशनचे अध्यक्ष महेश कोडम होते. व्यासपीठावर जायंट्स इंटरनॅशनल फेडरेशन डायरेक्टर किसन आडम, फेडरेशन ऑफिसर श्रीनिवास कोंडले, माजी व्हाईस प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, सचिव हरिनिवास सोमा, कैलासम वडनाल, विवेक महिंद्रकर, अनिल व्हनमाने, वासू दोरनाल, श्रीधर बुरा, मंडळाचे पदाधिकारी व सदस्य आदी उपस्थित होते. या शिबिरात ७५ जणांनी रक्तदान केले शिबिरासाठी सिद्धेश्वर रक्त पेढीचे सहकार्य लाभले.

# मराठमोळे आयपीएस शिवदीप लांडे यांचा राजीनामा

### बिहार राजकारणात करणार एन्ट्री?

**तभा वृतसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ सप्टेंबर:**

बिहार केडरचे मराठमोळे आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून दिली असून आपण बिहारमध्येच कार्यरत राहणार असल्याचे म्हटले आहे त्यामुळे बिहारमध्ये पिके उर्फ प्रशांत किशोर यांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षात ते प्रवेश करतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

शिवदीप लांडे गेली १८ वर्ष पोलीस खात्यात सेवा केली आहे. त्यांना बिहारमधील सिंघम म्हणून ओळखलं जाते .दरम्यान, लांडे यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

शिवदीप लांडे यांची फेसबुक पोस्ट काय?

''जय हिंद! माझा प्रिय बिहार, गेली १८ वर्षे शासकीय पदावर सेवा दिल्यानंतर आज मी या पदाचा राजीनामा दिला आहे. एवढ्या वर्षात मी बिहारला माझ्या आणि माझ्या कुटुंबापेक्षा वरचढ मानले आहे. माझ्या सरकारी नोकरीच्या कार्यकाळात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्याबद्दल मी माफी मागतो. आज मी भारतीय पोलीस सेवेचा (आयपीएस) राजीनामा दिला आहे. परंतु, मी बिहारमध्येच राहीन आणि भविष्यातही बिहार माझे कार्यस्थान असेल'', असं शिवदीप लांडे यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे.

लांडे हे बिहार केडरचे आयपीएस अधिकारी असले तरी त्यांनी महाराष्ट्र पोलीस सेवेतही काही वर्ष काम केलेलं आहे. मुंबईमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथकात असताना त्यांनी अनेक धडाकेबाज कारवाया केल्या होत्या. लांडे यांना गुन्हेगारांवर बेधडक कारवाई करण्यासाठी ओळखलं जायचं. अंमली पदार्थ विरोधी पथकात कार्यरत असताना त्यांनी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर चांगलाच वचक बसवला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी यशस्वी छापे टाकण्यात आले होते.

दरम्यान, शिवदीप लांडे २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असून ते मूळ महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील आहेत. दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी शिवदीप लांडे यांची बिहारमधील पूर्णियामध्ये आयजी पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी या पदाची जबाबदारीही स्वीकारली होती. मात्र, आयजी पदाचा पदभार घेऊन काही दिवस होताच शिवदीप लांडे यांनी आज (१९ सप्टेंबर) आपल्या पोलीस सेवेचा राजीनामा दिला आहे.

# अवकाळीची नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

### माजी आ. दिलीप मानेंच्या मागणीला यश

### शेतकऱ्यांमधून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ मध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झाले होते. या पिकांचा पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी आ. दिलीप माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेत प्रत्यक्ष निवेदनाद्वारे केली होती. आता या नुकसानीची भरपाई शासनाकडून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरूवात झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

अवकाळी पावसात ५४ हजार ७१५ शेतकऱ्यांचे तूर, मूग, उडीद, भुईमूग, कांदा या पिकांसह फळबागांचे नुकसान झाले. हातातोंडाशी आलेली



पिके वाया गेल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. यातील ९१७ शेतकऱ्यांना या नुकसानीची भरपाई मिळाली. पण ९० टक्केहून अधिक शेतकरी या नुकसान भरपाईपासून वंचित होते. वर्ष झाले तरी याची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नव्हती. माने यांनी दक्षिणमधील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेत त्यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यात त्यांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई तात्काळ द्यावी, अशी मागणी केली. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी महसूल, कृषी विभागाची संयुक्त बैठक घेत नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पैसे मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलली. अखेर बुधवारपासून दक्षिण सोलापूर तालुक्यातील उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई रक्कम जमा झाल्याचे एसएमएस दिलीप माने यांना पाठवून आनंद व्यक्त केला आणि आभार मानले.

शेतकऱ्यांसाठी तळमळीने केलेल्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले. पावसामुळे २०२३ मध्ये शेतीची झालेली नुकसान भरपाई मिळाली नसल्याने अनेक शेतकरी चिंतेत होते. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांना मिळणारे हे मोठे यश अतिशय समाधान देऊन जाणारे आहे. शेतकऱ्यांचा आनंद पाहिल्यावर माझे झटणे, लढणे सार्थकी लागल्याचा खूप आनंद आहे.

**- दिलीप माने, माजी आमदार**

## अग्रलेख...

# भगीरथपुत्राची नवी तपश्चर्या!

भारतासारख्या संस्कृतिसंपन्न देशात बदल हा परिवर्तनकारी असलाच पाहिजे. त्याने नवतेचे संदर्भ ध्यानात घेतलेच पाहिजेत. तो परिणामकारीही असला पाहिजे आणि जे अस्तित्वात आहे, त्याच्या पायावरच नव्या बदलाची उभारणी करून तो सहजपणे स्वीकारताही आला पाहिजे. तळ्यात मळ्यात करण्याची मानसिकता असलेल्या व तत्काळ क्रांतिकारी बदलाची अपेक्षा करणाऱ्या विचारसरणींना हे साधणे सोपे नाही. साधारणपणे काही साध्य होत असते अशा ज्या प्रथा आणि धाटणी दीर्घकाळ टिकून राहतात, त्याच्याच पायावर पुढे नव्या प्रथा-परंपरा रचल्या जात असतात. म्हणूनच बदलाच्या प्रत्येक निर्णयामागे संयम आणि विनम्रपणा असायला हवा. वर्तमानातील देशाचे हे राजकीय वास्तव पाहता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे द्रष्टेपण तळ्यात मळ्यात संस्कृतीच्या पलीकडचे आहे. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळाचे शंभर दिवस पूर्ण झाले आहेत. दोन महिन्यांपूर्वी १५ ऑगस्ट रोजी राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी विकसित भारताचा संपूर्ण आराखडा समोर मांडला होता. विकसित भारत हे केवळ स्वप्न नाही, तर तो त्यांच्या सरकारचा संकल्प आहे, याचाही त्यांनी वारंवार पुनरुच्चार केला आहे. देशाला वैभवाप्रत नेण्याच्या व्रताचा सच्चा अनुयायी या नात्याने मोदी यांनी केलेले हे संकल्प म्हणजे केवळ राजकीय लाभासाठी जनतेला स्वप्ने दाखविण्याचे राजकारण नव्हे, तर या संकल्पातून ते भारतमातेच्या उत्कर्षाचाच विचार करतात, हे बुधवारी पुन्हा एकदा सिद्ध झाले. देशातील जनतेची स्वप्ने पूर्ण करणे हाच आपला संकल्प आहे, असे त्यांनी वारंवार नमूद केले आहे. देशाला जगाच्या पाठीवर सर्वोच्च प्रतिष्ठा, विकासाचा उंचावणारा आलेख आणि विकासाद्वारे निर्माण होणाऱ्या प्रत्येक संधीचा समान हक्कदार असलेला सामान्य माणूस हे त्यांच्या संकल्पाचे ढोबळ रूप आहे. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी मोदी सरकार काम करते, हे मंत्रिमंडळाच्या बुधवारच्या बैठकीतील निर्णयांतून दिसून आले. विकासाच्या वाटचालीत सामान्य माणूस हाच केंद्रस्थानी ठेवून घेतल्या जाणाऱ्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी आणि त्या निर्णयांचे थेट लाभार्थी म्हणून सामान्य माणसाला मिळणारा अनुभव या बाबी अभूतपूर्व अशाच म्हणाव्या लागतील. मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर आले, तेव्हा भारतीय जनता पार्टीसोबत असलेल्या पक्षांच्या तालावर कारभार करताना त्यांची दमछाक होईल या अपेक्षेने गंमत पाहण्यासाठी उत्सुक असलेल्या विरोधकांचा शंभर दिवसांतच झालेला भ्रमनिरास पाहता, अगोदरची १० वर्षे, मागचे १०० दिवस आणि पुढची २३ वर्षे मोदी यांच्या नावाचा ठसा भारताचा राजकारणावर आणि सत्ताकारणावरून पुसणे विरोधकांसाठी सोपे राहिलेले नाही, हेही पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. नवतेचा ध्यास घेतलेल्या मोदी सरकारने परंपरांचा आणि संस्कृतीचा विसर पडू दिलेला नाही, हेच त्यांच्या संकल्पसिद्धीच्या ध्यासाचे गमक असावे. आजपर्यंत देशात केवळ पराभवाचाच इतिहास शिकविला गेला. आपण सांस्कृतिकदृष्ट्या भित्रे, दुबळेच असून गेल्या अनेक शतकांपासून आपले पूर्वज केवळ पराभवच पाहात आले आहेत, असेच इतिहासातून ठसविण्याचा प्रयत्न झाला. इतिहासातील काही युद्धांत पराभव झाला असेलही, पण अनेक युद्धे आपण जिंकलेलीदेखील आहेत. त्यामुळेच आपण अद्याप पाय रोवून भक्कमपणे उभे आहोत. अन्यथा इतर प्राचीन संस्कृतींप्रमाणे आपली संस्कृतीदेखील लोप पावून इतिहासजमा झाली असती. आपण विजेते आहोत आणि आपण जग जिंकू शकतो, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी देशाला दिला आहे. आपण देशसेवेसाठी सत्तेवर आहोत, असा सज्जड संदेश देण्यात ते यशस्वी ठरले आहेत. मातृभूमीच्या सेवेत स्वत:चे योगदान देण्याची आस तीव्र असणे हे महत्त्वाचे आहे, हे मोदी यांनी दाखवून दिले आहे.

दोन दिवसांपूर्वी, १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान मोदी यांचा जन्मदिन साजरा झाला, तेव्हाच त्यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील १०० दिवस पूर्ण झाले. सातत्याने तिसऱ्यांदा सत्तेवर येणारे बिगर काँग्रेसी सरकार म्हणून भारताच्या सत्ताकारणाच्या इतिहासात मोदी सरकारचे नाव नोंदले गेले आहे. त्यामुळेच भारताच्या भविष्याला आपल्या संकल्पानुसार आकार देण्याचा मनोदय व्यक्त करणे हा त्यांचा अधिकार ठरतो. सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील; तोपर्यंतचा काळ म्हणजे देशाचा अमृतकाळ आहे, असे मोदी म्हणतात. या अमृतकाळातच देशाच्या विकासाची सारी शिखरे पादाक्रांत करण्याचा त्यांचा निर्धार त्यांच्या कार्यशैलीतून व्यक्त होताना दिसतो. गरीब, युवक, महिला आणि शेतकरी या चारच जाती देशात अस्तित्वात असून त्यांचा विकास म्हणजे देशाचा विकास हे सामान्य तत्त्वज्ञान मोदी सरकार आपली सत्तानीती म्हणून अंमलात आणत आहे, हे एव्हाना सिद्ध झाले. बुधवारी मंत्रिमंडळ बैठकीत मोदी सरकारने घेतलेले समाजहिताचे निर्णय हे त्याच नीतीचे प्रतिबिंब म्हणावे लागेल. पहिल्या १० वर्षांत कलम ३७० रद्द करणे, देशाच्या अर्थव्यवस्थेला उत्कर्षावस्था आणून जगातील तिसरी शक्तिशाली अर्थव्यवस्था उभी करण्याच्या दृष्टीने आखली गेलेली अर्थनीती, भारतासारख्या खंडप्राय देशात अशक्यप्राय वाटणारी डिजिटल अर्थक्रांती, अयोध्येतील राम मंदिराचा चिघळलेला वाद शमवून मंदिराची केलेली उभारणी, मुस्लिम महिलांना तीन तलाकच्या जाचक प्रथेपासून मुक्ती, विधिमंडळे व संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण असे अनेक निर्णय अंमलात आणून मोदी सरकारने आपल्या संकल्पाप्रतीची दृढता स्पष्ट केली होती. किसान सन्मान योजना हा केवळ या संकल्पाचा पूर्वार्ध आहे, असे म्हणता येईल. मंत्रिमंडळाच्या बुधवारच्या बैठकीत शेतकरी कल्याणाच्या संकल्पाचा नवा अंक सुरू झाला आहे. परिवर्तनात्मक सुधारणांच्या या नव्या पावलांमुळे देशातील शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवून त्याला आत्मनिर्भर करण्याचा आणि त्याचा आत्मविश्वास वाढविण्याच्या प्रयोगाचे एक नवे दालन बुधवारच्या एका निर्णयामुळे खुले झाले आहे. या बैठकीत मोदी सरकारने शेतकऱ्यांकरिता २४ हजार ४७५ कोटी रुपये खर्चाची पोषण मूल्यावर आधारित अनुदान योजना संमत केली. यामुळे आता शेतकऱ्यांना फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खते सवलतीच्या दरात मिळतील. पीएम अन्नदाता आय संरक्षण अभियान नावाच्या आणखी एका संकल्पाचा प्रारंभही या बैठकीतील निर्णयातून करण्यात आला आहे. ३५ हजार कोटी रुपये खर्चाच्या या अभियानातून शेतकऱ्याच्या शेतातील जीवनावश्यक वस्तूंच्या भावातील चढउतार नियंत्रित होणार असून शेतकऱ्याला उत्पन्नाची निश्चित हमी मिळणे शक्य होणार आहे. देशातील ६३ हजार आदिवासी खेड्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे ८० हजार कोटींच्या खर्चाची उन्नत ग्राम अभियान योजना पाच कोटी आदिवासी लोकसंख्येला लाभदायक ठरेल, असा मोदी सरकारचा विश्वास आहे. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स अशा मनोरंजन माध्यमांतील नवी झेप घेण्याचा संकल्प मोदी मंत्रिमंडळाने सोडला आहे. आर्थिक विकासाला चालना, रोजगाराच्या नव्या संधी, परदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन आणि भारताच्या बुद्धिसंपदेला जागतिक पटलावर आणण्याची नवी झेप असे या निर्णयांचे वर्णन करावे लागेल. अंतराळ क्षेत्रातील चार नव्या योजनांचा शुभारंभ ही जागतिक अंतरिक्ष विश्वातील भारताची महत्त्वाकांक्षी झेप ठरणार आहे. या मोहिमांतून चंद्र आणि शुक्राशी नवे नाते जोडण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेला बळ मिळाले आहेच, पण अंतरिक्ष संशोधन क्षेत्रात जगाचे नेतृत्व करण्याची भारताची क्षमता सिद्ध करण्याच्या दृष्टीनेही या योजना महत्त्वाच्या ठरणार आहेत. अंतरिक्षात उपग्रह स्थानक उभारण्याच्या योजनेमुळे या क्षेत्राला जी गती मिळणार आहे, ते पाहता, येत्या १५ वर्षांत भारतीय अंतराळवीर चंद्राच्या भूमीवर थेट उतरलेला पाहण्याचा अभूतपूर्व अनुभव देशवासीयांना मिळेल, तेव्हा भगीरथाने पृथ्वीवर गंगा आणण्यासाठी केलेल्या तपश्चर्येचे आधुनिक रूप आठवल्याखेरीज राहणार नाही. म्हणूनच मोदी सरकारने नव्या उमेदीने सुरू केलेल्या नव्या वाटचालीचे अभिनंदन केलेच पाहिजे.

---

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# ओळख एका देवतेची

ती खरोखरच एक देवी असावी. कारण एकाच वेळी तिने जीवनाच्या विविध आणि अतिशय दुर्घट अशा आघाड्यांवर उज्ज्वल कामगिरी करून दाखवली. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे हिंदू धर्मातील चारही पुरुषार्थ तिने सिद्ध करून दाखविले. एकाच वेळेस तिची परीक्षा पाहणारे असे दुःखाचे प्रसंग तिच्या वाट्याला येत होते, तर त्याच वेळेस आपलं कर्तव्य करीत कर्तृत्वाने जीवनाचे सार्थक व्हावे असे समाधानाचे प्रसंग तिच्या वाट्याला येत राहिले. सत्ताधीशांना आपल्या राजकारण धुरंधरतेने तिने अनेकदा तोंडात बोटे घालायला लावली. हिंदू धर्म तत्त्वज्ञानाची दृश्यं पताका म्हणावी अशा मंदिरांचा विविध तीर्थक्षेत्री तिने जीर्णोद्धारही केला. समाजजीवनात लूटमार करणाऱ्या समूहाला सभ्य समाजाच्या मूल्याधारित जीवनाची दीक्षा दिली. कौशल्य प्राप्त असणाऱ्या कारागीरांना आपल्या क्षेत्रात वसवत एक उत्पादन केंद्र प्रसिद्धीला आणले तर मालाच्या विक्रीसाठी उत्तम बाजारपेठेची उभारणीही केली. व्यक्तिगत जीवनात विरागी जीवनाचा आदर्श घालून देताना राजा म्हणजे जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा एक विश्वस्त हा आदर्श भारतीयांना पुन्हा नव्याने घालून दिला. धर्माला आणि त्यातही हिंदू धर्माला असलेल्या वैचारिक बाजूने ती सातत्याने कार्यरत राहिली. मंदिरं जीर्णोद्धार आणि निर्माणाद्वारे विविध ठिकाणी रोजगाराला चालना मिळेल, असा तिने कटाक्ष ठेवला. काही पाश्चात्त्य लोकांनी ती निरक्षर होती, असे सांगितले, पण तिने बुद्धीच्या किंवा वैचारिक क्षेत्रात करून घेतलेले कार्य आजही सुशिक्षितांमधील विद्वानांचा आश्चर्याने वासलेला 'आ' बंद करण्याचे भान विसरवणारा आहे. ती रूढार्थाने स्त्रीवादी कधीच नव्हती, पण स्त्रियांना संपत्तीत अधिकार आणि विधवांना दत्तक घेण्याचा अधिकार देणारी ती या जगातील पहिलीच सुधारणावादी स्त्री असावी. तालेवार, तापट आणि बेशिस्त स्वभावाच्या माणसाशी लग्न झाले. त्याची साथ तशी अल्पकाळाचीच ठरली. त्याही स्थितीत आपल्या जहागिरीचा आर्थिक आणि प्रशासकीय कारभार तिने नेकीने, सचोटीने आणि अशा नेटाने चालवला की, त्या काळातील तो आदर्श ठरला. म्हणून या देवीला समकालीन असलेले कवी, पंडित श्रीधर चौबे (इ. स. १७८९) (संदर्भ : होळकर रियासतीचा सांस्कृतिक इतिहास; लेखक : डॉ. गणेश मतकर) लिहितात...

*धनि धन्य अहल्यामाई। करी जिन इंदौर सुहाई।*
*रानी हुलकरवंश महेश्वर राई। कलियुग माहि कीर्ती रही छाई॥*



होय, आज ३०० वर्षे होऊनही ज्या स्त्रीचे नाव 'पुण्यश्लोक अहल्यादेवी' असं घेतलं जातं त्या अहल्याबाई होळकरांचे हे त्रिशताब्दी जयंती वर्ष चालू आहे. अहल्याबाई होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ झाला. महाराष्ट्रात चौण्डी गावच्या माणिकराव शिंदेंची ही लेक. सुभेदार मल्हारराव होळकरांचे चिरंजीव खंडेराव यांची पत्नी. महापराक्रमी, तलवार चालवण्यात तसेच दरबारी राजकारणात धुरंधर असलेल्या मल्हारराव होळकरांची सून. जणू मल्हारराव होळकरांच्याच तालमीत तयार झालेली कुशल प्रशासक, धर्मपरायण, संवेदनशील दूरदृष्टी असलेली आणि मातेच्या मायेने आपल्या प्रजेची काळजी घेणारी कर्तृत्ववान राणी, भारतीय इतिहासात महाराणी अहल्याबाई होळकर या नावाने प्रसिद्धी पावली.

अहल्याबाई होळकरांनी आपल्याला मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. आपल्या सुनेला तलवार चालवणे, घोडेस्वारी, दरबारी रितीभाती, राज्यकारभार, राजकारण, जमाखर्च व्यवहार या सोबतच उत्तम स्वयंपाक करता येणे, ती गृहकृत्यदक्ष असणे हे आवश्यक आहे हे समजून, त्यानुसार तिच्या सर्व शिक्षणाची व्यवस्था आपल्या नजरेखाली करणारी गौतमाबाई सासू म्हणून लाभली. अहल्याबाईंनी केवळ हे सगळे आत्मसातच केले नाही, तर त्या, या सर्व कलांमध्ये पारंगत झाल्या. (जी सासू आपल्या सुनेला विविध कला-गुणांचे शिक्षण देते ती त्याच सुनेला निरक्षर ठेवणे कसे शक्य आहे?) मुळातच अतिशय हुशार असलेल्या अहल्याबाईंनी आपल्याला सासू-सासऱ्यांकडून मिळालेल्या राजकीय, आध्यात्मिक, धार्मिक, व्यावहारिक शिक्षणाचा वापर केवळ लोकहितासाठी केला. या शिक्षणाविषयीचा वसा अहल्यादेवींनी पुढे नेत जणू राजधर्माचा या पृथ्वीतलावर आविष्कारच करून दाखविला. या महाराष्ट्राच्या मातीत छत्रपती शिवाजी महाराजांनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्माची सांगड राजकारणाशी घालून हिंदू राजधर्म तत्त्वज्ञानाचे प्रकटीकरण अहल्यादेवींनीच केले, असे म्हणावे लागते. यात त्यांच्या सासू-सासऱ्यांनी म्हणजे गौतमाबाई आणि मल्हारराव यांनी केलेले संस्कार दिसून येतात. त्याकाळी स्त्रियांना इंग्रजी शाळेचे शिक्षण मिळत नसले, तरी प्रत्येक आई आणि सासू आपल्या मुलीला आणि सुनेला जीवन जगण्यास उपयोगी असलेल्या कौशल्यांचे शिक्षण मिळेल, याची व्यवस्था करीतच असत. त्यामुळे या महाराष्ट्र देशात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊंपासून जवळजवळ प्रत्येकच पिढीत कर्तबगार स्त्रियांची एक परंपरा दिसून येते.

मल्हारराव होळकरांच्या अनुपस्थितीत संस्थानचा कारभार अहल्यादेवीच पाहात असत. व्यवहाराला त्या अतिशय चोख आणि कारभाराला तत्पर असल्याने, मोहिमांच्या निमित्ताने सतत मुलूखगिरीवर बाहेर असले, तरी सुभेदार मल्हारराव होळकर आश्वस्त असतं. उलटपक्षी अनेकदा ते अहल्याबाईंशीच सल्लामसलत करीत, मनातले विचार बोलून दाखवत असत. त्यांच्या सल्ल्यानुसार अनेक विषयांवर सुभेदार निर्णय घेत असत, असे होळकर रियासतीचा अभ्यास करणारे सांगतात. इंदूर संस्थानमध्ये कायदा सुव्यवस्था निर्माण करणे, आपल्या प्रजेची सर्वतोपरी काळजी घेणे हे त्यांचे कर्तव्यच होते. पण संस्थानच्या बाहेर या देशाच्या विविध भागांत त्यांनी केलेले काम त्यांच्या राजधर्माच्या उत्तम जाणिवेचे द्योतक आहे. प्रजेला फक्त सुरक्षा पुरेशी नसते तर त्यांचा आर्थिक, सामाजिक व गुणात्मक विकास व्हायला हवा म्हणून त्या सातत्याने प्रयत्नशील असतं. महेश्वर येथे विणकरांना वसवून, स्वस्त दरात चांगल्या दर्जाचे रेशीम त्यांना मिळेल अशी व्यवस्था करून त्यांनी साड्या निर्मितीचे केंद्र निर्माण केले. हे केंद्र तेव्हापासूनच भारतभर आणि भारताबाहेरदेखील महेश्वरी साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. भारताच्या अनेक भागात हिंदू तीर्थक्षेत्री त्यांनी मंदिरं, धर्मशाळा, अन्नक्षेत्र स्थापन करून तेथील एतद्देशीय लोकांना आणि कारागिरांच्या हाताला काम दिले. त्यामुळे अस्सल भारतीय निर्माणशास्त्र व कलाकारी टिकून राहिली. यासाठी राजाला विकासासाठी आवश्यक अशी एक दृष्टी असावी लागते. फक्त आपल्याच अधिकार क्षेत्रातील प्रजाजनाचा नव्हे तर अखिल हिंदू प्रजाजनांचा विचार करून या देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक धर्मस्थळांवर विविध सोयीसुविधांची निर्मिती करणे. या कामी होळकर संस्थानचा निधी न वापरता आपल्या वैयक्तिक मिळकतीचा वापर करणे यासाठी एक विशाल दृष्टिकोन आणि अपार औदार्याची जन्मजात देणगी असावी लागते. या दोन्ही गुणांची जन्मजात देणगी लाभलेल्या अहल्याबाई होळकर या त्यामुळे साक्षात देवता ठरतात. या अहल्यादेवींच्या ३०० व्या जन्मशताब्दी वर्षात या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा पुढील काही लेखांमधून आपण सखोल ओळख करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. **(क्रमशः)**

९८८१२४२२२४

---

## वेध

**संजय रामगिरवार**

# प्लॅस्टिकचा विस्फोट!

'नेचर'मध्ये प्रकाशित एका अध्ययनाने वैश्विक चिंता निर्माण केली आहे. जगात प्लॅस्टिकचा वाढता वापर धोकादायक आहेच. त्यातही अवघ्या जगातील प्लॅस्टिकच्या प्रदूषणात भारताचा पाचवा क्रमांक लागतो, हे आम्हा भारतीयांसाठी जास्त धक्कादायक आणि धोकादायक आहे. आपला देश तब्बल ५.८ मिलियन टन प्लॅस्टिक जाळतो आणि ३.५ मिलियन टन पर्यावरणात सोडतो. यंदा ९.३ मिलियन टन प्लॅस्टिकचे उत्पादन आम्ही केले असून हे मागच्या वर्षीपेक्षा फार अधिक आहे, यावर गंभीर चिंतन व्हावे अशी सद्यस्थिती नक्कीच आहे. नायजेरिया ३.५, इंडोनेशिया ३.४ आणि चीन २.८ मिलियन टन प्लॅस्टिक निर्माण करतो. हे आकडे आपण कधीच ओलांडले आहेत. अवघ्या देशात २५१ एम. टी. प्लॅस्टिकचा कचरा तयार होतो. जवळपास दोन लाख ऑलिम्पिकचे स्वीमिंग पूल भरेल एवढा हा कचरा आहे बघा. त्यातही ५२.१ एम. टी. एवढा म्हणजे एकूण प्लॅस्टिकचा पाचवा भाग अद्याप अप्रबंधित आहे, म्हणजेच तो निस्तरला जात नाही. जे प्लॅस्टिक पुनर्चक्रित होत नाही किंवा उघड्यावर जाळला जातो तो अप्रबंधित गटात मोडतो. तर ज्या प्लॅस्टिकची विल्हेवाट लावता येते म्हणजेच, जे पुनर्चक्रित करता येते किंवा जमिनीत गाडता येते असा कचरा प्रबंधित वर्गात मोडतो. जाळल्या जाणाऱ्या कचऱ्यातून कार्बन मोनाक्साईडची निर्मिती होते, जी फार घातक आहे.



चिंतेची बाब म्हणजे, या प्लॅस्टिकपासून जगातील अगदी माऊंट एव्हरेस्टच्या पहाडापासून तर खोल समुद्रापर्यंतचा भागही सुटलेला नाही. तेथेही प्लॅस्टिक आहे. साधारणतः जे विकसित देश आहेत, जसे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप हे प्लॅस्टिकचे उत्पादन जरी जास्त करीत असले, तरी ते त्यास प्रबंधित करतात. त्यांच्याकडे अद्ययावत तंत्रज्ञान आणि साधनसामग्री असल्याने त्यांचे होणारे प्रदूषण तुलनेत कमी असते. अविकसित देश किंवा विकसनशील देशात मात्र निर्माण होणाऱ्या प्लॅस्टिकच्या उत्पादनाची विल्हेवाट लावण्याची पद्धत सुनियोजित नाही आणि अशा देशांमध्ये प्लॅस्टिकचे प्रदूषणही जास्त आहे. दक्षिण एशिया, उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिणपूर्वी एशियामध्ये प्लॅस्टिकच्या कचऱ्याचे उत्सर्जन अधिक आहे. तुलनेत उच्च उत्पन्नाच्या देशात अधिक प्लॅस्टिक निर्माण होत असतानाही त्यांचे उत्सर्जन मर्यादित आहे. जवळपास ६९ टक्के प्लॅस्टिकचे प्रदूषण केवळ २० देशांतून होत आहे, असे अध्ययन सांगते.

हे आकडे चिंताजनक असताना त्याबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर काही उपाययोजना होत नाही का, असा प्रश्न आपसूकच पडू शकतो. प्रयत्न निश्चितपणे होत आहेत; मात्र याबाबत मोठी संधी अद्याप झालेली नाही, हे दुर्दैवाने म्हणावे लागेल. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. २०१५ नंतर यावर महत्त्वाचे पाऊल उचलले जाणार होते. त्यावर साधक-बाधक चर्चाही झाली, पण काही देशांनी त्यास विरोध दर्शवला. त्यामुळे सर्वानुमते ही संधी होऊ शकली नाही. ज्या देशांमध्ये जीवाश्म आणि रासायनिक इंधनाचा वापर होतो. मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचे उत्पादन होते अशा देशांचे म्हणणे आहे की, प्लॅस्टिकचे उत्पादन मोठी समस्या नाही. केवळ त्यास प्रबंधित करण्याची गरज आहे. उलट काही देश सिंगल युज प्लॅस्टिकवर सरसकट बंदी घालावी, या मताचे आहेत.

'सायन्स ॲडव्हॅन्टेज'च्या अहवालातून असे समोर आले की, एक टक्का प्लॅस्टिकपासून एक टक्का प्रदूषण वाढते. यावरून प्लॅस्टिक किती घातक आहे, याची कल्पना येऊ शकते. हे कळत असतानाही जवळजवळ सारेच देश, त्यातही अविकसित आणि विकसनशील देशांतून मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा वापर होत आहे. किंबहुना, आपणसुद्धा साधी भाजी आणायला जातो तेव्हा पिशवी घेऊन जात नाही, तर सिंगल युज प्लॅस्टिकची पिशवी मागतो आणि ती घरी घेऊन येतो. तिचा वारंवार विविध कामांसाठी वापर करतो आणि एकेदिवशी ती उघड्यावर फेकून देतो. ती नष्ट होत नाही आणि जमीन व पाण्याचे प्रदूषण निर्माण करते. तेच पाणी आपण पितो आणि असेच खाद्य आपण खातो. गरम गरम वस्तू प्लॅस्टिकच्या डब्यात पार्सल म्हणून घरी आणतो. तोवर त्यात रासायनिक प्रक्रिया झालेली असते, ते खाद्य आपण तर खातो आणि आपल्या चिमुकल्यांनाही देतो, हे किती गंभीर आहे. यावर खरोखर चिंता आणि चिंतन करण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही का?

९८८१७१७८३२

---

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# काट्याची टक्कर; पण येणार महायुतीच!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. पुढच्या महिन्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. दसऱ्यानंतर तारीख येईल. दिवाळीनंतर फटाके फुटतील. यावेळची निवडणूक एकदम वेगळी असणार आहे. महायुती आणि महाआघाडी आमनेसामने आहेत. टक्कर काट्याची आहे. १० वर्षांपूर्वी अशीच स्थिती होती. दोन काँग्रेसची आघाडी होती. विरोधात भाजपा आणि शिवसेना यांची युती होती. शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटल्यामुळे यावेळी एकेक पक्ष दोन्ही बाजूला वाढला आहे. सहा प्रमुख पक्ष आणि जवळपास तेवढेच लहानसहान पक्ष मैदानात असले, तरी लढती थेट होतील. चार महिन्यांपूर्वी झालेल्या निकालाची पुनरावृत्ती विधानसभेत पाहायला मिळेल. महाआघाडीची हवा आहे, असा नॅरेटिव्ह विरोधकांनी चालवला आहे. मात्र, त्यात दम नाही. लोकसभा निवडणुकीची गणितं विधानसभा निवडणुकीत चालत नाहीत. स्थानिक राजकारण प्रभावी ठरते. यावेळी उमेदवारांची भाऊगर्दी राहणार आहे. त्यामुळे कोण दुसऱ्याची कशी आणि किती मतं खातो, त्यावर निकाल ठरेल. यावेळी महाआघाडीमध्येच एकोपा नाही. 'शिल्लक सेने'चे सुप्रीमो उद्धव ठाकरे एकटे पडले आहेत. काँग्रेसवाले हवेत आहेत आणि शरद पवार कुठे बसतील याचा अखेरपर्यंत भरवसा नाही. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? यावरून वाद घालून महाआघाडीने प्रचंड अविश्वासाचे वातावरण निर्माण केले आहे. याच्या नेमके उलट चित्र महायुतीत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला आळस भोवला. आता भाजपाने निवडणूक गंभीरपणे घेतली आहे. खुद्द अमित शाह लक्ष घालत आहेत. लालबागच्या राजाच्या दर्शनाला शाह मुंबईत आले तेव्हा हे स्पष्ट जाणवले.

बाळासाहेब ठाकरे होते तोपर्यंत युतीत जागावाटपाचा पेच उद्भवला नाही. थोडी घासाघीस व्हायची. पण शेवटी बाळासाहेब म्हणत तो अंतिम शब्द प्रमाण मानला जाई. बाळासाहेब गेले आणि उद्धव ठाकरे यांच्या महत्त्वाकांक्षेने फणा काढायला सुरुवात केली. २०१४ च्या निवडणुकीत जागावाटपाचा वाद झाला तेव्हा भाजपानेच युती तोडली. युती तुटल्याची घोषणा करण्याचे काम एकनाथ खडसे यांच्याकडे सोपवले होते. याच निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांचीही आघाडी तुटली होती. मोदी लाटेत भाजपाने ही निवडणूक जिंकली. शिवसेनेसोबत युती करून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनले. मागील निवडणूक भाजपा आणि शिवसेनेने युतीत लढवली. युतीला सत्तेत बसायचा जनादेशही मिळाला. मात्र उद्धव ठाकरेंनी दगाबाजी केली, शरद पवारांसोबत बसले आणि मुख्यमंत्री झाले. इथपासून भाजपा आणि ठाकरे सेनेत शत्रुत्व सुरू झाले. पुढे त्यांच्याच आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बंड केले. अडीच वर्षांतच महाआघाडी सरकार पडले. सत्तेच्या मोहात माणूस कसा जातो त्याचा नमुना म्हणजे उद्धव ठाकरे आहेत. शरद पवारांची कीर्ती जगजाहीर असताना उद्धव त्यांच्या जाळ्यात फसले. पवारांना देवेंद्र फडणवीस यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होऊ द्यायचे नव्हते. त्या कटकारस्थानात त्यांनी उद्धव यांना सोबत घेतले. उद्धव यांना अडीच वर्षांची सत्ता मिळाली. मात्र, भाजपासारखा विश्वासार्ह मित्र ते गमावून बसले. एकेकाळी हिंदुत्वाच्या डरकाळ्या फोडणारा हा 'वाघ' आज शरद पवार आणि काँग्रेसच्या ताटाखालचे 'मांजर' बनला आहे. प्रखर हिंदुत्वाची भाषा करणारे उद्धव आज मुस्लिमांचे तुष्टीकरण करायला लागले आहेत.

उद्धव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे होते. त्या दिशेने त्यांनी डाव टाकला. पण शरद पवारांनी तो त्यांच्यावरच उलटवला. 'निवडणुकीआधी महाआघाडीच्या मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा,' असा आग्रह ठाकरेंनी धरला. शरद पवार ते मान्य करायचा प्रश्नच नव्हता. पवारांच्या मनातला चेहरा काही वेगळा आहे, हे लक्षात आल्याने ठाकरेंनी दिल्ली गाठली. सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या भेटीसाठी तीन दिवस तळमळत होते. तिथेही डाळ शिजली नाही. 'ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री,' असा फॉर्म्युला सांगत पवारांनी उद्धव यांना त्यांची जागा दाखवून दिली. 'ना घर का, ना घाट का,' अशी ठाकरे यांची अवस्था आहे. 'मी राहीन किंवा तू राहशील,' अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांना ललकारणारे उद्धव आज एकटे पडले आहेत. महाआघाडीचा 'चेहरा' होऊ पाहणारे उद्धव आज आघाडीतल्या मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून बाद झाले आहेत. 'मुख्यमंत्री व्हायचे माझे कधीही स्वप्न नव्हते,' असे सांगत फिरत आहेत. पण अजून जिरलेली नाही. 'मला कोणी रिटायर करू शकत नाही,' असे ते नुकतेच म्हणाले. पण अजून कोणती रिटायरमेंट बाकी आहे? शिवसेना एकसंध होती तेव्हा तिला सुमारे १८ टक्के मतं मिळायची. ताज्या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला साडेतेरा टक्के मतं मिळाली. याचा अर्थ शिवसेनेचा कट्टर मतदार शिंदेंच्या शिवसेनेकडे वळला आहे. उद्धव यांच्याकडे चणेफुटाणे उरले आहेत. 'बापाचा पक्ष चोरला' म्हणून आपल्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती आहे, असे उद्धव प्रचारात सांगतात. पण त्याबद्दल कुठलीही सहानुभूती नाही, हे ताज्या निवडणुकीने दाखवून दिले आहे.

राजकारणाला विचित्र दिवस आले आहेत. राजकारणाचा चिखल झाला आहे. आतापर्यंत जात चालत आली. आता समाजाच्या नावावर मतं मागितली जात आहेत. हल्ली कोणाचे सरकार येईल आणि आले तरी किती दिवस टिकेल, हे छातीठोकपणे सांगता येत नाही. शरद पवारांची यांची ताकद ५०-६० आमदारांची आहे. काँग्रेसही त्याच्या आसपास आहे. ठाकरे लवकर आऊट होतील. या पृष्ठभूमीवर महायुती भक्कम दिसते. महाराष्ट्राला कधीही एवढे सहाय्य मिळाले नाही तेवढे मोदी राजवटीत मिळाले. मात्र, कामावर हल्ली मतं मिळतात का, हाही प्रश्नच आहे. शर्ट बदलावा तसा पुढारी पक्ष बदलत आहेत. निवडून एकाला दिलं आणि भलतेच सरकार आलं, असा अनुभव गेल्या निवडणुकीत जनतेला आला. यंदा काय होणार? 'माझ्या हाती सत्ता द्या. मी महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलतो,' असे शरद पवार नुकतेच बोलले. ५० वर्षे सत्ता हातात होती. काही केले नाही. आता काय दिवे लावणार? काँग्रेसही आतापर्यंत लोकांना मूर्ख बनवत आली. मतदार मात्र शहाणा झाला आहे. तो आता भूलथापांना बळी पडणार नाही. काकाचा पक्ष फोडणारे अजित पवार गेल्याच वर्षी महायुतीत आले. उपमुख्यमंत्री बनले. निकालानंतर ते कुठे असतील? काका-पुतण्या निकालानंतर एकत्र येतील का, अशी चर्चा का चालते? अजितदादांच्या राष्ट्रवादीची मतं या निवडणुकीत मित्रपक्षांना ट्रान्सफर का झाली नाहीत? या वास्तवाचे काय उत्तर आहे? पण अजितदादा गडबड करणार नाहीत. त्यांचे परतीचे दोर कापले आहेत. तरीही गडबड झाली तर 'कपाटात गेलेल्या आपल्या फाईली' पुन्हा उघडल्या जातील, याची भीती दादाला असणार!

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## श्राद्ध आणि उद्देश

महालय श्राद्धाच्या निमित्ताने प्रत्येकाने श्राद्ध व त्यामागील उद्देश समजून घ्यायची गरज आहे, तेवढ्याच श्रद्धेने श्रेय, मोक्ष आणि तृप्तीसुद्धा. मृत्युलोक संपल्यावर पितरांना ज्या कुळात जन्म मिळेल तिथे त्यांना धनसंपन्नता आणि आध्यात्मिक आनंद प्राप्त व्हावा. मोक्षाचा मार्ग सुलभ व्हावा आणि अन्नोदकांनी त्यांची तृप्ती व्हावी या कर्तव्याने महालयात सर्व पितरांची आठवण करून आपण त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा अंशतः प्रयत्न करावा. अन्नोदक विधिपूर्वक केल्यास पितर तृप्त होतील; परंतु त्यांची गती थांबेल. म्हणूनच प्रारब्धाने आलेल्या बऱ्या-वाईट गोष्टी देहाने भोगाव्या व मनाने कर्तव्य व भगवंताचे नामस्मरण करून आपल्या विद्वत्तेवर गर्व न करता श्राद्ध करावे. एवढेच नाही तर मृत्यूनंतर सद्गती प्राप्तीसाठी आत्ताच धार्मिक ठिकाणी ग्रंथ भेट करा, हॉस्पिटलला एखादी व्हील चेअर दान करा, अन्नक्षेत्रासाठी अन्नदान करण्यासाठी एखादी एफडी तयार करा, सार्वजनिक ठिकाणी पाण्याची रांजणे बसवा, एखाद्या अनाथाला शिक्षणासाठी मदत करा, आपल्या मुलांच्या मनात परोपकाराची भावना रुजवा आणि अशाच गोष्टींचा प्रचार आणि प्रसार केला गेला तरच श्राद्ध या धार्मिक विधींवर सर्वांचा नक्कीच विश्वास बसेल. यासाठीच पितरांचे ऋणी असल्याचे स्मरण सर्वांनी करा व चिंतनही करा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

## हिंदुत्ववादी पक्षास मतदान

लवकरच म्हणजे १२ ऑक्टोबर २४ ला विजयादशमी येत आहे. यानिमित्ताने १९८४ च्या रा. स्व. संघाच्या विजयादशमी उत्सवात तृतीय सरसंघचालक प. पू. बाळासाहेब देवरस यांचे झालेले भाषण आठवले. तेव्हा त्यांनी काँग्रेस शासनाच्या मुस्लिम लांगूलचालनाची व हिंदूंवरील अन्यायाची उदाहरणे देऊन पुढे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत हिंदुहितकारी पक्षास मतदान करण्याचे स्पष्टपणे आवाहन केले होते. आजही देशात विशेषतः भाजपेतर राज्यांमध्ये हिंदूंवर मुख्यतः बंगाल, केरळमध्ये भयानक अत्याचार होत आहेत. मुस्लिम दहशतवाद्यांकडून 'सर तनसे जुदा'चे नारे दिले जात आहेत. राजस्थान व महाराष्ट्रात भाजपेतर शासन असताना हिंदूंचे खूनही पडले. तामिळनाडूत मुख्यमंत्र्यांच्या मुलाने सनातन धर्म नष्ट करण्याचा नारा दिला. फक्त भाजपा व शिवसेनेचा शिंदे गट हिंदुहितकारी विचार करताना दिसतात. लवकरच महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक येत आहे. तेव्हा या दोन पक्षांना भरघोस हिंदूंची मते मिळणे अत्यावश्यक आहे. याकरिता भाजपा नेते व प्रचार यंत्रणेकडून प्रत्येक मतदारांपर्यंत संपर्क साधून कार्ड वाटप होणे हाच मार्ग आहे. याकडे २०१९ पासून योग्य लक्ष दिले जात नाही. बुथवरील कार्यकर्त्यांना प्रचार साहित्य व मतदार कार्ड उशिरा मिळाल्याने पुरेसे कार्ड वाटप झाले नाही. परिणामी कमी मतदान होऊन भाजपाची पीछेहाट झाली. लोकसभा निवडणुकीत तर दारुण पराभव झाला. (याउलट गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा या राज्यांत भाजपाला चांगले यश मिळाले. तेलंगणमध्ये सुधारणा झाली.) याकडेच लक्ष देऊन भरघोस मतदान करून घेण्यासाठी महाराष्ट्रात भाजपाने लक्ष देणे ही काळाची गरज आहे. हिंदू संघटनांनीही हिंदू मतदारांना जागृत करणे आवश्यक आहे. १९९१ मध्ये लोकसभा निवडणुकीत विश्व हिंदू परिषदेचे आचार्य धर्मेंद्रजी महाराज, अशोकजी सिंघल इत्यादी नेते उघडपणे प्रचार करीत होते, याची आठवण ठेवावी. भाजपानेही अशा संघटनांचे सहकार्य घ्यावे.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

●● ●●

## सुखद अनुभवाची 'समृद्धी'

अलिकडेच कारंजा लाड येथे जाण्याचा आणि नृसिंह सरस्वती महाराजांच्या दर्शनाचा योग आला. या निमित्ताने का होईना मला पहिल्यांदा समृद्धी महामार्गावरून प्रवास करण्याचा योग आला. मित्रासोबत त्याच्या कारमध्ये आणि तेही समोरच्या सीटवर बसून हा प्रवास करता आला. आधी समृद्धीवरून प्रवास करायचा म्हणून थोडी धाकधूक, भीती होती. प्रत्यक्ष जेव्हा जाण्या-येण्याचा प्रवास केला तेव्हा भीती कुठच्या कुठे गायब झाली होती. नावाला साजेचा हा समृद्धी मार्ग आहे. दुचाकीला प्रवेश बंदी असल्यामुळे ही वाहने तिथे दिसत नाही. शिवाय लहानसहान गाव मार्गात नसल्यामुळे इतर वाहनांची गर्दीही या रोडवर दिसत नाही. जड वाहतूक म्हणून ट्रक्स तिसऱ्या लेनमधून संथ गतीने प्रवास करीत असताना हलकी वाहने मधल्या पट्ट्यात आपल्या नियंत्रित गतीने धावत असतात. एखाददुसरे वाहन पहिल्या रांगेतून वेगाने निघून जाते. मात्र, मार्गावर वाहनांची भाऊगर्दी नसल्यामुळे अशा वाहनांनाही फारशी भीती जाणवत नसावी किंवा त्यांचा हा नियम प्रवास असावा. हा मार्ग सरळ सरळ असल्यामुळे वाहन चालविताना आपण संमोहित होऊ शकतो. त्यामुळे आपले मन एकाच बाबीत जास्त गुंतले जाऊ नये म्हणून मार्गात जागोजागी रंगीबेरंगी कलाकृती ठेवण्यात आल्या आहेत. एकूणच काय की आपण अतिवेगाचा हव्यास न करता स्वत:वर संयम ठेवून प्रवास केला तर समृद्धीचा प्रवास निश्चितच सुखकर होऊ शकतो.

**मनीष कुळकर्णी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com



# ऑर्किड महाविद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे इंजिनिअर्स डे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स या विभागात विद्यार्थी संघटनेच्या उद्घाटनानिमित्त सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पोलिस निरीक्षक विकास दिंडोरे, ए.पी. आय रोहिदास पवार आणि त्याचे सहकारी यांनी सायबर गुन्हेगारीचे प्रकार, डेटा सुरक्षा, सुरक्षित पासवर्ड व्यवस्थापन आणि इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले तसेच सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण कसे करावे याबाबत सखोल माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली.

प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी डॉ. ए. एस. काशिद, डॉ. एम.बी. पाटील, डॉ. व्ही. व्ही. बाग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. विजय संगोळगी, प्रा. आश्लेषा अधटराव, श्री. चेतन पवार, श्री. श्रेयस नांदूरकर, श्री. साजिद बागवान, कु. लक्ष्मी नागनसुरे, श्री. परशुराम बोगा यांनी परिश्रम घेतले.

## फायटरने मारहाण करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

भवानी पेठेतील एसव्हीसीएस हायस्कुलजवळ फायटरने तरूणास मारहाण करणाऱ्या दोघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत रोहन अशोक कोरे (वय २१, रा. श्रीशैल नगर, भवानी पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन मयूर बिराजदार, प्रशांत कोळी (रा. श्रीशैल नगर, भवानी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास रोहन कोरे व त्याचे मित्र ओंकार भिसे, गणेश कोळी, अविनाश भिसे हे एसव्हीसीएस हायस्कुलजवळ चेष्टामस्करी करीत मिल्कशेक पित उभे होते. त्यावेळी तेथून मयूर व प्रशांत हे दोघे जात होते. यावेळी चेष्टामस्करीत जोरजोरात हसणाऱ्या रोहन यास त्या दोघांनी तु मला बघून का हसत आहे अशी विचारणा केली. त्यावेळी रोहन याने आमचा विषय वेगळा चालू आहे असे सांगत असताना मयूर व प्रशांत यांनी त्यास लाथाबुक्क्याने मारहाण करून फायटरने मारहाण केली. यामध्ये रोहन हा जखमी झाला असून हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.


### कृषि उत्पन्न बाजार समिती, औसा

जा.क्र./२१३/कृउबासऔसा उ.बा. किल्लारी/प्लॉट वाटप/२४ दिनांक १९/०९/२०२४

**खुले प्लॉट जाहीर लिलाव सुचना पत्र**

मा. पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. पणन ५/कृउबास/औसा/प्लॉट वाटप/२४/२८३९ दिनांक ०१/०८/२०२४ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, औसाचे उपबाजार पेठ किल्लारी येथील मंजूर लेआऊट मधील लातूर उमरगा रोडलगतचे ३५ खुले प्लॉट वाटपास कलम १२ (१) ची मंजूरी दिलेली आहे. त्यास अनुसरुन शेतमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करणा-या व्यक्ती / अनुज्ञप्तीधारक यांचे कडून खुले प्लॉट जाहीर लिलावाव्दारे वाटप करण्यासाठी मागणीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्लॉटचा जाहिर लिलाव दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी लातूर - उमरगा रोडलगतचे उपबाजार पेठ किल्लारी येथील खुले प्लॉट मागणी करणा-यासाठी यापुर्वी अनामत भरलेल्या अनुज्ञाप्ती धारक अडते व्यापारी व इतर इच्छुक व्यक्ती यांनी प्लॉट मागणी साठीचे अर्ज बाजार समिती, औसा चे मुख्यकार्यालयातून घेऊन तो दिनांक २० सप्टेबर २०२४ ते दिनांक २४ सप्टेबर २०२४ रोजी पर्यंत कृषि उत्पन्न बाजार बाजार समिती, औसा चे मुख्यकार्यालयात साप्ताहीक सुटटीचे दिवस वगळून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:३० वा.ते सायंकाळी ५:३० वा. पर्यंत प्लॉट मागणी अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. जाहीर लिलावात सहभाग घेण्यासाठी २०००/-रु.अर्ज (फॉर्म) फी व १००००/- (दहा हजार रु) बोली बोलण्याकरीता अनामत रक्कम बाजार समितीकडे भरणा करणे बंधनकारक राहील. अर्जदार अपंग असल्यास अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अर्ज (फॉर्म) फी १०००/-रु व ५०००/- (पाच हजार रु) बोली अनामत राहील.

कृषि उत्पन्न बाजार समिती, औसाचे उपबाजार पेठ किल्लारी येथील प्लॉटची संख्या ३५ आहे. तसेच खुल्या प्लॉटची साईज हि एकसमान नाही. त्यामुळे याबाबत प्लॉट मागणी बाबतच्या अटी, शर्ती व नियम, प्लॉटअनामत व बयाना रक्कम, क्षेत्रफळ, साईज, मासिक भाडे इ. बाबतची सर्व कागदपत्रे नियम कार्यालयीन वेळेत कृउबास औशाचे कार्यालयात पाहावयास मिळतील. या बाबतचे सर्व कायदेशीर अधीकार बाजार समिती औसा राखुन ठेवत आहे.

**(टिप अंपगासाठीचे प्लॉट अरक्षीत ठेवले आहेत.)**

सही/- सचिव | सही/- उपसभापती | सही/- सभापती

**कृषी उत्पन्न बाजार समिती, औसा ता. औसा जिल्हा. लातूर**


# ईद-ए-मिलादचा शहरात उत्साह

## मक्का-मदिना प्रतिकृती साकारून काढण्यात आला जुलूस



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

मुस्लिम धर्मियांचा प्रमुख सण ईद-ए-मिलाद शहरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. ईद-ए-मिलाद निमित्त जुलूस कमिटीच्या वतीने शहरातील विजापूरवेस येथून जुलूस काढण्यात आला. या जुलूसमध्ये सोलापूर शहरातील अबालवृद्ध भाविकांनी सहभाग घेतला होता. सोमवार (दि.१६) सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद सण होता. परंतु गणेशोत्सवानिमित्त मुस्लिम बांधवांनी ईद-ए-मिलाद सणाचा जुलूस आज म्हणजेच गुरुवार (दि.१९ ) सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला. सकाळपासूनच विजापूर वेस येथे मुस्लिम बांधवांनी एकत्रित येत सर्वांना ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या. तदनंतर हातामध्ये हिरवा झेंडा घेऊन विविध घोषणा देत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये विविध रिक्षा आणि हातगाडे यांच्यावर मक्का मदीना यांची प्रतिकृती साकारण्यात आली होती. जागोजागी सरबत वाटप करून ईदच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान ईद-ए-मिलाद जुलूस कमिटीचे यू.एन.बेरीया यांसह पदाधिकारी यांनी जुलूसमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी जुलूस मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### बच्चे कंपनीने जुलूस मार्गावर साजरा केला उत्सव

ईद-ए-मिलाद जुलूस कमिटीच्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील जुलूस आयोजित करण्यात आला होता. यामध्ये आबालवृद्ध तसेच चिमुकल्या बालगोपाळांनी देखील उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. मशीद, मक्का-मदिना यांचे आकर्षक आणि वैविध्यपूर्ण अशी प्रतिकृती साकारून लक्ष वेधून घेतले.


### जाहीर समन्स

रे.मु.नं. १०/२०२४
निशाण ८

**बार्शी येथील मे. सि.ज.सि.डि.सो. यांचे कोर्टात**

१) **सौ. मिनाक्षी सुभाष जाधव,**
वय ५५ वर्षे, धंदा घरकाम,
रा. हत्तीज, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सुभाष नरहरी जाधव,**
वय ६१ वर्षे, धंदा शेती,
रा. हत्तीज, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **वादी**

विरुध्द

१) **प्रशांत सुभाष जाधव,**
वय- ३३ वर्षे, धंदा- माहित नाही,
रा. शेवट रहिवास- हत्तीज,
ता. बार्शी, जि. सोलापूर हल्ली बेपत्ता
२) **महाराष्ट्र सरकार**
**(याचे समन्स मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्यावर बजविण्यात यावे.)**
— **प्रतिवादी**

ज्याअर्थी, यातील वादी नं. १, २ यांनी या कोर्टात प्रतिवादी नं. १, २ यांचे विरूध्द सिव्हील डेथ डिक्लेरेशनचा दावा दाखल केलेला आहे सदर प्रकरणात प्रतिवादी नं. १ यांना दाव्यातील पत्त्यावर दाव्याचे समन्स काढूनही प्रतिवादी नं. १ हे गेल्या ८ ते १० वर्षापासून परागंदा / बेपत्ता असल्याचा अहवाल बेलिफ यांनी दिलेला आहे. वादी नं. १, २ हे प्रतिवादी नं. १ चे आई वडिल असून प्रतिवादी नं. १ हे सन २०१३ पासून परागंदा / बेपत्ता आहेत. म्हणून वादी नं. १, २ यांनी प्रतिवादी नं. १ बाबत सिव्हील डेथ डिक्लेरेशनचा दावा दाखल केलेला आहे व त्यांनी सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. १ यांना या जाहीर समन्सद्वारे या दाव्याकामी त्यांचे स्वतः वा वकिलामार्फत हजर होणेकरीता सदर जाहीर समन्स प्रसिध्द करण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअर्थी, तुम्ही प्रतिवादी नं. १ यांना या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, सदर दाव्याचे कामी पुढील नेमलेली ता. २३/१०/२०२४ रोजी तुम्ही स्वतः किंवा वकीलामार्फत हजर होवून दाव्यास म्हणणे दयावे. तुम्ही वर नमूद मुदतीत हजर न झालेस या कोर्टाकडून तुम्ही प्रतिवादी नं. १ यांचे काही एक म्हणणे नाही असे समजुन तुमचे विरूध्द पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. त्यानंतर त्याचे होणारे परिणामास सर्वस्वी तुम्ही जबाबदार राहाल. कळावे हे जाहीर समन्स माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे. ता.१८/०९/२०२४.

सही/- लिपिक | कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी



### जाहीर प्रसिध्दीकरण

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

**मोरे केदार बलभिम** - **अर्जदार**
**रा. बावी ता. माढा जि. सोलापूर**
विरुध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत बावी** - **सामनेवाला**
**ता. माढा जि. सोलापूर**

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे मुलगा राजवीर केदार मोरे यांचा जन्म दिनांक २८/१०/२०१७ रोजी बावी ता. माढा येथे झालेला आहे परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. बावी येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा बावी येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे मुलगा राजवीर केदार मोरे यांचे जन्म घटणेंची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख २५/१०/२०२४ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत / तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक २८/१०/२०१७ रोजीचे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक १८/०९/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
**क्र.२०२४/कुका (जन्म नोंद)**
**एसआर/१५०/२०२४**
**दिनांक ०३/०९/२०२४**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**



### औसा नगर परिषद कार्यालय, औसा जि. लातूर

दूरध्वनी क्र. (०२३८३)२२२०२३ web : www.mcausa.in
E-mail id - mcausa1956@gmail.com

जा.क्र./नप/आ.स्व.वि./२०२८/२०२४ दिनांक २७/०८/२०२४

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

औसा नगर परिषद कार्यालयातर्फे आरोग्य व स्वच्छता विभागात फॉगींग मशीन खरेदी करणे, डेंगूची फवारणी करीता (Sanitolin Super Liquid) खरेदी करणे, नालीवर (Herbo-Dust Powder) खरेदी करीताखरेदी करणेसाठी न.प. निधी / उपलब्ध निधिमधुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठा धारकांनी सदर साहित्य पुरवठा बाबतचे दरपत्रक सिलबंद पाकीट मध्ये दिनांक २५/०९/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत न.प. कार्यालयात मुदतीत आणून दाखल करावेत निविदा फार्म विक्री दिनांक १९/०८/२०२४ ते २५/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० पर्यंत स्वच्छता विभाग न.प. कार्यालय येथे मिळतील. तसेच परिपूर्ण भरलेले निविदा दरपत्रक संबंधित पुरवठा धारकाने दिनांक २५/०९/२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत दाखल करावेत. मुदती नंतर प्राप्त निविदाची विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी या विषयी नियम व अटी स्वच्छता विभाग न.प. औसा कार्यालयास पाहण्यास मिळतील.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | नग | टेंडर फॉर्म | टेंडर अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | फॉगींग मशिन | १ | ५००/- रुपये | २,०००/- रुपये |
| | Sanitolin Super Liquid 1. LTR | 500 LTR | | |
| | Herbo-Dust Powder 25Kg | ५० बॅग | | |
| | पेट्रोल फवारा यंत्र | २ | | |

**स्वाक्षरीत/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद, औसा**


# दारूच्या नशेत भिंतीला डोके आपटून घेतल्याने तरूण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**



दारूच्या नशेत स्मशानभूमीच्या भिंतीला डोके आपटून घेतल्याने तरूण जखमी झाला. विशाल अमरसिंग बिलोरेवाले (वय ३०, रा. बापूजी नगर स्लॉटर हाऊस, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. विशाल बिलोरेवाले याने १८ सप्टेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास मोदी स्मशानभूमी येथे स्वतःहून दारूच्या नशेत भिंतीला डोके आपटून घेतल्याने त्याच्या डोक्यास गंभीर इजा होऊन जखमी झाला. त्याला बहिण पिंकी मन्सावाले हिने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


### महाराष्ट्र शासन

**जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर**
**पत्ता :- गुरुनानक चौक, उजनीनगर, सोलापूर**

**ई निवीदा सुचना क्र. 08 सन 2024-25**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १ | को.प. बंधारा तामदर्डी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूरचे बांधकाम करणे. | २७२३.८८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १९/०९/२०२४ ते ०३/१०/२०२४
ई-निविदा उघडण्याचा दिनांक - ०४/१०/२०२४

**जा.क्र./निविदा/३४३०/२०२४-२५**
**दिनांक - १८/०९/२०२४**

**सही/-**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर**



### मध्य रेल्वे

**साहित्य व्यवस्थापन विभाग**
**ऑक्टोबर-२०२४ महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रम**

निविदा क्रमांक १२० टी. लिलाव कार्यक्रम/२०२४-२५ दिनांक:१६/०९/२०२४
भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापक, ऑक्टोबर-२०२४ महिन्यात खालीलप्रमाणे भंगाराच्या विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील:

| लिलाव आयोजित करणारे अधिकारी | लिलाव तारीख व दिवस | | | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| सिनी डीएमएम/एनजीपी | ०३/१०/२०२४ गुरुवार | १०/१०/२०२४ गुरुवार | २१/१०/२०२४ सोमवार | ७२१९६१२७५० |
| सिनी डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपो सह. | ०७/१०/२०२४ सोमवार | १५/१०/२०२४ मंगळवार | २३/१०/२०२४ बुधवार | ७२१९६११७५१ |
| सिनी डीएमएम/पीए | ०८/१०/२०२४ मंगळवार | १६/१०/२०२४ बुधवार | २४/१०/२०२४ गुरुवार | ७२१९६१३७५० |
| सिनी डीएमएम/बीबी | ०९/१०/२०२४ बुधवार | १७/१०/२०२४ गुरुवार | २८/१०/२०२४ सोमवार | ८८२८११९७५० |
| सिनी डीएमएम/एसयूआर | ११/१०/२०२४ शुक्रवार | २२/१०/२०२४ मंगळवार | २९/१०/२०२४ मंगळवार | ७२१९६१४७५० |
| डीवाय,सीएमएम (एस) एचक्यू एसएमएम (जी) सीआरडीकरिता | ०३/१०/२०२४ गुरुवार | १०/१०/२०२४ गुरुवार | २१/१०/२०२४ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय,सीएमएम (एम) पीआर | ०८/१०/२०२४ मंगळवार | १६/१०/२०२४ बुधवार | २४/१०/२०२४ गुरुवार | ८८२८११९७५५ |
| डीवाय,सीएमएम (सीडब्ल्यूई) एमटीएन | ०७/१०/२०२४ सोमवार | १५/१०/२०२४ मंगळवार | २३/१०/२०२४ बुधवार | ८८२८११९७७० |
| डीवाय,सीएमएम (एस)एचक्यू एएमएम/एचबीएचआर करिता | ०३/१०/२०२४ गुरुवार | १०/१०/२०२४ गुरुवार | २१/१०/२०२४ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय,सीएमएम (एसीएल) बीएसएल | ०९/१०/२०२४ बुधवार | १७/१०/२०२४ गुरुवार | २८/१०/२०२४ सोमवार | ७२१९६११७५० |

**टीप:-** आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केले जातील. कोणताही पूरक लिलाव स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार रद्द करण्याचा अधिकार रेल्वे प्रशासन राखून ठेवतो.

**टीप: A)** ई-लिलावमधून कोणतीही लॉट काढण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या लिलावामध्ये कोणत्याही डेपो/विभागाच्या कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वेने राखून ठेवला आहे. तसेच मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या पुढील लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील न विकल्या गेलेल्या लॉटची विक्री केली जाऊ शकते. **b)** शासनाप्रमाणे धोरण, जेथे भंगार सामग्रीच्या पुनर्वापरामध्ये पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश आहे, अशा लॉटची विक्री केवळ केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांना केली जाईल. **c)** ई-लिलाव कॅटलॉग वेबसाइटवर उपलब्ध असेल: www.ireps.gov.in व) ई-लिलाव, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणतीही मदत आवश्यक असल्यास, कृपया संबंधित लिलाव संचालन अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. वर किंवा Dy.CMM/Sales/HQ, मोबाईल क्र. 8828110761, ईमेल पत्ता dycmm.s.cstmgmail.com किंवा dycmmscr.railnet.gov.in -

**प्रिन्सिपल चीफ मटेरिअल्स मॅनेजर, सीएसएमटी**

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे
415


## कुडल गावात तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुडल गावात हनुमान मंदीराजवळ तरूणास लोखंडी पाईने मारहाण करण्यात आली. हणमंत यशवंत पुजारी (वय ४०) असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १८ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास कुडल येथील हनुमान मंदीराजवळ तु इथे का बसतोय, तु रोज का येतोस असे म्हणत राजू अर्जुन बगले व इतर ७ जणांनी मिळून लोखंडी पाईप व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. पुजारी यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## कल्याणी भादुले यांचे निधन

**पंढरपूर, दि.१९ सप्टेंबर-**



येथील कल्याणी उर्फ माई रेवणसिध्द भादुले (वय ८३) यांचे गुरुवारी पहाटे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पंढरपूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष रेवणसिद्ध भगवान भादुले यांच्या त्या पत्नी तर शैलेश भादुले यांच्या आई होत्या.


### तहसील कार्यालय, तुळजापूर

**(भुसुधार विभाग)**
**ता. तुळजापूर, जि. धाराशिव**

**जा.क्र. २०२४/महसूल/भुसुधार/कावि-११७ दि. २८/०६/२०२४**

**जाहिर प्रगटन**

प्रस्तुत जाहीर प्रगटनादवारे मौ. पिंपळा बु. ता. तुळजापुर जि. धाराशिव येथील सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार गोविंद अण्णाराव जाधव मौजे पिंपळा बु. ता. तुळजापूर यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे पिंपळा बु. ता. तुळजापूर येथील गट नं. २३० मधील क्षेत्र २.८३ च्या ७/१२ वरील इतर अधिकार मध्ये सा.कु. ८/६/५८ नाना बाबाजी जाधव (१), ही नोंद कमी करणे बाबत अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी उक्त जमीनवरील क्षेत्राला इतर अधिकार मध्ये सा.कु. ८/६/५८ नाना बाबाजी जाधव (१), ही नोंद ही नोंद कमी करणे बाबत आवश्यकती कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेली आहेत. सदर जमिनी बाबत या कार्यालयास कुळ नोंद कमी करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणा-या व्यक्तीचा काही अक्षेप, उजर, तक्रार, इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात तहसील कार्यालय तुळजापूर येथे कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

अन्यथा विहीत मुदतीत कोणाचा आक्षेप, उजर, तक्रार नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर, तक्रार, विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(अरविंद बोळंगे)**
**तहसीलदार तुळजापूर**



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- जिल्हा सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी अक्कलकोट (ग्रामीण) येथील मिळकत यासी बिनशेती गट क्र. ९२१/१अ/१अ/२/१/अ२ पैकी प्लॉट नं. ३२ यासी हल्लीचा प्लॉट नं. ९२१/१/अ/१/अ/२/१अ२/३२/२ याचे क्षेत्र १.६९.१४ आर.चौ.मी. ही घरजागा यासी चतुः सिमा पूर्वेस रस्ता, पश्चिमेस मोरे यांची घरजागा, दक्षिणेस प्लॉट नं. ३७ पैकी व उत्तरेस नरसोया पुकाळे यांची जागा. येणेप्रमाणे चतुः सिमा घरजागा ही श्री. सविता अनिल पत्की यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. तरी सदरहू मालकांनी सदरील घरजागा ही आमचे अशिल श्रीमंत यशवंत खसकी रा. अक्कलकोट यांना खरेदीने देण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहु घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी परंतु सदर घरजागेवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील घरजागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांनी सदर घरजागेचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. १९/०९/२०२४

**सही/-**
**ॲड. विश्वनाथ एच. मगी**
**बी.एस. एल., एलएल.बी.**
**युनिटी ड्रिम्स अपार्टमेंट, फ्लॅट नं. ८,**
**दुसरा मजला प्रेमनगर, विजापूर रोड,**
**जुळे सोलापूर, अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो.नं. ९८९०५४३९२९**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे कुगांव, तसेच मौजे जेऊर, ता. करमाळा येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मोजे कुगांव, ता. करमाळा येथील जमीनी, ग.नं. १३१ पैकी क्षेत्र ०१ हे. ०० आर, आकार ०२ रू. ९० पैसे, ग.नं. १३० पैकी क्षेत्र ०१ हे. ४० आर, आकार ०२ रू. ०० पै., ग.नं. १२८ पैकी क्षेत्र ०२ हे. ९८ आर, आकार ०६ रू. २५ पै., ग.नं. २७ पैकी क्षेत्र ०१ हे. ६२ आर, आकार ०१ रू. ३५ पै., ग.नं. ८५/२ पैकी क्षेत्र ०१ हे. ६० आर, आकार ०१ रू. ६५ पै., ग.नं. ९०/१/ल पैकी क्षेत्र ०२ हे. ०४ आर, आकार ०२ रू, ०५ पै., ग.नं. १५५/५ पैकी क्षेत्र ०० हे. ८१ आर, आकार ०१ रू. ३० पै., ग.नं. १४५ पैकी क्षेत्र ०२ हे. ०२ आर, आकार ०२ रू. ७५ पै., ग.नं. ७५ पैकी क्षेत्र ०४ हे. ५२ आर, आकार ०५ रू. ४० पै., ग.नं. १३७/२ पैकी क्षेत्र ०० हे. ४० आर, आकार ०० रू. ४५ पै., ग.नं. १३६/१ पैकी क्षेत्र ०४ हे. ३७ आर, आकार ०३ रू. ५८ पैसे, ग.न १३६/२ पैकी क्षेत्र ०१ हे. ६८ आर, आकार ०१ रू. ७५ पै. येणेप्रमाणे वर्णनाच्या, नदी व उजनी धरण पाणलोट बागायत जमीनी, त्यावरील इले. मोटर्स, पाईपलाईन, तसेच आतील सर्व झाड झुडूप दगड माती ताली वगैरे तदंगभूत वस्तुसह.

वर वर्णन केलेल्या जमीनी, आमचे अशिल नं. १ चे सासरे अर्जुन पांडूरंग डोंगरे, दिर- प्रकाश व नागेश अर्जुन डोंगरे, चुलत सासरे विठ्ठल व धनंजय पांडूरंग डोंगरे, तसेच त्यांच्या बहिणी-चंद्रभागा थोरात वगैरे यांचे नावे असून, त्या त्यांचे वडिलार्जित मिळकती आहेत. आमचे अशिल आणि वरील सर्वांचे अविभक्त एकत्र कुटूंब होते व आहे. सदर जमिनी सदर कुटूंबाचे समाईक मालकीच्या व कब्जे वहिवाटीच्या आहेत. त्याबाबत अद्यापही वाटप झालेले नाही. सदर जमीनीमध्ये आमचे अशिलांचे समाईक अविभक्त असे हिस्से होते व आहेत. आमचे अशिलांना सदरचे लोक सांभाळतही नाहीत, तसेच त्यांचे पोटगीची त्यांनी कसलीही व्यवस्था केलेली नाही. सदर मिळकतींचे आपसात वाटप करून देणेस, सदरचे लोक तयार नाहीत. त्यामुळे त्याबाबत आमचे अशिल अलहिदा कायदेशीर कारवाई करत आहेत.

आमचे अशिलांना सदर मिळकतीमधील हक्क हिस्से मिळू नयेत, तसेच पोटगी रक्कम वसूल करणेस तारण राहू नये म्हणून सदर मिळकतींची विल्हेवाट लावणेचे, हस्तांतर करण्याचे प्रयत्नात सदरचे लोक आहेत. वास्तविक पाहता सदर मिळकती हस्तांतर करणेस, त्यांना कसलीही कायदेशीर गरज (Legal Necessity) नव्हती व नाही. तेव्हा सदर जमीनींमध्ये, आमचे अशिलांचे समाईक अविभक्त हिस्से असल्याने आणि त्याबाबत अद्यापही, वाटप झालेले नसल्याने, सदर अर्जुन पांडूरंग डोंगरे वगैरे लोकांबरोबर, सदर मिळकतीबाबत, कोणीही, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत, केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील तसेच आमचे आशिलाचे हक्क हिस्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवरच राहील कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे ता. १९/०१/२०२४

**सही/-**
**ॲड. श्री. गुंड एस.एम, (लाडोळेकर)**
**ॲड. श्री. गुंड ए. एस. (लाडोळेकर)**
**ॲडव्होकेटस्, बार्शी सदानंद ७३०/२/३७**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**
**उज्वला गणेश डोंगरे वगैरे**
**रा. बार्शी, ता. बार्शी तर्फे ॲडव्होकेटस्**



### सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर

**द्वारा योगिनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

**ताबा नोटीस - नमुना झेड**

म.स.सं.नियम १९६० मधील नियम १०७(११)ड-१

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (Symbolic) घेतल्याबाबतची नोटीस**

मी खाली सही करणार विशेष वसूली व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा **योगिनाथनागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर** ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६० कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापुर शहर, सोलापुर यांच्या कडून प्राप्त झालेला कलम १०९ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार । जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश देलेला आहे. संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम ११ ड १) नुसार नमुना न नोटीस देऊन सदरील मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसिद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टाच, बोजा किवा इतर हक्कात व्यवहार करू नये. या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **योगिनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर** यांचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन रहावे लागेल याची नोंद घ्यावी. त्याची खालील नमूद स्थावर मालमत्ता तिचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ. क्र | थकबाकीदाराचे /जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र. व दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | भूमापन क्र. व उपविभाग | येणेबाकी रक्कम रु. ३१/०८/२०२४ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | साहिल फेब्रिकेशन प्रो.प्रा. शाहनवाज गफुरसाब शेख यांचे जाबदार नं.१ कलीम अब्दुलरहिमान शेख यांचे सामयिक क्षेत्र हिस्सा पुरते जाबदार नं. २ विनोद विजयकुमार शेळवणे यांचे हिस्सा पुरते दहिटणे, शेळगी, सोलापूर | १०१/१२२/२०२२ दि. ०६/०२/२०२३ | मौजे दहिटणे, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर, मौजे दहिटणे, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १७/३/ब/पै/ प्लॉट नं. १९ १७/३/ब/पै/ प्लॉट नं. ३३ | १,१४,३६९/- |
| २ | शरणप्पा नागप्पा बागलकोटी यांचे जाबदार नं. २ धोंडप्पा चनमलप्पा वग्गे यांचे सामायिक क्षेत्र हिस्सा पुरते | १०१/२४९६/२०२३-२४ दि. १६/१०/२०२३ | मौजे शेळगी, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १०/अ/२/ प्लॉट नं. ५६ | १,२४,२५५/- |
| ३ | हणमंत निलप्पा बिराजदार यांचे जाबदार नं. २ धोंडप्पा चनमलप्पा वग्गे यांचे सामायिक क्षेत्र हिस्सा पुरते | १०१/२४९४/२०२३-२४ दि. १६/१०/२०२३ | मौजे शेळगी, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १०/अ/२/ प्लॉट नं. ५६ | ९४,७१३/- |
| ४ | सुशीलकुमार करणसिंग बायस यांचे जाबदार नं. ४ यांचे हिस्सा पुरते | १०१/२४९७/२०२३-२४ दि. १६/१०/२०२३ | मौजे दहिटणे, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | ९६/१/ब/१ | १,११,९००/- |
| ५ | प्रकाश गेनू चव्हाण यांचे जाबदार नं. २ बाबुलाल गुलाब पवार | १०१/२४९२/२०२३-२४ दि. १६/१०/२०२३ | मौजे मुळेगाव लमाणतांडा ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | ५९/१/ब पैकी/प्लॉट ७ | ५०,२९७/- |

ही उद्घोषणा प्रसिध्द झालेपासून **३० दिवसांचे आत** आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र ध्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केली जाईल, म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा / कब्जा पत्यक्ष घेण्यासाठी **मा. जिल्हादंडाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापूर** यांच्याकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्ताय ती कारादेशीर कार्बायवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**ताबा / कब्जा घेतल्याची नमुना झेड नोटीस प्रसिध्द केली.**
**हि नोटीस दिली दिनांकः १९/०९/२०२४**

**स्वाक्षरीत/-**
**एन.ए. एकबोटे**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### सोलापूरची कराटेपटू क्रांती बनकर हिची क्रीडा अधिकारीपदी निवड

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**



येथील कराटेपटू ब्लॅक बेल्ट विजेती, आंतरराष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय पंच म्हणून क्रांती मारुती बनकर हिची विभागीय युवक व सेवा संचालनालय कार्यालय नाशिक येथे क्रीडा अधिकारी म्हणून निवड झाली. तिचा कराटे प्रशिक्षिका व मार्गदर्शिका अनुराधा महादेव थोरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कराटे प्रशिक्षण घेत असताना क्रांतीने अथक परिश्रम घेत ब्लॅकबेटचा पल्ला गाठला होता. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरती सोलापूरच्या नावलौकिकात भर घातली होती. क्रीडा अधिकारी पदी निवड झाल्यामुळे बनकर यांनी सोलापूरच्या इतिहासामध्ये खेळाडू ते अधिकारी असा एक वेगळाच ठसा उमटविला.

### सोलापुरच्या अकबर कुरेशीची मिस्टर युनिव्हर्स स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि.१९ सप्टेंबर-**



येथील अकबर कुरेशी याची २० ते २२ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या मिस्टर युनिव्हर्स स्पर्धेसाठी मास्टर्स गटातून ( ४५ ते ५० वर्षे) निवड झाली. गोरेगाव (मुंबई) येथे होणाऱ्या या स्पर्धेत ११ गटातून देशासह परदेशातून ६०० स्पर्धकांनी भाग घेतला आहे. या स्पर्धेसाठी प्रमोद काटे, नजीर शेख, शफी शेतसंदी हे पंच म्हणून उपस्थित राहणार आहे. त्यांना जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, अजित कंडरे, मनोज भागवत, गोरख गडसिंग, अल्ताफ सिद्धीकी व शकील बडेघर यांनी शुभेच्छा दिल्या.

### शालेय विभाग ज्युदो स्पर्धेसाठी पानगलच्या काझी जकवानची निवड

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**




श्रीकृष्ण कुस्ती केंद्र येथे झालेल्या शालेय ज्युदो स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या काझी मोहम्मद जकवान मुजाहिदने ९७ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुनशी व इक्बाल दलाल यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. हारुन रशीद बागबान, डॉ. सुरय्या परविन जहागीरदार, निकहत नलामंदू यांनी अभिनंदन केले.



### शालेय थ्रो बॉल स्पर्धेत शरदचंद्र पवार प्रशालेस विजेतेपद

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

शालेय शहर थ्रो बॉल स्पर्धेत १९ वर्षांखाली मुलांच्या गटात शरदचंद्र पवार प्रशालेने विजेतेपद पटकाविले. संघास क्रीडा शिक्षक राजाराम शितोळे, सहाय्यक शिक्षक श्रीराम बरगंडे, अविनाश अलदर, आनंद कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे, सचिव अनिल बारबोले, शालेय समिती चेअरमन ज्ञानेश्वर सपाटे, मुख्याध्यापक तानाजी माने यांनी अभिनंदन करीत विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### एस.एस. स्पोर्ट्स अकॅडमीच्या विनीत दिनकरची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

पनवेल, मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद मैदानी स्पर्धेत येथील एस.एस. स्पोर्ट्स अकॅडमीच्या विनीत दिनकर याने २०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात रौप्य पदक पटकावले. या कामगिरीवर त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. विनीतला एन.आय.एस कोच सूर्याजी लिंगडे व भारती लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचा शहर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे मार्गदर्शक अनिल पाटील, तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव व कबड्डी राज्य पंच सुभाष माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# अश्विनने शतक झळकावून भारताचा डाव सावरला

**पहिला कसोटी सामना**

**बांगलादेशविरुद्ध भारत ६ बाद ३३९**

**जयस्वाल, जडेजाचे अर्धशतक**

**हसन महमूदचे ४ बळी**

◆ **चेन्नई, १९ सप्टेंबर**

गुरुवारी येथे बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी अनुभवी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने घरच्या मैदानावर आपले सहावे कसोटी शतक झळकावले. त्याने रवींद्र जडेजासोबत सातव्या गड्यासाठी नाबाद १९५ धावांची अखंड भागीदारी करून भारताला संकटातून बाहेर काढले व दिवस अखेर भारताने पहिल्या डावात ८८ षटकांत ६ बाद ३३९ धावा काढल्या.

खेळ थांबला तेव्हा आर. अश्विन नाबाद १०२ धावांवर, तर रवींद्र जडेजा नाबाद ८६ धावांवर खेळत होते.

भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालने ५६ धावांची खेळी केली, तर कसोटी पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतने ३९ धावांची भर घातली.

एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर बांगलादेशचा कर्णधार नजमूल हुसेन शांतोने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत बांगलादेशच्या गोलंदाजांनी विशेषतः युवा वेगवान गोलंदाज हसन महमूद याने भारताच्या फलंदाजीच्या पहिल्या फळीला सुरुंग लावले. त्याने कर्णधार रोहित शर्मा (६), शुभमन गिल (०), विराट कोहलीला (६) बाद करून भारताची स्थिती ९.२ षटकांत ३ बाद ३४ अशी करून टाकली होती. पुढे यशस्वी जयस्वाल व ऋषभ पंत डाव सावरण्याच्या प्रयत्नांत असतानाच हसन महमूदने पंतला लिटन दासकडून झेलबाद केले. पंतने ५२ चेंडूंत ६ चौकारांसह ३९ धावा काढल्या. हसन महमूदने ५८ धावांत ४ बळी टिपून भारतीय तंबूत खळबळ उडवली.

त्यानंतर यशस्वी जयस्वाल व केएल राहुलला अनुक्रमे नाहीद राणा व मेहदी हसन मिराजने बाद केले. जयस्वालने ११८ चेंडूंत ९ चौकारांसह ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. राहुलने २१ चेंडूंत १६ धावा काढल्या. त्यावेळी भारताची स्थिती ४२.२ षटकांत ६ बाद १४४ धावा अशी होती. त्यानंतर आर. अश्विन व रवींद्र जडेजाने आत्मविश्वासाने बांगलादेशच्या गोलंदाजांचा सामना केला व संघाला चहापानापर्यंत ४८ षटकांत ६ बाद ११७ धावांचा टप्पा गाठून दिला व संघाची पडझड थांबविली.

पुढे ही जोडी पहिल्या दिवसाचा खेळ संपेस्तोवर खेळपट्टीवर चांगली जमली. यादरम्यान अश्विनने वैयक्तिक शतक, तर जडेजाने अर्धशतक साजरे केले.

या दोघांनी दिवस अखेर नाबाद खेळी करत संघाला पहिल्या डावात ६ बाद ३३९ धावा अशा सुस्थितीत आणले.


◀(वृत्तसंस्था)




चेन्नईच्या एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर गुरुवारी बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी फटकेबाजी करताना भारताचा रवींद्र जडेजा

## राज्य तायक्कांदो अध्यक्षपदी सोलापूरचे संदीप ओंबासे, प्रमोद दौंडे सदस्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (टाम) या राज्य संघटनेच्या अध्यक्षपदी येथील संदीप ओंबासे (सद्या वास्तव ठाणे) तर सचिवपदी गफार पठाण (सातारा) यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्यपदी येथील प्रमोद दौंडे यांची निवड झाली. ओंबासे हे सोलापूर येथे रेल्वे क्राईम इन्चार्ज म्हणून कार्यरत असून त्यांचे प्राथमिक शिक्षण हे करमाळा अकलूज माळशिरस येथे झाले आहे. वडील पोलीस खात्यात असल्यापासूनच शिस्त आणि नम्रता याचे त्यांनी धडे गिरवले. संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा डोंबिवली येथे झाली. यात पंचवार्षिक कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे निरीक्षक म्हणून दयानंद कुमार यांनी तर निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. शुभांगी सोनवले यांनी काम पाहिले.

**अन्य पदाधिकारी असे :**

चेअरमन : आमदार मोहन मते (नागपूर), कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी (छ. संभाजीनगर), उपाध्यक्ष - तुषार आवटी (पुणे), घनश्याम सानप (अहमदनगर), सचिव - सुरेश चौधरी (सांगली), कार्यकारिणी सदस्य : नारायण वाघाडे (नागपूर), पद्माकर कांबळे (कोल्हापूर).



## प्रतिक शिंदे, श्लोक घंटे यांची विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर,दि. १९ सप्टेंबर-**

दयानंद कॉलेज येथे झालेल्या शालेय शहर रोलर स्केटिंग स्पर्धेत क्वाड या प्रकारात १४ वर्षाखालील गटात प्रतीक लक्ष्मण शिंदे व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात श्लोक दीपक घंटे याने प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास मुख्य प्रशिक्षक दीपक घंटे व समीत यादवाड तसेच क्रीडाशिक्षक अतुल सोनके, आशुतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## वीरेश कुंभारची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

अमरावती येथे झालेल्या राज्य ज्युनिअर बेसबॉल स्पर्धेतून येथील विरेश कुंभारची महाराष्ट्र संघातून निवड करण्यात आली. वीरेश हा श्री मल्लिकार्जुन हायस्कूल अकरावी सायन्समध्ये शिकत आहे. त्यास प्रा. संतोष खेंडे व गंगाराम घोडके यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचा सोलापूर शहर व जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सीए विनोद भोसले व सॉफ्टफुटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी यांनी अभिनंदन केले.





## रग्बी स्पर्धेत अरिहंत स्कूल विजेता

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

शालेय रग्बी स्पर्धेत अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. त्यांनी अहिल्याबाई विद्यालय, ठोकळ प्रशाला, सेवासदन विद्यालयास हरवित ही कामगिरी केली. यात स्कूलच्या श्रुती चन्ना व तनिष्का गुर्रम यांनी उत्कृष्ट काम गिरी केली. या संघास क्रीडा शिक्षक आकाश मिस्किन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, पर्यवेक्षिका तस्नीम शेख आदींनी अभिनंदन केले.

**विजेता संघ :** श्रुती चन्ना (कर्णधार) तनिष्का गुर्रम, अक्षरा बंदपट्टे, पूर्वा कस्सा,अनुजा कोटा, नक्षत्रा कट्टा, पूजा जक्का, साक्षी उदगीरी, रिद्धी गुर्रम, अंकिता गुंडे, श्रुतिका मिठ्ठा, दक्षता पोल.

# हरिभाई देवकरण प्रशालेस विजेतेपद

## शालेय क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांचा गटात कामगिरी

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

शालेय क्रिकेट स्पर्धेत हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले.

ह.दे. च्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत ह. दे.ने नागेश करजगी ऑर्किड स्कूल, सुयश विद्यालय, भारती विद्यापीठ, एस. आर. चंडक स्कूल, लिटल फ्लॉवर स्कूल संघास नमवून विजेतेपद कायम ठेवले. या कामगिरीवर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संघास क्रीडा शिक्षक माणिक साळसकर,



प्रमोद चुंगे, अक्षय गवळी व प्रशिक्षक प्रकाश कंपली यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका दीपा फाटक, पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने, शांताप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, लकण्णा कमळे, औदुंबर सर्वगोड आदींनी अभिनंदन केले.

**विजेता संघ :** आदित्य दडे, यश मंगरुळे, आदित्य बंडगर, अथर्व काळे, आदित्य तमनूर, ओम लोंढे, ओम चव्हाण, मयंक पात्रे, सिद्धांत कांबळे, अनविर वर्धा, कुणाल कामतकर, सुबोध वाघमार, अरिहंत कांबळे, जयंत मित्रगोत्री, ययाती देवकते, हर्षवर्धन होनपारखी.

# माढा तालुका मैदानी स्पर्धेत आदर्श पब्लिक स्कुलची नेत्रदीपक कामगिरी

## जिल्ह्यासाठी २९ खेळाडूंची निवड

**कुर्डूवाडी, दि. १९ सप्टेंबर-**

माढा येथे झालेल्या तालुका शालेय मैदानी स्पर्धेत आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक अहमद मुलाणी, ए. आर. डिसले व शकिलाबी सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पुजा सुरवसे यांनी अभिनंदन केले.

**यशस्वी खेळाडू : १४ वर्षे मुले :** थाळीफेक : तनवीर सय्यद (प्रथम), प्रणव लोंढे (द्वितीय). गोळा फेक : तनवीर सय्यद (प्रथम). उंच उडी : शिवम बागल (तृतीय). १०० मीटर धावणे : प्रिन्स चौरसिया (तृतीय). मुली : १०० मीटर धावणे : सानवी परबत (द्वितीय). उंच उडी : सानवी परबत (तृतीय).

**१७ वर्षे मुले :** उंच उडी : दयावान खुणे (प्रथम), प्रसन्न घुगे (द्वितीय). थाळीफेक : आदित्य पाटील (प्रथम), प्रांजल सोनटक्के (द्वितीय) १०० मीटर धावणे : प्रेम उबाळे (तृतीय). ४ बाय १०० मीटर रिले प्रथम : सुयश शिंदे, प्रीतम धांडे, यशराज पाटील, जयदीप ताकभाते,वंशराज वाल्मिकी. हातोडा फेक : अरमान शेख (तृतीय). मुली : उंच उडी : आर्या शिंगाडे (द्वितीय). गोळा फेक : सुमैया शेख (प्रथम) , भाला फेक : सुमैया शेख (प्रथम), ४०० मीटर अडथळा : सुमैया शेख (प्रथम), ३०००मी धावणे : तृप्ती गोफने (द्वितीय), संस्कृती तरटे (तृतीय), तिहेरी उडी : वैष्णवी राऊत (तृतीय). बांबू उडी : यशराज पाटील (प्रथम).

**१९ वर्षे मुले :** गोळा फेक : शिवराज लोंढे (प्रथम). थाळीफेक : शिवराज लोंढे (प्रथम), उंच उडी : रोहन काळे (प्रथम), श्लोक खुणे (तृतीय). बांबू उडी : वंषराज वाल्मिकी (द्वितीय). मुली : हातोडा फेक : स्नेहल सौंदळे ( द्वितीय). तिहेरी उडी : गायत्री माने (प्रथम), सुप्रिया कन्हेरे (द्वितीय). उंच उडी : अपेक्षा घाडगे (द्वितीय). २०० मीटर धावणे : शिवानी व्यवहारे (तृतीय). ४ बाय १०० रिले द्वितीय :गायत्री माने, सुप्रिया कन्हेरे, सिद्धी गाडे, शिवानी व्यवहारे, तेजश्री सुतार. बांबु उडी : तेजश्री नानासाहेब सुतार (प्रथम), अपेक्षा सुधीर घाडगे (द्वितीय).

## ग्लोबल इन्स्टिट्यूटची राजलक्ष्मी सुतार योगासन, वेटलिफ्टींगमध्ये जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१६ सप्टेंबर**

करमाळा येथील ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटची राजलक्ष्मी सुतार हिने शालेय वेटलिफ्टिंग व योगासन स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.



सोलापूर क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने झालेल्या योगासन स्पर्धा न्यू इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे तर वेटलिफ्टिंग स्पर्धा सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथे पार पडल्या. या स्पर्धेत राजलक्ष्मीने योगासनाची विविध प्रात्यक्षिके दाखवून ही कामगिरी केली. तसेच वेटलिफ्टिंग स्पर्धेत ४५ किलो मुलींच्या वजन गटात स्नॅच ३० किलो मारून क्लीन आणि जर्क ३५ मारून ६५ टोटल करून प्रथम क्रमांक मिळविला. या कामगिरीवर तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिला त्रिमूर्ती स्पोर्ट क्लबचे प्रशिक्षक सागर शिरस्कर यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बसवेश्वर मंडळातर्फे मान्यवरांचा सत्कार

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

भवानी पेठ, घोंगडे वस्ती येथील बसवेश्वर तरुण मंडळाच्या वतीने महानगरपालिकाचे माजी कर्मचारी सुभाष जकापुरे, उद्योगपती शिवानंद विजापूरे व युवा संघटनेचे अध्यक्ष सिद्धाराम जकापुरे यांचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष राजकुमार गुळगी यांनी केले. यावेळी मंडळाचे कार्यकर्ते परमेश्वर ख्याडे, तम्मा मुलगे, सचिन बगले, विश्वास ढोकळे, शिवा ढोकळे, भागेश ख्याडे, सागर आतनुरे, मेणसे आदी मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कृषीप्रधान देशाला हवी वृक्ष संवर्धनाची गरज : डॉ. अमृतानंद स्वामीजी

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतीय संस्कृती जगातील सर्वात सुंदर व जुनी संस्कृती आहे. भारतीय संस्कृती निसर्गावर प्रेम करायला शिकवते. भारतीय सण, उत्सव निसर्गाच्या सान्निध्यात राहून साजरे होतात. विज्ञान व तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी निसर्गावर मात करू शकत नाही, असे प्रतपादन डॉ. अमृतानंद स्वामीजी यांनी केले. भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री गणेश युवक मंडळ आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंडळाचे संस्थापक चिदानंद कोटगोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य वसंत पाटील, हणमंत पुजारी, गुरुनाथ अरकेरी, सुरेश लोणी, बसवराज तल्ले, प्रभुलिंग हाडसंगे, प्रथमेश पाटील, सुभाष कोटगोंडे, गौडाप्पा बिराजदार, मंडळातील सर्व पदाधिकारी, सदस्य व गावकरी उपस्थित होते.



### विचारक्रांती संस्थेतर्फे पाणी वाटप

**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी दर्शनासाठी आंबेडकर उद्यान, बुधवार पेठ येथे ठेवण्यात आलेल्या दर्शनासाठी येणाऱ्या उपासक उपासिंकासाठी व प्रमुख पाहुण्यांसाठी सिद्धार्थनगर लष्कर येथील विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे सर्वांना पाणी वाटप करण्यात आले. यावेळी अण्णासाहेब वाघमारे, दत्ता सिद्धगणेश, जनार्दन मोरे, शिवपुत्र घटकांबळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरज जगधने, पृथ्वीराज शिरसे, नागसेन बंगाळे, राहुल शिवशरण, कुणाल गाडे, मनीष शिवशरण, शुभम गायकवाड, वैभव वाघे, विजय माने, सागर शिरसे, विवेक चंदनशिवे, रोहित दावणे, साहिल गायकवाड, आयुष गाडे, साहिल माने, आदित्य दावणे, जयश्री जगधने, मिनल कांबळे, वंदना कुचेकर, पूजा शिरसे, नेहा बंगाळे, वैशाली चंदनशिवे, राजश्री माने आदी सदस्य उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन

**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये प्रबोधनकार केशव ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भालचंद्र साखरे, नर्सिंग चिप्पा, केरबा माने आदी उपस्थित होते.



### गरजू महिलांना शिलाई मशीन वितरण स्पेस ७९ फाऊंडेशन संस्थेचा उपक्रम

**सोलापूर दि. १८ सप्टेंबर-**

सिध्देश्वर प्रशाला सोलापूर च्या सन१९७९च्या दहावी च्या माजी विद्यार्थ्यांची 'स्पेस ७९ फाऊंडेशन' या सेवाभावी संस्थेच्या वतीने एमआयडीसी परिसरातील १२ गरजू महिलांना शिलाई मशीनचा वितरण समारंभ संपन्न झाला. हा समारंभ संभाजी आरमारचे सोलापूर शहराध्यक्ष सागर ढगे यांच्या हस्ते व 'स्पेस ७९ फाऊंडेशन' सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर जमखंडीकर यांच्या अध्यक्षतेखाली व सरचिटणीस इंजि. बसवराज आवटे, कोषाध्यक्ष शिरीष दंतकाळे , संभाजी आरमार सोलापूरचे कार्यालय प्रमुख सुधाकर करणकोट यांच्या प्रमुख उपस्थितीत माळीनगर एमआयडीसी भागात परिसरातील हाशिलाई मशीन वितरणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी 'स्पेस ७९ फाऊंडेशन' चे विश्वस्त कारखानदार अंबादास बासुतकर, ॲड. सुनील झुंजे, अहिल्यादेवी बँकेचे सरव्यवस्थापक विश्वनाथ लवटे व सतीश भोसले उपस्थित होते.

# पहिल्या टप्प्यात बसणार सीईटीव्ही कॅमेरे; ५५ कोटीची गरज

**● झेडपीच्या ६४२ शाळेत असणार आता करडी नजर ● शिक्षण विभागकडून जिल्हा नियोजनकडे प्रस्ताव सादर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या २ हजार २७७ प्राथमिक शाळा सऊन, प्रत्येक शाळेत आठ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी अंदाजित ५५ कोटींची गरज आहे. मात्र जिल्हा नियोजन समितीकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी अवघ्या ३ कोटी १० लाखांच्या निधीवर प्राथमिक शिक्षण विभागाला उपल्बध करुन देण्यात येणार आहे.

या संदर्भात पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी लक्ष घालून झेडपेच्या शाळेतील विद्यार्थी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी जिल्हा नियोजनमधून वाढीव निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष लक्ष घालण्याची गरज आहे.



झेडपीच्या २ हजार २७७ शाळेमध्ये सीसीटीव्ही बसवण्यासाठी अंदाजित ५४ ते ५५ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. या संदर्भात बुधवारी १८ सप्टेंबर रोजी जिल्हा नियोजनकडे पहिल्या टप्प्यात ६४२ शाळेत सीसीटीव्ही बसवण्यासंदर्भात निधींची मागणी करण्यात आली आहे. या ६४२ शाळेमध्ये ३७ मुलींच्या तर शंभरापेक्षा अधिक पटसंख्या असणाऱ्या ५ शाळेचा समावेश आहे.

**- कादर शेख,** शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परिषद

पहिल्या टप्प्यात १०० पटसंख्या असणाऱ्या ६०५ शाळा व मुलींच्या ३७ अशा एकूण ६४२ शाळएत सीसीटीव्ही बसवण्यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे. बदलापूरच्या त्या घटनेनंतर शासनाच्या वतीने विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून २१ ऑगस्ट



रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करुन शाळेत सीईटीव्ही



कॅमेरे बसवण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र जिल्हा परिषदेच्या शाळेत सीसीटीव्ही बसवण्यासंदर्भात जिल्हा नियोजनांकडून पुरेसा निधी उपलबध करुन देण्यात न आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शासनांकडून २०२४-२५ जिल्हा वार्षिक योजनाच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीकडे ४० टक्के निधी प्राप्त झाला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागास शाळेत सीसीटीव्ही बसवण्यासाठी पुनर्विनियोजनानुसार ३ कोटी १० लाखांचा वाढीव तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. शासनाकडून उर्वरीत ६० टक्के निधी प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पुन्हा निधी देण्यात येणार आहे.

**- दिलीप पवार,** जिल्हा नियोजन अधिकारी



## आस्था संस्था, नेहरुजी मंडळाच्या वतीने कीर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

आस्था सामाजिक संस्था सोलापूर व नेहरूजी गणेश बाल मंडळाच्या वतीने गणेशोत्सव निमित्ताने सिद्धेश्वर बँकेजवळ हरी नाम कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

हभप धनंजय वेदपाठक यांनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीतून आनंद द्विगुणित केले. या सोहळ्याप्रसंगी टाळकरी वादक सुरज हलसुरे, गायक आकाश पिठे, हभप लक्ष्मण महाराज शहापूरकर, सादक देविदास धर्माधिकारी, महेश जाधव, राम शिंदे, नागेश कोळी संतोष सावजी पांडुरंग घाटे, जान गवळी भजनी यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, पिंटू कस्तुरे, सिद्धू बेऊर यांनी या सोहळ्याच्या आयोजन केले होते. कीर्तन सोहळा पार पडण्यासाठी सुरज छंचुरे, उदय छंचुरे, , प्रथमेश गावडे, योगीराज आरळीमार, महेश नागणसुरे, वेंदात तालिकोटी, महेश घोंगडे, पप्पू जट्टे,शिव माळगे, अमृत भूमकर, प्रमोद छंचुरे, समर्थ पाटील यांनी परिश्रम घेतले.

## क्यू आर कोड स्कॅनद्वारे करा रेल्वे तिकिटाचे पेमेंट

**वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

प्रवाश्यांना उत्तमोत्तम सेवा पुरविण्यासाठी रेल्वे प्रशासन नेहमीच सज्ज असते. नव्या तंत्रज्ञान आत्मसात करून सोलापूर रेल्वे विभागाने प्रवाश्यांसाठी प्रथमच क्यू आर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सध्या सर्वच जण पैशाच्या देवाण घेवाण करता यू.पी.आय सुविधेचा वापर करत आहेत. ही बाब लक्षात घेऊन सोलापूर रेल्वे विभागाने तिकीट काउंटरवर आता यू.पी. आय क्यू.आर.कोडची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

प्रवासी जेव्हा रेल्वे स्थानकावर आरक्षित/अनारक्षित (जनरल) तिकीट काढण्यासाठी जाईल तेव्हा, त्याच्या तिकिटाच्या रकमेचा क्यू आर कोड जेनरेट होईल, आणि त्याने काढलेल्या तिकीटाची रक्कम त्याला आता एकच क्यू आर कोड स्कॅन करून पूर्ण करता येईल.यापूर्वी पीओएस स्वॅपम शीन आणि कॅश अश्या दोन्ही स्वरूपात तिकिटाची रक्कम भरावी लागत होती. त्यात प्रवाश्यांचा फार वेळ जात होता. परंतु ,आता क्यू आर कोड स्कॅन मशीनमुळे प्रवाशांच्या वेळेची बचत होऊन त्यांना आपला प्रवास निश्चित करता येणार आहे.

**क्यू आर कोड सुविधेचा प्रवाश्यांनी घ्यावा**



भविष्यात येणाऱ्या काळात संपूर्ण सोलापूर रेल्वे विभागामध्ये सर्व तिकीट काउंटरवर अश्या क्यू आर कोड सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तरी रेल्वे प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या या रेल्वे सुविधेचा लाभ प्रत्येक प्रवाश्यांनी घ्यावा.

**- योगेश पाटील ,** वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक सोलापूर रेल्वे विभाग.

ICICI PRUDENTIAL LIFE INSURANCE

## तीन लाख कोटींचा टप्पा पार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने, व्यवस्थापन अंतर्गत मालमत्तेमध्ये ३ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे.

३१ जुलै २०२४ पर्यंत कंपनीचे ॲसेट अंडर मॅनेजमेंट ३.१४ लाख कोटी इतके होते. अनुप बागची, एमडी आणि सीईओ, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स उत्पादनांना असलेली ग्राहकांची पसंती आणि त्यांना त्यांची दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यास सक्षम करण्यासाठी त्यांचा आमच्यावर असलेला विश्वास प्रतिबिंबित करते. यावेळी संबधीत आयसीआयसीआय च्या अधिकारी यांनी सांगितले.

## महामार्गावर एलईडी पथदिवे लावले मात्र, भुयारी मार्गात अजूनही अंधारच!

**तभा वृत्तसेवा,**
**तामलवाडी, दि. १९सप्टेंबर-**

गेल्या काही महिन्यांपासून तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील राष्ट्रीय महामार्गावर बंद असलेल्या पोलवर एलईडी पथदिवे लागले, लख्ख प्रकाश पडला पण गेल्या महिनाभरापासून भुयारी मार्गात लाईट नसल्याने अजूनही भुयारी मार्गात अंधारच आहे, यामुळे ग्रामस्थांतून संताप व्यक्त होत आहे.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमर्गावरील तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील जुने बंद पडलेले पथदिवे काढुन नवीन एलईडी पथदिवे बसवले. त्यामुळे गावातील महामर्ग तसेच सर्व्हिस रस्त्यावर लख्ख प्रकाश पडला आहे परंतु गावातील नागरिकांना ये- जा करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या भुयारी मार्गात मात्र अंधाराचे साम्राज्य पसरलेले दिसुन येत आहे. गेल्या महिनाभरापासुन भुयारी मार्गातील लाईट बंद असून एलईडी पथदिवे बसवताना भुयारी मार्गातील लाईट बसवणार असल्याचे सांगितले. परंतु भुयारी मार्गात अजुनही अंधाराच आहे. संध्याकाळी महिला, मुलींना, वयस्कर नागरिकांना अंधारातून वाट काढत जावे लागते. याकडे राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित अधिकारी लक्ष देणार का? भुयारी मार्गात लाईट कधी लागणार? भुयारी मर्गातील अंधार कधी दुर होणार? असे अनेक प्रश्न नागरीकांमधुन विचारले जात आहेत. गणेशोत्सव काळातही लाईट बंदच होती. आता नवरात्रोत्सव लवकरच सुरू होणार असून, बाहेरगावचे अनेक महिला, पुरुष भाविक पायी देवीच्या दर्शनासाठी येतात. तेंव्हा गेल्या महिनाभरापासुन भुयारी मार्गातील बंद असलेली लाईट तात्काळ चालु करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## श्री वृत्ती प्रभाकर साधक शिबिरास प्रतिसाद

**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

श्री सद्गुरु बसवारुढ महास्वामीजींच्या समाधी सुवर्ण महोत्सवानिमित्त श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे आयोजित श्री वृत्ती प्रभाकर साधक शिबिरास भाविकांकडून प्रतिसाद मिळत आहे. विमानतळाच्या पाठीमागे असलेल्या कस्तुरबा नगरातील श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत श्री साधू निश्चलदासजी विरचित श्री वृत्ती प्रभाकर ग्रंथाचे वाचन आणि मुमुक्षु साधकांसाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे. प. पू. श्रो. ब्र. श्री. जडेसिद्धेश्वर महास्वामीजी श्री वृत्ती प्रभाकर साधक शिबिरात साधकांना मार्गदर्शन करत आहेत.

श्री वृत्ती प्रभाकर हा ग्रंथ शेकडो वर्षे जुना असून यात सर्वसामान्य नागरिक आणि साधकांसाठी जीवनाची दिशा सांगण्यात आली आहे. ५ ऑक्टोबरपर्यंत दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत श्री वृत्ती प्रभाकर साधक शिबिर चालणार असून भाविकांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री सद्गुरू बसवारूढ महास्वामीजी मठाचे मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांनी केले आहे.



## शिक्षण अन मुलेच पालकांची मूळ संपत्ती : डॉ. शेख

इस्माईल-१७

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

अब्दुल्ला क्लासेसच्यावतीने समाज कल्याण केंद्र रंगभवन येथे विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच शिक्षक दिनानिमित्त अब्दुल्लाह क्लासेसच्या शिक्षकांना तरन्नुम काखंडीकर, उझमा हुंडेकरी, मदिहा शाहपुरे, ताहा सय्यद, रेश्मा शेख आणि मिसबाह दुर्गकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात अब्दुलाह क्लासेसच्या विद्यार्थी इब्राहिम शेख यांनी पवित्र कुराणच्या पठणाने केली व यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले ज्याला पाहुण्यांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे सुप्रसिद्ध एम. डी. डॉ. इस्माईल शेख होते. तसेच प्रमुख पाहुणे सोशल उर्दू शाळेचचे सुपरवायझर यासमीन शेख, ज्येष्ठ शिक्षिका समीना मनियार आणि सुप्रसिद्ध सूत्रसंचालक अजहर चितापुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अब्दुल्ला क्लासेसचे प्रभारी शेख मुईज अहमद यांनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तरन्नुम काखंडीकर, उझ्मा हुंडेकरी, मादीहा शाहपूरे, ताहा खानम सय्यद, रेश्मा शेख, मिस्बाह दुरूगकर, सानिया शेख, इरफान पटेल, साकिब नाईकवडी, जमीर मुलाणी व इतर शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# ठोकळ प्रशालेच्या गणेशोत्सव मंडळाची विसर्जन मिरवणूक उत्साहात

**'गणपती बाप्पा मोरया' चा जयघोष; लेझीम, झांज, ढोल, टिपऱ्या पथकाचे सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर येथील गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणपतीची महापूजा व विसर्जन मिरवणूक 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात काढण्यात आली.

यावेळी शाळेतील गणेशोत्सव मंडळाच्या गणपतीची महापूजा माजी आमदार शिवशरण पाटील यांच्या हस्ते तसेच संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, माजी शिक्षण विस्ताराधिकारी अशोक भांजे, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्राचार्य डी. डी गाजरे, मोहनराव घोडके, विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अण्णाप्पा सतुबर, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, आद्य गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मिरवणूक शाळेतून आंबेडकर चौक-शिवाजी सोसायटी-रामलिंग सोसायटी-इंदिरा नगर-विजापूर नाका-आय टी आय., संभाजी तलाव या मार्गाने काढण्यात आली. मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे राम, सीता, हनुमान यांच्या पारंपरिक वेशभूषेतील शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी



लेझीम पथक, झांज पथक, ढोल पथक, टिपऱ्या पथक, नृत्य पथक, झेंडा पथक, आदिवासी नृत्य पथक, प्रत्येक पथकातील विद्यार्थी विद्यार्थिनीचे लयबद्ध सादरीकरण व त्यांचे लक्ष वेधून घेणारे वेशभूषा परिसरातील नागरिकांचे लक्ष आकर्षित करून घेत होते. शाळेच्या सर्व पथकाच्या उत्कृष्ठ सादरीकारण केल्या बद्दल विजापूर नाका मध्यवर्ती गणेशोउत्सव मंडळाकडून प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

गणेश विसर्जनाची सांगता विजापूर नाका, संभाजी तलाव याठिकाणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना शेवटी महाप्रसाद वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी केले. गणेशोशोत्सव मंडळाचे अध्यक्ष आर.एस. बनसोडे , उपाध्यक्ष व्ही. आर. ढवण, ए. यु. जाधव, सचिव ए. पी. सुरवसे, खजिनदार यु. एस. पवार, मिरवणूक प्रमुख वाय. जी. शेख, एस. एन. जकवडर यांनी परिश्रम घेतले. उत्कृष्ट मिरवणूक सादरीकरणाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले.



## राष्ट्र निर्माण कार्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची : प्रा. बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ सप्टेंबर-**

शिक्षक म्हणजे केवळ व्यक्ती नसून ते संस्काराचे एक विदयापीठ असतात. विद्यार्थी घडवून एक संवेदनशील नागरिक घडविणे व अशा नागरिकांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती व मनुष्य निर्माणाचे कार्य करून शिक्षक खऱ्या अर्थाने सृजनाचे साधक होऊ शकतात.

आज देशाला वैज्ञानिक आणि मानवतावादी वृत्तीची आध्यात्मिकता असलेल्या शिक्षकांची आवश्यकता आहे, असे मत संभाजीराव शिंदे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिवस व हिंदी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व संस्थेचे स्व.विष्णुपंत कोठे यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी प्राचार्या डॉ. वीणा कणबसकर, डॉ. प्रशांत चाबुकस्वार, प्रा. स्मिता गोणे, प्रा. मंदाकिनी आसबे, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. लता गायकवाड, प्रा. प्रियांका जाधव व श्री अनिल नडीमेटला उपस्थित होते. यावेळी शिक्षकांचा सन्मान व उत्तीर्ण विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### ‘विघ्नहर्ता’च्या बक्षिसाने महिला, चिमुकले आनंदित

**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**

श्री विघ्नहर्ता ढगे मळा कला क्रीडा व शैक्षणिक मंडळाने गणेशोत्सवानिमित्त घेतलेल्या होम मिनिस्टर व विविध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना बक्षीस वितरण केले. यावेळी ॲड. वासुदेव ढगे, गणेश गोडसे, अज्ञान मैंदरकर, लांडे, सारिका ढगे, स्वाती ढगे, अमोल डिसले उपस्थित होते. सूत्रसंचालन शीतल खुने यांनी तर प्रास्ताविक स्वप्नील शिंदे यांनी केले. आभार शैलेश वाघमारे यांनी मानले. स्पर्धेसाठी विनोद कबाडे, आप्पा नायकोजी, रोहन ढगे, वैभव घोणे, बालाजी भोसले, परमेश्वर खुने, रणजित घुमरे, शैलेश वाघमारे, अमेय ढगे, रमाकांत ढगे, सागर राऊत आदींनी परिश्रम घेतले. होम मिनिस्टरमध्ये पद्मावती बासुतकर पैठणी, स्वाती उपळकर सोन्याची नथ, सारिका कबाडे चांदीचे कानातले फुले. विजयी स्पर्धकांचे नावे- मनिषा निरंजन, वनुजा कबाडे, सुषमा सुतार, स्वाती ढगे, सारिका कबाडे, देवकी ढगे, पूजा ढगे, कविता आणेराव. खुला गट- गुंजन मनगिरे, अमेय ढगे,श्रद्धा कबाडे. मोठा गट-प्रांजली महाजन, अनुष्का खुणे, आनंदी माळी, संदीप माळी, कोमल कबाडे, रणजीत माळी, यशराज कबाडे, सोहम खुणे, गौरव राऊत, वीरा टोणपे, कल्याणी खुणे, शौर्य नायकोजी, रणवीर चौधरी, ज्ञानेश्वरी राऊत, श्रावणी यादव, आर्यन कदम, सार्थक आणेराव, वैष्णवी सातव. लहान गट- वेदांत शिंदे, राजवीर परदेशी, कृष्णा निंबाळकर, श्रीराज खुणे, प्रेम कबाडे, दिग्विजय ढगे, सोहम ढगे, सिद्धी पाटील, कार्तिकी शिर्के, ईश्वरी गलांडे, मेघराज जाधव, ओंकार शिंदे, समर्थ राऊत, अनुराधा भानवसे, निशा बासुतकर, माहेश्वरी कदम, वरद शिंदे, साईप्रसाद कबाडे, अर्णव नायकोजी, लव्या परदेशी, अर्चना आलावा, काव्या ढगे, आरुष निलाखे, राम उपळकर, गीता शिंदे, आराध्या भानवसे, दूर्वा व्यवहारे.

### दामाजी कारखान्यातर्फे शनिवारी प्रशांत परिचारक यांचा कृतज्ञता सोहळा

**मंगळवेढा, दि. १९ सप्टेंबर-**

श्री संत दामाजी सह।साखर कारखान्याला राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्लीकडून कारखाना उभारणीपासूनचे इतिहासात प्रथमच ९४ कोटी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिल्याबद्दल माजी आ. प्रशांत परिचारक यांचा कृतज्ञता सोहळा आणि शेतकरी मेळावा व कृषी प्रदर्शनाचे आयोजन शनिवारी २१ सप्टेंबर रोजी दुपारी १२.१५ वा. कारखाना कार्यस्थळावर होणार आहे. अध्यक्षस्थानी धनश्री परिवाराचे संस्थापक शिवाजीराव काळुंगे राहणार आहेत. यावेळी श्री विठ्ठल साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा, कारखान्याचे म



ाजी चेअरमन ॲड. नंदकुमार पवार, रामाकृष्ण नागणे, दाम ोदर देशमुख, रामचंद्र वाकडे, यादप्पा माळी राहणार असल्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी सांगितले. शेतकरी मेळाव्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे माजी ऊस शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील हे ऊस लागवड व खोडवा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अरुण देशमुख यांनीही मार्गदर्शन करणार आहेत. कृषी प्रदर्शनात विविध उपकरणे आणि संस्था सहभागी होऊन माहिती देणार असल्याचे व्हाईस चेअरमन तानाजीभाऊ खरात यांनी सांगितले. याप्रसंगी संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, निर्मला तानाजी काकडे, लता सुरेश कोळेकर उपस्थित होते.

# जिजामाता जगन्मातेचा अंश असलेली सर्वश्रेष्ठ स्त्री

## प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी | छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजामाता जगन्मातेचा अंश असलेली सर्वश्रेष्ठ स्त्री होत्या, असे गौरवोद्गार श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी काढले.

सकल हिंदू समाजातर्फे जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेस गुरुवारी प्रारंभ झाला. कथेच्या पहिल्यादिवशी शिवजन्म पूर्वकाळ, तत्कालीन परिस्थिती ते शिवजन्म या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे आणि भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन



> **आज शिवसंस्कार विषयावर मार्गदर्शन**
>
> छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.२०) प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी शिवसंस्कार या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या चरित्रातील काही अंश उलगडून दाखवणार आहेत. त्याकरिता सोलापूरकरांनी दुपारी ४ वाजता जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये उपस्थित रहावे, असे आवाहन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.

करण्यात आले. प. पू. गिरिजी म्हणाले, छत्रपती श्री शिवरायांच्या जन्मापूर्वी मुघलांनी भारतातील अनेक हिंदू साम्राज्ये उध्वस्त करून अनन्वित अत्याचार केले. मुघलांकडून हिंदूंवर होणारे अत्याचार, आपसातील भांडणे आणि त्यातून भारतासमोर निर्माण होणाऱ्या समस्या मातोश्री जिजाम ाता पाहत होत्या. ही परिस्थिती पालटून टाकावी अशी शहाजी महाराज आणि जिजामाता यांची मनोमन इच्छा होती. ही इच्छा उराशी घेऊनच जिजामातांनी छत्रपती श्री शिवरायांना जन्म दिला. जिजामातांच्या अंत:करणातील भगवदभक्तीप्रमाणे सध्याच्या महिला भगिनींनीही देव, देश, धर्माबद्दल श्रद्धा बाळगली पाहिजे, असेही प. पू. गिरिजी यांनी सांगितले.

यावेळी समर्पित नाट्यशाळेच्या कलाकारांनी शिवजन्माचा प्रसंग सादर केला. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे आर्थिक सल्लागार समितीचे प्रमुख सी. ए. राजगोपाल मिणियार यांनी प्रास्ताविक तर गुरूशांत धुत्तरगांवकर यांनी सूत्रसंचालन केले.

# करमाळ्यात लाचखोर मंडल अधिकारी अटकेत

● **लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या पार्श्वूमीवर कुणबी जात प्रम ाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त कागदपत्राची पडताळणी करून अहवाल देण्यासाठी तीन हजाराची लाच मागून तडजोड करून एक हजार घेतल्याचे कबूल करणाऱ्या मंडल अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक करून केली असून त्यांच्या विरोधात करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शंकर विठ्ठल केकाण (वय ५५, पद मंडळ अधिकारी, नेमणूक मंडळ अधिकारी कार्यालय, केत्तुर, ता. करमाळा जि. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव आहे.यातील तक्रारदार यांचे मुलीचे कुणबी जात प्रमाण पत्राच्या



अनुषंगाने प्राप्त कागदपत्रांवरुन पडताळणी करुन अहवाल देण्याकरीता केत्तूरचे मंडल अधिकारी केकाण यांनी तक्रारदार यांचेकडे ३ हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १ हजार रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंडल अधिकारी केकाण यांना अटक केली.

ही कारवाई पोलिस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस हवालदार अतुल घाडगे, पोलिस शिपाई सचिन राठोड, गजानन किणगी, सलिम मुल्ला, सुरवसे व गायकवाड यांनी केली.



# राहुल गांधींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; शहर युवक काँग्रेस आक्रमक

● **गुन्हा दाखल करून घेण्यासाठी पोलीस ठाण्यात मांडला ठिय्या!**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

काँग्रेस नेते व लोकसभेतील वरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू , खा. अनिल बोंडे, आ.संजय गायकवाड, दिल्लीचे माजी आम दार तरवींदर सिंग मारवा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात सोलापूर शहर युवक काँग्रेस वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

गांधी कुटुंबियाने देशासाठी त्याग व बलिदान दिले आहे. देशाविघातक शक्तींनी महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे बळी घेतले आहेत. आता पुन्हा गांधी संपवण्याची भाषा केली जात आहे. राहुल गांधी यांच्यावर आक्षेपार्ह बेताल वक्तव्य करणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करून घेण्यासाठी पोलिस स्टेशन मध्ये ठिय्या आंदोलन करून घोषणाबाजी करण्यात आले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी जबाब नोंदवून घेतला. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, माजी नगरसेवक विनोद भोसले, प्रदेश सचिव महाराष्ट्र युवक काँग्रेस श्रीकांत वाडेकर, सोशल मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष महेश लोंढे, प्रवक्ते दाऊद नदाफ, शरद गुमटे, महेंद्र शिंदे ,धीरज खंदारे, सुशीलकुमार म्हेत्रे, विवेक कन्ना, राजेंद्र शिरकुल, आकाश जांभळे, अजिंक्य पाटील, श्रीनिवास परकीपंडला, सुनील सारंगी, उमेर बेनोशिरुर, चंद्रकांत नाईक, श्रीनिवास परकीपंडला, अजय जाधव, अक्षय दिल्लीवाले, शाहू सलगर, यासीन शेख, सूरज शिंदे, युवराज दोडमनी, सूरज कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# घोंगडे वस्तीसह तीन ठिकाणी अतिक्रमणविरोधात कारवाई

● **चार चाकी हात गाड्यांसह इतर साहित्य केले जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

सोलापूर : महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील घोंगडे वस्ती, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, ७० फूट रोड परिसरात रोड लगतचे अतिक्रमण काढण्यात आले. ५ चार चाकी हात गाड्यांसह वजन काटे, भाजीपालाचे कॅरेट व इतर साहित्य जप्त करण्यात आले.



महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या म ार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गतच घोंगडे वस्ती, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, ७० फूट रोड परिसरात रोड लगतचे अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी ५ चार चाकी हात गाड्या, ७ वजन काटे, भाजीपालाचे कॅरेट व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

# सोलापुरात नवीन स्टोअरचे अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

भारतातील अग्रगण्य स्पोर्ट्स आणि ॲथलीजर फुटवेअर ब्रँड्सपैकी एक कॅम्पसतर्फे व्हीआयपी रोड सोलापूर येथे नवीन विशेष रिटेल स्टोअर सादर करण्यात आले आहे.

मेझानाईन मजला, शॉप नं-५, सिटी सेंटर व्हीआयपी रोड, सोलापूर येथे स्थित आहे. या स्टोअर मध्ये उच्च दर्जाचे, फॅशनेबल आणि परवडणाऱ्या किंमतीतील स्नीकर्स उपलब्ध आहेत.त्यामध्ये ५०% पर्यंत सूट आहे. याप्रसंगी बोलताना कॅम्पस ॲक्टिव्हवेअर लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल अगरवाल म्हणाले, आमचे नवीन दालन एक उत्तम खरेदीचा अनुभव, चांगली दृश्यमानता, परवडणाऱ्या किंमती आणि ग्राहक समाधान उंचावणे यांचे आश्वासन देते.

इच्छुक ग्राहकांनी या नवीन स्टोअरचा लाभा घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत १० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ साठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु असून अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी कळविली आहे. पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी साठी सर्व व्यवस्थापन, सर्व परीक्षा मंडळे, सर्व माध्यम अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. या परीक्षेशी इतर सविस्तर माहितीचा तपशील परिषदेच्या वरील वेबसाईटवर देण्यात आली, असेही राठोड यांनी कळविले आहे.

# लक्झरी बसच्या अपघातात ९ प्रवासी जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील मोहोळजवळील कोळेगाव फाट्याजवळ लक्झरी बसचा भिषण अपघात होऊन या अपघातात ९ जणं जखमी झाल्याची घटना पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घडली.



उमरगा हून पुण्याकडे निघालेली लक्झरी बस क्रमांक एआर ११ ए १२०० ही प्रवाश्यांना घेऊन जात होती. मोहोळजवळील कोळे गाव फाटा येथील सुमंगल हॉटेल समोर लक्झरी बसने मोहोळ कडे निघालेल्या ट्रक क्रमांक पीबी ०२ ईएम ९६३३ ट्रकला मागून धडक दिली. या अपघातात चतुराबाई बिराजदार (वय ५६, रा. हल्लाळी), संजय मोहिते गायकवाड (वय ३८, रा. निलंगा, लातूर), अलकुमा हसन मुल्ला (वय ४०, रा. पुणे), लक्ष्मण भिमराव राठोड (वय ४५, रा. इचगाव तांडा, उदगीर), यश सुर्यवंशी (वय १८, रा. निलंगा), तात्याराव यलकप्पा बिराजदार (वय ६६, रा. दिवी हल्लाळी), आदर्श विठ्ठल ब्रम्हदेव (वय ६, रा. दिवी हल्लाळी), शुभांगी विठ्ठल ब्रम्हदेव (वय २६, रा. पुणे), लक्ष्मीबाई लक्ष्मण राठोड (वय ३०, रा. लातूर) अशी जखमी झालेल्या प्रवाशांची नावे आहेत. अपघातातील जखमींना १०३३ ॲम्बुलन्स मधून डॉ. लखन राजमाने यांनी तात्काळ सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत करण्यात आली आहे.



# माढ्याची मतमोजणी विधानसभा क्षेत्रातच घ्यावी

● **अभिजीत पाटील यांची सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १९ सप्टेंबर-**

श्री संत दामाजी सह.साखर कारखान्याला राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्लीकडून कारखाना उभारणीपासूनचे इतिहासात प्रथमच ९४ कोटी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिल्याबद्दल माजी आ. प्रशांत परिचारक यांचा कृतज्ञता सोहळा आणि शेतकरी मेळावा व कृषी प्रदर्शनाचे आयोजन २१ सप्टेंबर रोजी दुपारी १२.१५ वा. कारखाना कार्यस्थळावर होणार आहे.

अध्यक्षस्थानी धनश्री परिवाराचे संस्थापक शिवाजीराव काळुंगे राहणार आहेत. यावेळी श्री विठ्ठल साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा, कारखान्याचे माजी चेअरमन ॲड. नंदकुमार पवार, रामाकृष्ण नागणे, दामोदर देशमुख, रामचंद्र वाकडे, यादप्पा माळी राहणार असल्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी सांगितले. शेतकरी मेळाव्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे माजी ऊस शास्त्रज्ञ सुरेश माने-पाटील हे ऊस लागवड व खोडवा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अरुण देशमुख यांनीही मार्गदर्शन करणार आहेत. कृषी प्रदर्शनात विविध उपकरणे आणि संस्था सहभागी होऊन माहिती देणार असल्याचे व्हाईस चेअरमन तानाजीभाऊ खरात यांनी सांगितले. याप्रसंगी संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार उपस्थित होते.

आजपासून शानदार प्रारंभ
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
ॲक्शन सस्पेन्स मर्डर मिस्ट्री संटिमेंट भयानक तेलगु चित्र




१२॥,३॥,६॥,वा.

नॅशनल सिनेमा डे निमित्त आज एकच दिवस रू ९९ मध्ये सिनेरसिकांना पाहण्याची सुवर्णसंधी
भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल २ रा आठवडा
आजपासून भव्य प्रारंभ







03.30.PM 06.30.PM
12.30.PM 09.30.PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भगिनी समाज संस्थेतर्फे ५ आक्टोबरला शारदोत्सव कार्यक्रम

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
भगिनी समाज संस्थेतर्फे शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता छत्रपती रंगभवन, सोलापूर येथे शारदोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ट्रस्ट अध्यक्षा विशाला दिवाणजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगिनी समाज ही महिलांच्या मनोरंजनासाठी महिलांनी तयार केलेली संस्था आहे. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून शनिवारी हा शारदोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये सोलो नृत्य, सुगल नृत्य आणि समूह नृत्य अशा गटात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्षा विशाला दिवाणजी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सुवर्णा कटारे, विजया म्हमाणे, सुलभा रहाणे, आरती कुसगल, किरण अंकुशकर, अर्चना पवार आदी उपस्थित होत्या.



## क्राईम वृत्त...

### दारूच्या नशेत तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**
दारूच्या नशेत तरूणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. शंकर अंकुश चव्हाण (वय ३०, रा. जुनी पोलिस लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहाच्या पूर्वी शंकर चव्हाण याने राहत्या घरी दारूच्या नशेत अज्ञात कारणावरून पत्र्याच्या वाशाला टॉवेलच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे नातेवाईकांनी त्यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी त्यास डॉ. विजय सुरवसे यांनी मृत घोषित केले.

### घरात घुसण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**
रूई (ता. बार्शी) येथे दुसऱ्याच्या घरात घुसण्याच्या कारणावरून तसेच लेडीजला छेडछाड केल्याने केलेल्या मारहाणीत तरूण जखमी झाला. ओंकार श्रीहरी केंडे (वय २३) असे जखमीचे नाव आहे. १९ सप्टेंबर रोजी मध्यरात्री च्या सुमारास दुसऱ्याच्या घरात घुसण्याच्या कारणावरून लेडीजला छेडछाड केल्याने बाळासाहेब केंडे यांनी मारहाण केल्याने ओंकार हा जखमी झाला. त्यामुळे त्यास उपचारास भाऊ शुभम केंडे यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वटवटे येथे तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**
पोरीला नांदवून घेण्याच्या कारणाने तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. धोंडीबा तुळशिराम म्हाडकर (वय ३५) असे जखमीचे नाव आहे. धोंडीबा म्हाडकर हे घरी असताना पोरीला नांदवून घेण्याच्या कारणाने जावई पवन गंगाराम वाघमोडे व महादेव खांडेकर व इतर ३-४ जणांनी मिळून दगडाने मारहाण केली. त्यामध्ये म्हाडकर यांच्या डोक्यास जबर मार लागून ते जखमी झाल्याने त्यांना भाऊ प्रभाकर म्हाडकर यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**
चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिरा अमोगसिध्द लोहार (वय ३९, रा. दमाणी नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अमोगसिध्द पांडुरंग लोहार, सासू शांताबाई लोहार, दीर गणपती लोहार, नणंद महानंदा अंकुश (सर्व रा. कोरवली, ता. मोहोळ) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० एप्रिल २००८ ते ६ मे २०२४ या कालावधीत मिरा लोहार या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व इतरांनी लग्नामध्ये चांगला मानपान केला नाही, चांगला हुंडा दिला नाही तसेच घालून पाडून बोलून मिरा यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच घरबांधकामासाठी १० लाख रुपये, ५ तोळे सोने आण आणि मिरा यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन मिरा यंना मारहण करून छळ केला. म्हणून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

### सैपन शेखवर दोन वर्षांसाठी तडीपारीची कारवाई

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
सरकारी काम करणाऱ्यांना दमदाटी करण्यासारखे गुन्हे दाखल असलेल्या सैपन शेख यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिलेले आहेत. तडीपारीच्या आदेशानंतर पोलिसांनी शेख यास पुणे येथे सोडलेले आहे.



सैपन अमिनसाब शेख (वय ५०, रा. नानी मंजिल, कुर्बान हुसेन नगर, हनुमान मंदीराजवळ, उत्तर सदर बझार, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. शेख याच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात सन २०२३ व २०२४ मध्ये साथीदारांसह खंडणी मागणे, सरकारी नोकरी करणाऱ्यांना दमदाटी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे सदर बझार पोलिसांनी शेख याच्याविरुध्द तडीपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत शेख यास दोन वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिलेले आहे.





# राजा शिवछत्रपतींचा सर्वत्र घुमला निनाद

● छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात निघाली भव्य शोभायात्रा : प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १९ सप्टेंबर -**
जय राजा शिवछत्रपतींचा जय मंगलमय हो, श्री शिवछत्रपती जय हो...म्हणत गुरुवारी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. समस्त हिंदू समाजातर्फे आयोजित श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र, अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांच्या छत्रपती शिवाजी महाराज कथेनिमित्त या शोभायात्रेचे आयोजन केले होते.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांनी स्वतः या शोभायात्रेत सहभागी होऊन आयोजकांचा उत्साह वाढवला. बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून शोभायात्रेस प्रारंभ झाला. प्रारंभी प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांच्या हस्ते श्री मल्लिकार्जुन मंदिरात पूजा करण्यात आली. यानंतर शिवग्रंथाची पूजा करून हा ग्रंथ बग्गीत ठेवण्यात आला.

पतंजली महिला पथक, अक्कनबळग संस्थेच्या महिला पथकांनी विविध गीते, घोषणांनी शोभायात्रेत रंगत आणली.सजवलेल्या बग्गीत प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी विराजमान झाले होते. तर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. यावेळी सनातन संस्थेकडून प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांचे औक्षण करण्यात आले.

सबळ पथक, तुतारी, शंखनाद, धनगरी ढोल, अणदूर आणि सोलापुरी हलगीने वातावरणात चांगलाच जोश भरला होता. तर वारकरी मंडळाच्या टाळ-मृदुंगाच्या पथकाने वातावरण भक्तीमय होत होते. शेकडो शिवभक्तांच्या उत्साही सहभागाने ही शोभायात्रा बाळीवेस, छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, भागवत टॉकीजमार्गे जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये पोहोचली. या शोभायात्रेत शहर-जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले होते.

#### चित्तथरारक शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके

शोभायात्रेच्या अग्रभागी सजवलेल्या बैलगाडीत सनई चौघडा वाजत होता. त्यामध्ये हलगी पथक आणि भगवा ध्वज घेऊन तीन अश्वारूढ हिंदू तरुण सहभागी झाले होते. राजस्थानी मंडळाचे महिला पथक विविध गीते म्हणत शोभायात्रेची रंगत वाढवत होते. तर श्री शंकरलिंग मंदिराच्या महिला लेझीम पथकाने लेझीमचे आकर्षक डाव सादर करीत वातावरण भगवेमय केले. सोलापूर शहर जिल्हा लाठी असोसिएशनच्या चित्तथरारक शिवकालीन मर्दानी खेळाने शोभायात्रेतील उत्साह आणखी वाढला. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या बर्ची पथकाने आकर्षक सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते

# आज १ हजार कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्‌घाटन

● सोलापूर जिल्ह्यातील २६ महाविद्यालयांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८ सप्टेंबर-**
महाराष्ट्र राज्यातील १००० आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्‌घाटन प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने शुक्रवार, दि. २० सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा वर्धा येथून होणार आहे. यामध्ये सोलापूर जिल्हयातील २६ महाविद्यालयांचा समावेश आहे.



कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य केंद्रांची स्थापना करण्यात येत आहे. या केंद्रामार्फत १५ ते ४५ वयोगटातील बेरोजगार युवक युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मोदी यांची २० सप्टेंबर २०२४ रोजी वर्धा येथे स्वावलंबी शाळेच्या प्रांगणात जाहीर सभा होणार असून, यामध्ये प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेच्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन व त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. तसेचए कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचे उद्घाटन व यशस्वी महिला स्टार्टअप्स चा सन्मान सोहळा तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे ऑनलाईन उद्घाटन, या तिन महत्वकांक्षी योजनांचा समावेश या कार्यक्रमात राहणार आहे.

आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राकरिता जिल्हयामधील निवड झालेल्या महाविद्यालयांचे केंद्र शासनाच्या Skill India Digital Hub या वेब पोर्टलवर Training Center ला मान्यता घेण्यात येणार असुन प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात साधारण १५० युवक युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हयातील २६ महाविद्यालयांमध्ये विविध प्रकारच्या ५२ कोर्सेसव्दारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्हयातील बेरोजगार युवक युवतींनी सदर प्रशिक्षण केंद्रांमध्ये नोंदणी करुन आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजनेचा लाभ घ्यावा व या कार्यक्रमास प्रत्यक्षीत नोंदणीकृत महाविद्यालयांच्या ठिकाणी उमेदवारांनी उद्घाटन सोहळ्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

# सोलापूरच्या लाडकी बहीण कार्यक्रमास सकल मराठा समाजाचा विरोध

● जरांगे-पाटलांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याची केली मागणी
● सभा उधळून लावण्याचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
आपल्याच राज्यातील शेकडो तरूणांना न्याय व हक्क मिळत नाही व वारंवार सरकारकडून होणारी फसवणूक याला कंटाळून मराठा समाजातील अनेक युवकांनी आत्महत्या केलेल्या असताना व सर्व गोरगरीब मराठा समाजासाठी जीवाची बाजी लावून गेले वर्षभर पाच उपोषण करूनही आता सहावे उपोषण केलेल्या जरांगे पाटलांपेक्षा सोलापूरचा लाडकी बहीण कार्यक्रम सरकारला महत्वाचा आहे का? असा सवाल करून या कार्यक्रमाला सकल मराठा समाजाचा तीव्र विरोध होणार असल्याचा इशारा सकल मराठा समाजाच्या वतीने माऊली पवार यांनी केला दिला आहे. दरम्यान, मराठा समाजाच्या आरक्षण प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास सोलापूरची सभा उधळून लावण्याचा इशाराही त्यांनी दिला.

त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकसभेतून साऱ्या महाराष्ट्रासह भारतात मराठा मतांची किंमत दाखवून सरकारला जबरदस्त हादरा देवूनही जर या सरकारच डोकं ठिकाणावर येत नाही. मायबाप सरकारचा हा सत्तेचा अहंकार बरा नव्हे. आमचं नेतृत्व प्राणपणाने सहाव्यांदा उपोषणाला बसले असतानाही ज्वलंत प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जर सरकार सोलापूरमध्ये लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम घेणार असेल तर अशा सरकारचा आम्ही तीव्र शब्दात धिक्कार करतो. जर आमच्या साठी जीवाची बाजी लावणाऱ्या मनोज जरांगे पाटलांचे उपोषण योग्य तोडगा न काढता जर सरकार हा कार्यक्रम घेणार असेल तर असा कार्यक्रम उधळून लावण्यात येईल, याची शासन व प्रशासनाने दखल घ्यावी, असा


# डीसीसी बँक प्रशासकाला सहा महिन्यांची मुदतवाढ

● मार्चपर्यंत राहणार प्रशासकराज; दोन महिन्यांपासून सीईओंची खुर्ची रिकामीच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती -सहकारी बँक प्रशासक कालावधीला-सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. येत्या मार्च अखेरपर्यंत डीसीसीवर प्रशासक राज राहणार आहे.

संचालक मंडळाच्या कालावधीत बँक आर्थिक अडचणीत आली, थकबाकीची आकडेवारी वाढत असताना संचालकांशी संबंधित संस्थांकडून कर्जे वसूल होत नव्हती. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना कर्ज मिळणे कठीण झाले होते. भरलेल्या कर्जाइतकी रक्कमही पुन्हा मिळेल की नाही?, अशी बँकेची आर्थिक परिस्थिती निर्माण झाली होती.

नाबार्डच्या शिफारशीनंतर रिझर्व्ह बँकेने मे २०१८ मध्ये संचालक मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतरही संचालकांशी



संबंधित संस्थांकडील कर्जे वसूल न झाल्याने प्रशासक कालावधी वाढविण्यात येत आहे. ३१ ऑगस्टपर्यंतचा प्रशासक कालावधी संपल्याने बँकेने प्रशासक मुदतवाढ मागणी प्रस्ताव सहकार विभागाकडे सादर केला होता. त्यानुसार शासनाने येत्या मार्च अखेरपर्यंत प्रशासक कालावधी वाढविला आहे. आता येत्या ३१ मार्चपर्यंत डीसीसीवर प्रशासक राज राहणार आहे.



सध्या बॅंकेची परिस्थिती पाहता बॅंकेला पहिल्यांदा एनपीतून बाहेर काढण्याचा प्रथमत: प्रयत्न चालु आहे. बॅंकेच्या जुन्यां कर्जदारांकडून कर्ज वसुली करुन घेणे, बॅंकेच्या ठेवी वाढवण्याबाबत जोरदार प्रयत्न चालु आहेत. डीसीसी बॅंकेला लवकरच बॅंकेला एनपीतून बाहेर काढणार आहे.
**- कुंदन भोळे, प्रशासक, डीसीसी बॅंक, सोलापूर**

#### प्रस्तावाला मंजुरी नाही

साडेसहा महिन्यांपासून प्रशासक असलेल्या डीसीसी बँकेचे मुख्य कार्यकारी (सीईओ) पद दोन महिन्यापासून रिक्त आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास देसाई यांनी राजीनामा दिल्यानंतर नवा अधिकारी नियुक्त करण्यासाठी बँकेने रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केला आहे. साधारण दोन महिन्यांपासून या प्रस्तावाला मंजुरी मिळाली नाही व प्रस्तावात काही त्रुटी असल्याबाबतही रिझर्व्ह बँकेने कळविले नसल्याचे डीसीसीकडून सांगण्यात आले.

#### सुधारणा मात्र आणखीन हवी...

एकीकडे संचालकांशी संबंधित संस्थांकडील कर्जाचा डोंगर वाढत असताना संचालकांशी संबंधित विकास सोसायट्यांनी उच्च न्यायालयात डीसीसीची निवडणूक घेण्याबाबत याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर रिझर्व्ह बँकेने सोलापूर डीसीसीत आर्थिक सुधारणा झाली आहे; मात्र म्हणावी तितकी सुधारणा झाली नसल्याचे शपथपत्र न्यायालयात सादर केले आहे.

# ७२ वर्षीय सुरेखा दोशी यांचे १६ दिवस निरंकार उपवास

● सोलापूरच्या योगिता भूमकर यांचाही सहभाग
● जैन धर्मातील दशलक्षण महापर्वानिमित्त पालखी महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
जैन धर्मातील दशलक्षण महापर्वानिमित्त मंद्रूपच्या ७२ वर्षीय सुरेखा गुलाबचंद दोशी यांनी व त्यांच्या नणंद येथील ५५ वर्षीय योगिता भूमकर यांनी १६ दिवसांचे निरंकार उपवास केले. त्यानिमित्त माणिक चौकातील श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिरांमध्ये पालखी महोत्सव साजरा करण्यात आला.

आंघोळ करुन पहाटे पाच वाजता मंदिरात तासभर ध्यान धारणा. त्यानंतर पूजा आणि दुपारी दोन वाजता प्रवचन ऐकणे. आरती करुन विश्रांती घेणे. दिवसभरात केवळ एकदा तहान लागेल तेवढे गरम पाणी कोमट करुन पिणे. त्यानंतर दिवसभर मौनधारण अशी त्यांच्या उपवासकाळात दिनचर्या होती. सोळा दिवसांचा निरंकार उपवास हा ऊर्जा देणारा आणि नवसंजीवनी देणारा ठरल्याचे त्या सांगतात. वळसंग येथील ६८ वर्षीय चित्रा शांतीकुमार शहा यांनी १, २, ३, ४ दिवस हा चारित्र्य शुद्धी उपवास प्रकार स्वीकारला आहे. हा उपवास प्रकार दीर्घकालीन असल्याने अधून मधून एकल उपवास साधून त्यात सातत्य राखला जातोय. त्या भगिनी सुरेखा दोशींसोबत ध्यानधारणा आणि प्रवचनात सहभागी असतात. जैन समाजातील पर्युषण पर्वाला ८ सप्टेंबरपासून सुरुवात झाली. या पर्वानिमित्त अनेक श्रावक आणि श्राविका तीन, पाच, दहा, सोळा दिवसांचा उपवास करतात. काहीजण निरंकार तर काहीजण एकल (एकासन) उपवास करताहेत. तरुण वर्गाबरोबर ज्येष्ठांचाही यात सहभाग असतो.



#### दशलक्षण पर्वाचे दहा उपवास केलेले

महेश नळे, गणेश नळे, संकेत शहा, अंजू शहा, विक्रांत शहा, कामिनी गांधी, संध्या काले, सुवर्णा शहा, स्मित शहा.

#### पंचमेरुचे ५ उपवास केलेले

सागर चंकेश्वरा, प्राजक्ता चंकेश्वरा, स्मिता शहा, शुभम मेहता, साहिल शहा, बालब्रह्मचारी नमन जैन.



**आत्मशुद्धीचा काळ :** या पर्वात आध्यात्मिक वातावरणात जैनी मुनींकडून त्याग आणि संयम ही मोठी गोष्ट शिकायला मिळाली. कोणत्याही गोष्टींचा मोह वाईट हा गुणही जाणून घेतला. उलट पर्युषण पर्व हा आत्मशुद्धीचा काळ असल्याची अनुभूती घेतोय.
**- योगिता भूमकर**



**नवसंजीवनी लाभतेय :** १६ दिवसांच्या निरंकार उपवासातून एक सकारात्मक उर्जा मिळतेय. शरीर जरी क्षीण होत असले तरी अंतर्मन मजबूत होतय. या काळात ईश्वराशी एकरुप होण्याची संधी मिळतेय. त्यांना जवळून अनुभवतोय.
**- सुरेखा दोशी**

# सोलापुरात रविवारपासून रोप सांस्कृतिक महोत्सव

आ. रोहित पवार यांच्या वाढदिवासाचे निमित्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**
रोप फाउंडेशन सोलापूरच्या वतीने आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापुरात रविवार दि. २२ ते २९ सप्टेंबर दरम्यान रोप सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक अध्यक्ष प्रशांत बाबर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणीची अंतिम मुदत दि. २१ सप्टेंबर पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी युसुफ पिरजादे (मो.९८९०८६९८१४, जया वाघमारे (मो. ९५६१०३७५६८) यांच्याशी संपर्क साधावा.

या पत्रकार परिषदेस प्रा. अश्विनकुमार नागणे, मुसा अत्तार, रियाज अत्तार , अजित पात्रे, मिलिंद गोरे, यून्नुस अत्तार, युसुफ अत्तार आदी उपस्थित होते.

#### विविध कार्यक्रम असे

- रविवार दि. २२ सप्टेंबर : सकाळी ६ वाजता गोविंद श्री चौक, जुळे सोलापूर येथे स्केटिंग स्पर्धा.
- २३ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर : मोफत बाल क्रीडा प्रशिक्षण. बुधवार दि. २४ सप्टेंबर : निबंध व वक्तृत्व स्पर्धा. गुरुवार २५ सप्टेंबर : महिला कबड्डी स्पर्धा. गुरुवार दि. २६ सप्टेंबर : विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये चित्रकला स्पर्धा.
- शुक्रवार दि. २७ सप्टेंबर : सायंकाळी ४ वाजता शासकीय मैदान, विजापूर रोड, सोलापूर येथे अथलेटिक्स स्पर्धा.
- शनिवार दि. २८ सप्टेंबर : द्वारकाधीश मंदिर, जुळे सोलापूर येथे महिलांसाठी भजन स्पर्धा.
- रविवार दि. २९ सप्टेंबर : सायंकाळी ४ वाजता मांगल्य मंगल कार्यालय, भारती विद्यापीठ शेजारी, विजापूर रोड ,सोलापूर येथे सांस्कृतिक, नृत्य, गायन, फॅशन शो या स्पर्धा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९०

**इहींची दोही डोळां । पाहावें विश्वरुपा सकळा ।**
**तो श्रीकृष्णें सोहळा । पुरविला ऐसा ।।**

अर्जुनाला दिव्य दृष्टी न देता विश्वरुप दाखविल्याने ते दिसले नाही. हे भगवंतांच्या लक्षात आल्याने भगवंतांनी अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली आणि विश्वरुप दाखवायला सुरुवात केली. आपण सर्व जीवसृष्टीपासून कसे वेगळे नाहीत, हे भगवंतांनी त्यांच्या विश्वरुपातून अर्जुनाला दाखवून दिले. अर्जुनावर भगवंतांची कृपा झाल्याने अर्जुनामध्ये आता भेद नांवाचा शब्दच शिल्लक राहिला नाही, असे संजय राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. भगवंतांनी भव्य, दिव्य असे विश्वरुप दाखविण्यास प्रारंभ केला या विश्वरुपात काळे, गोरे, जड, हलके, चांगले, वाईट, आक्राळ-विक्राळ, सर्व प्रकारची रुपे दिसु लागली. जगाच्या पाठीवर असणा-या प्राणीमात्रांचे, मानवी देहाच्या विविध रंग रुपाचे एकत्रिकरण या विश्वरुपात दिसु लागले. हे विश्वरुप पाहिल्याने अर्जुनाची इच्छा कशी पूर्ण झाली हे संजय राजा धृतराष्ट्राला सांगतांना म्हणाला, इहींची दोही डोळां। पाहावें विश्वरुपा सकळा । तो श्रीकृष्णें सोहळा । पुरविला ऐसा ।।. अर्थात, अर्जुनाची विश्वरुप पाहण्याची इच्छा भगवंतांनी अशा प्रकारे पुरविली असल्याचे संजय तल्लीनतेने म्हणाला.



अर्जुनाला चोहीकडे एक विश्वरुपच दिसत होते. या विश्वरुपाचा अर्जुनही एक भाग होता. श्रीकृष्ण परमात्माही त्या विश्वरुपात अर्जुनाला दिसत होते. पृथ्वी तलावरील सर्व जड, जीव म्हणजे विश्वरुप होय असे अर्जुनाला जाणवले. परमेश्वर हा या जीवमात्रापेक्षा वेगळा नाही. सर्व जीवमात्र ही त्या एकाच ईश्वराचे अंश आहेत. हे सर्व मिळूनच ईश्वर बनला आहे. माणसाने प्राणीमात्रात भेद करण्याची गरज नाही. सर्वांना समान समजून माणसाने वागले पाहिजे. ईश्वरच जर भेद मानत नाही तर आपण भेद मानणारे कोण ? असाही प्रश्न अर्जुन स्वत:ला करीत आहे. परमेश्वराचे विश्वरुप दर्शन घेतले असता, परमेश्वर नाही अशी जागाच शिल्लक नसल्याचे अर्जुनाच्या लक्षात आले. जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी हा परमेश्वर भरुन उरल्याने त्याला वेगळे स्वरुप देऊन शोधण्याची गरज नाही. अर्जुनाने डोळे बंद केले तरी त्याला विश्वरुपच दिसु लागले. डोळे उघडे केले तरीही विश्वरुप व बंद केले तरीही विश्वरुपच दिसत होते. अर्थात बाहेरही विश्वरुप व आतही विश्वरुप असल्याची अनुभुती अर्जुनाला येत होती. प्रत्येक माणसानेही हाच विचार करायला हवा. आपल्यात जो भगवंत आहे, तोच इतरातही आहे. हात जे आहे, तेच बाहेर आहे. त्यामुळे आत-बाहेर वेगवेगळे न वागता आतुन-बाहेरुन सारखे वागावे म्हणजे खरे सुख लाभते. माणूस सुखासाठी जगत असतो हे सर्वांना मान्यच करावे लागते. क्षणीक सुखाचा विचार न करता कायम स्वरुपी सुखाचा विचार केला तर माणूस चोहीकडे समदृष्टी ठेवु शकतो. समदृष्टी ठेवुन माणूस वागू लागला तर समाजातील अनेक प्रश्न मिटु लागतील. आपल्याबरोबर इतरांनाही सुख समाधान मिळू लागेल. अर्जुनाला दिव्यदृष्टी प्राप्त झाल्याने तो आत-बाहेर सर्वत्र विश्वरुप पाहू लागला. आपणालाही संत साहित्यातून दिव्यदृष्टी मिळाली आहे, असे गृहीत धरुन आपणही सर्वत्र सम पाहावे. यामुळे आत्मसुख लाभेल व इतर लोकही सुखी होतील.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार**
**दि. २० सप्टेंबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - भाद्रपद**
**कृ. तृतिया (२१.१५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- आश्विनी (२६.४२)**
**योग - धृव (१५.१८)**
**करण - वणिज (१०.५५)**
**दिनविशेष -**
**बृहतगौरी (डोरली) व्रत**
**गणेश यात्रा**
**चांगला दिवस.**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**वृषभ :** व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

# शाळा तपासणीत केंद्र प्रमुखांची बनवाबनवी; पेन्सिलने केले गुणांकन

### मुख्याध्यापकाकडून जाब विचारताच केंद्रप्रमुखांनी ठोकली धूम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवर 'मुख्यमंत्री स्वच्छ शाळा, सुंदर शाळे'चे गुणांकन दोन केंद्रप्रमुखांनी सिस्पेन्सिलने केले. याविषयी मुख्याध्यापक महांतेश कट्टीमनी यांनी जाब विचारताच केंद्रप्रमुखांनी मैंदर्गी शाळेतून धुम ठोकल्याचे चित्र पहावयास मिळाले. केंद्रप्रमुखांकडून सिस्पेन्सिलनने गुणांकन करुन शाळेचे गुण कमी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेने अक्कलकोट गटशिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना निवेदन दिले आहे.







अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी मुली शाळेत सलगर व उडगी केंद्राच्या केंद्रप्रमुखांनी तालुका पातळीवरील 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' पडताळणीसाठी आले होते. वर्गात जाऊन गुणवत्ता स्वच्छतेबद्दल निरीक्षण करतो म्हणून वर्गावर गेले. मुख्याध्यापकांना वर्गावर सोबत येण्यास मनाई केली. सर्व फॉर्म, गुणतक्ता सिस्पेन्सिलने लिहिले तसेच मुख्याध्यापकांची सही करा, असे सांगितले. मुख्याध्यापकांनी सही देतो.



'मुख्यमंत्री स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' गुणांकनासाठी केंद्रप्रमुखांना अधिकार नसताना ही शाळेवर आले. त्यांनी मुख्याध्यापकांना सोबत न घेता वर्गावर गेले. त्यानंतर सर्व वर्गाच्या तपासणी करून आल्यानंतर सर्व शाळेंची गुणवंत्ता पेन्सिलने केली. त्यानंतर मी त्यांना पेनानी पोहच द्या पेन्सिलने पोहच नको असे म्हटल्यानंतर त्यांनी तेथून पळ काढला आणि ते म्हणाले की हे सर्व आम्हाला अधिकार नाही सर्व अधिकारी गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे आहेत म्हणून निघून गेले.मग त्यांना असली महणावे की नकली म्हणावे काय ? असा प्रश्न आम्हाला पडला आहे.

**- महांतेश कट्टीमनी,** मुख्याध्यापक

शाळा तपासणीसाठी मी आणि केंद्रप्रमुख गेलो होते. काही कामास्तव मला परत कार्यालयात यावे लागले. त्यामुळे शाळा तपासणीसाठी गेलेले केंद्रप्रमुख हे अधिकृत आहेत. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांच्यात काही गैरसमज झाले आहेत. त्यामुळे गेलेले अधिकारी हे तोतया नव्हते.

**- प्रशांत अरबळे,** गटशिक्षणाधिकारी, अक्कलकोट

# जाकेपिंपरी गावामध्ये 100 रोपांची लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**परांडा, दि. १९ सप्टेंबर-**

जाकेपिंपरी गावचे सुपुत्र वृक्षमित्र अप्पा बल्लाळ व सर्व ग्रामस्थांच्या पुढाकाराने ११० रोपांचे वृक्षारोपण करून रोपांचा संरक्षणासाठी त्याला ट्री गार्डही बसवण्यात आले.

ट्री गार्डसाठी संदीप बारस्कर, समाधान लांडगे, बालाजी लांडगे, बालाजी बारस्कर, श्रीराम बारस्कर, गेनभाऊ बारस्कर, विष्णू बारस्कर, बाळासाहेब बारस्कर, डॉ. पांडुरंग बारस्कर व वाल्मीक लांडगे यांनी



३५ हजारांची देणगी दिली. तसेच रामभाऊ लांडगे यांनी पाच लिटर तणनाशक फवारण्यासाठी दिले. जाकेपिंपरीचे सरपंच विशाल बारस्कर, ग्रामसेविका वैशाली जाधव, संगणक ऑपरेटर गणेश, रामकृष्ण लांडगे, लक्ष्मण कानगुडे, विष्णू बारस्कर, नारायण लांडगे, मारुती अरुण लांडगे, संदीप लांडगे, बाबुराव लांडगे, बाळासाहेब कानगुडे, पोपट बारस्कर, बप्पा बारस्कर, दत्ता गंभीरे, आप्पा बल्लाळ, जाकेपिंपरी शाळेचे मुख्याध्यापक नितीन गायकवाड, सहशिक्षक धनंजय ढगे व शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला. सामाजिक कार्याची आवड असणारे वृक्ष मित्र आप्पा बल्लाळ व ग्रामस्थांच्या पुढाकाराने जवळजवळ शंभर रोपांचे वृक्षारोपण करण्यात आल्याने गावाच्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडली आहे.



# सेवासदन प्रशालेत हिंदी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

हिंदी दिनाचे औचित्य साधून सेवासदन प्रशालेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे आर्य समाज मंडळाचे प्रदीप आर्य उपस्थित होते. स्वागत गीत गायन शिक्षक विलास कुलकर्णी व विद्यार्थिनींनी सादर केले. यावेळी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रशालेतील शिक्षक रेवणसिद्ध कट्टे यांनी करून दिली. मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे प्रदीप आर्य यांचा सत्कार करण्यात आला.

विजयालक्ष्मी झांबरे हिने हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या जीवन व कार्य सांगितले. इयत्ता सातवीतील विद्यार्थीनींनी मोबाईल मुळे मुलांवरील परिणाम या विषयावर नाटक सादर केले. ६वी तील विद्यार्थिनींनी विज्ञापन जाहिरात सादर केली. ५ वी तील विद्यार्थिनींनी देशभक्ती गीत सादर केले. प्रदीप आर्य यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी सेवासदन संस्था अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, सतीश घंटेनवरू उपस्थित होते. हिंदी विभाग प्रमुख मीनल उदनुर, वृषाली डोंगरे, खांडेकर, मेकाले, माळगे, लाड, बागवडे, संतोषी सुरवसे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जॉईन फॉर पीस शांतता पुरस्काराचे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

माजी आमदार दिलीप माने, कामगार नेते कॉ. एम. एच. शेख, ज्येष्ठ विचारवंत दत्तात्रय थोरे व रूग्णसेवक डॉ. प्रदीप छंचुरे यांची जॉईन फॉर पीस शांतता पुरस्कारासाठी निवड समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला व सचिव प्रा. जैनुद्दीन पटेल यांनी जाहीर केले.




सन्मानपत्र, गौरवचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते जागतिक शांतता दिनी म्हणजेच शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वा. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

जॉईन फॉर पीस संस्था समाजात सामाजिक सलोखा निर्माण होवून शांतता व बंधूभाव निर्माण होण्यासाठी सध्या प्रयत्नशील आहे.

याचाच एक भाग म्हणून २१ सप्टेंबर जागतिक शांतता दिनाचे औचित्य साधून समता बंधूता या तत्वांना प्रमाणित मानून मानवता, सामाजीक ऐक्य, शांतता व राष्ट्रीय एकत्मता जोपासण्याचे काम करण्या-या व्यक्तींना मागील पाच वर्षापासून शांतता पुरस्कार २०२४ने सन्मानीत करण्यात येत आहे.

## हभप निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे शुक्रवारी कीर्तन

**सोलापूर, दि. १८ सप्टेंबर-**

केगांव येथे शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरिकिर्तन होणार असल्याची माहिती अखिल भाविक वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष हभपसुधाकर इंगळे महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हभप श्री. काशिनाथ दळवे आयोजित श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्राणप्रतिष्ठा २१ व्या वर्धापन दिनानिमित्त हे कीर्तन होणार आहे. समाजामध्ये मुलांमुलींवर योग्य संस्कार व्हावेत, मुले व्यसनाच्या नादी न लागता त्यांच्यामध्ये वारकरी संप्रदायाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने किर्तनाचे व प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, असे हभप काशीनाथ दळवे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस हभप नागनाथ महाराज पाटील, ह.भ.प. ज्योतीराम महाराज चांगभले, हभप संजय महाराज पवार व सोमनाथ राऊत उपस्थित होते.

# 'ग्लोबल व्हिलेज'मध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी येथे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारीत रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून आचार्य चाणक्य कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

या केंद्राचे उद्घाटन शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व खासदार प्राणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास हणमंत नलावडे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगिता शहा-चनशेट्टी व उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी या मान्यवरांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत संपन्न होत आहे. ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयात जनरल ड्युटी हेल्थ असिस्टंट या कौशल्य अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाली आहे. या उद्घाटन कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थी उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. यशवंत डोके व केंद्र समन्वयक मल्लिनाथ जळकोटे यांनी केले आहे.

# दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांचे दोन महिन्याचे वेतन नाही

## वेतन ऑनलाईन जमा दाखवते; प्रत्यक्षात खात्यात नाही जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या दिव्यांग शाळेतील अस्थिव्यंग, मतिमंद प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचे मार्च, एप्रिल २०२४ या दोन महिन्यांचे वेतन झाले नाही. मात्र ऑनलाईन त्यांचे वेतन झाल्याचे दाखवित आहे. मात्र प्रत्यक्षात त्या कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वेतनाची रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे समाजकल्याण विभागाचा भोंगळ कारभार समोर आला आहे.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन हे ऑनलाईन समाजसेवार्थ प्रणालीद्वारे केले जाते. मात्र कार्यालयातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा निधी इतरत्र वळून कर्मचाऱ्यांना वेतनापासून दूर ठेवल्याचा दावा शिक्षक भारती दिव्यांग शाळा संघटनेने केला आहे. मात्र तांत्रिक अडचणीमुळे वेतन अडकल्याची माहिती जिल्हा समाजकल्याण विभागाने दिली आहे.

काही कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिने झाले नाही, तर बऱ्याच कर्मचाऱ्यांचे त्यापेक्षाही जास्त महिन्यांचे वेतन रखडले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. वेतन वेळेवर व्हावे, अशी मागणी दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांतून होत आहे. दिव्यांग शाळेतील अस्थिव्यंग,मतिमंद प्रवर्गातील कर्मचाऱ्यां एका महिन्याचे वेतन तांत्रिक अडचणीमुळे अडकले आहे.

याविषयी मुख्य व वित्त लेखाधिकारी यांनी जिल्हा कोषाधिकारी यांना तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत तसेच समाजकल्याण विभागाने जिल्हा कोषाधिकारी यांना पत्र दिले आहे. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांचे वेतन मिळून जाईल.

**- अमोल जाधव,** जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. प. सोलापूर

सी.एम.पी. हैदराबाद प्रणालीद्वारे होणारे तीन महिन्यांचे वेतन झाले नाही. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा कोषाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे; मात्र त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. सी.एम.पी. हैदराबाद येथेही ई-मेल केला आहे. त्यांच्याकडून ई-मेलची दखल घेतली जात नाही.

**- दीपक मुठाळ,** जिल्हाध्यक्ष, शिक्षक भारती दिव्यांगशाला

# महा-स्वच्छता श्रमदान मोहिमेत सहभागी व्हा

- स्वच्छता ही सेवेचा या लोगोचा शुभारंभ
- जिल्ह्यात सफाईमित्र कर्मचाऱ्यांसाठी नोंदणी सुरू

### सिईओ कुलदीप जंगम यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

स्वच्छहा ही सेवा या उपक्रमाची प्रभावी पणे अंमलबजावणी करा. महा स्वच्छता श्रमदान मोहिमेत सहभागी व्हा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास प्रकल्प यंत्रणा विभागाच्या सभागृहात विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांचे बैठकीत स्वच्छता ही सेवा या उपक्रमाचा शुभारंभ स्वच्छता ही सेवेचा लोगोचे अनावरण सिईओ कुलदीप जंगम यांचे




हस्ते करणेत आले. या प्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.), इशाधीन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व.स्व) अमोल जाधव ,महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रशांत मिरकले , शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) सचिन जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव उपस्थित होते.

जिल्ह्यात आज पासून सफाईमित्र कर्मचारी यांच्यासाठीचा नोंदणी सुरू करण्यात आली आहे. असे सांगून सीईओ कुलदीप जंगम यांनी प्रत्येक गावात युवकांचा सहभाग, श्रमदान, प्लास्टिक व्यवस्थापन, बाजार पेठेतील स्वच्छता, खाऊ गल्ली तील स्वच्छता, बसस्थानके , रेल्वे स्थानक परिसर, आरोग्य मंदिर परिसर, शाळा व अंगणवाडी व शासकीय संस्थाचा परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. ही मोहिम २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. १९ सप्टेंबर रोजी महा श्रमदान मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यात १८ सप्टेंबर रोजी सफाई मित्र सुरक्षा शिबिरे उपक्रमाद्वारे सफाई मित्रांसाठी एक खिडकी योजनेद्वारे सर्व योजनांच्या अनुषंगाने पात्र लाभार्थी मोहीम सुरू करण्यात आली १९ सप्टेंबर रोजी एक दिवस श्रमदानासाठी या ठिकाणी सर्व सार्वजनिक मोहीम घेण्यात आले. तसेच दिनांक २० सप्टेंबर रोजी खाऊगल्ली मध्ये स्वच्छतेचे अनुषंगाने मोहीम राबविण्यात येत आहे संस्कृतीने लोकसभागाच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोट-दुधनी महामार्गावर खड्डेच खड्डे

**अक्कलकोट, दि. १९ सप्टेंबर-**

अक्कलकोट ते दुधनी महामार्ग अंत्यंत खराब झाला असून या महामार्गावर खड्डे पडले आहेत. वाहने चालविताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहेत. अक्कलकोट ते दुधनी महामार्गावरील खड्डे बुजवून हा मार्ग दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी वाहनचालकासह स्वामी समर्थ, दत्त भक्तांमधून होत आहे. अक्कलकोट ते दुधनी हा महामार्ग एक महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. सदरच्या महामार्गावर काही ठिकाणी खड्डे पडले असून रस्ता खराब झाला आहे. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. सदरचा महामार्ग हा अपघातास आमंत्रण देत आहे. संबंधित महामार्ग प्राधिकरण कार्यालयास याबाबत नागरिकांनी तक्रार केली आहे. या रस्त्यावर ठेकेदाराकडून खड्डे बुजविण्याचे काम चालू केले आहे. ठेकेदारांकडून खडी व मुरूम भरून खड्डे भरले जात आहेत. निकृष्ट दर्जाचे काम ठेकेदारांकडून सुरू असल्याचा आरोप संगोगी ब॥ ग्रामपंचायत सदस्य कामगोंडा कर्णकोटी यांनी केला आहे. अक्कलकोट ते दुधनी या महामार्गावरील खड्डे बुजवून तो दुरुस्त करावा. वाहनचालकांना तसेच नागरिकांना होणारा त्रास संबंधित विभागाने लक्ष घालून कमी करावा, अशी मागणी केली जात आहे.



### मंद्रुप येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात

**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**

मंद्रुप येथे विश्वकर्मा पांचाळ समाजाच्या वतीने भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन उद्योगपती धनंजय लक्ष्मण सुतार व कृषी अधिकारी अमोघसिद्ध बडीगेर-लोणी यांनी केले. विश्वकर्मा हे सुतार, सोनार, कंबार, कंचगार, शिल्पी या पांचाळ समाजाचे आराध्य दैवत असून या देवाची जयंती १७ सप्टेंबरला साजरी केली जाते. यावेळी महाप्रसाद वाटप करण्यात आले. कार्यक्रमास गौरीशंकर मेंडगुदले, भगवान सुतार, बसवराज सुतार, शिवानंद सुतार, सागर सुतार, सोमशेखर सुतार, अभिषेक पोतदार, प्रसाद पोतदार, उमेश कुंभार, राजकुमार कुंभार, शिवानंद लोभे, प्रशांत स्वामी, सिध्दाराम पोतदार, मोनप्पा सुतार, विजयकुमार दीक्षित, निरंजन सुतार, शिवानंद सुतार, सचिन सुतार, काळप्पा सुतार, सिद्धाराम सुतार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुभाष सुतार यांनी तर आभार सतिश सुतार यांनी मानले.



### तंटामुक्त अध्यक्षपदी गाडेकर यांची निवड

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

इंगळगी गावच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते भुताळीबाबा गाडेकर यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. इंगळगी ग्रामपंचायतीच्यावतीने मंगळवारी सरपंच विनोद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा झाली. यावेळी ग्रामसेविका एस. जी. नरोळे यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर तंटामुक्त अध्यक्षपदासाठी गावकऱ्यांनी भुताळीबाबा गाडेकर यांचे नाव सुचविले. सर्वांच्या अनुमतीने सरपंच विनोद बनसोडे यांनी त्यांची निवड जाहीर केली. यावेळी उपसरपंच गोदावरी प्रधान गुरव, मल्लिकार्जुन नरूटे, इंद्रजीत माने, गोरख माळी, सागर धुळवे, बसवराज गाडेकर, भीमाशंकर बंदीचोडे, सुलतानी कोटे, राहुल कोटे, अमर माने, बसवराज गंभीरे, रविकांत घोडके, रेवणा स्वामी, सलीम शेख, सतीश वंजारे आदी उपस्थित होते.



### बार्शीत ८८ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि. १९ सप्टेंबर-**

येथील सुभाषनगर येडाई विहीर रोड या ठिकाणी गेल्या दोन वर्षापासून ईद-ए-मिलाद पैगंबर जयंतीनिमित्त व इकबाल बागवान यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी पैगंबर जयंतीदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात सर्व समाजातील बांधवांनी उत्साहात सहभाग नोंदवला. यावेळी ८८ रक्त पिशव्या रक्त संकलन झाले. बार्शी येथील रामभाई शहा रक्तपेढीने रक्त संकलन केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी फ्रेंड सर्कल सुभाषनगर, अनिल मालक प्रतिष्ठान, बागवान सोशल फाउंडेशन, शेरे हिंद प्रतिष्ठान, अन्वर बागवान मित्रमंडळ यांनी परिश्रम घेतले.

### सांगोल्याच्या 'शिवाजी'मध्ये इंडक्शन प्रोग्राम

**सांगोला, दि. १८ सप्टेंबर-**

शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली इंडक्शन प्रोग्राम पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. महेश दौंड, प्रा. पी. जी. पवार, प्रा. संदीप बावचे, प्रा. आनंद गायकवाड, प्रा. पृथ्वीराज लिगाडे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीमध्ये एकी, बेकी नाहीच...!

**उमेश पाटील : राष्ट्रवादी अजित पवार गटाचा निर्वाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १९ सप्टेंबर-**


राजन पाटील कोणत्याही पक्षात जाऊ द्या. ते ज्या पक्षात जातील, त्या पक्षाचा विधानसभेतील उमेदवार आम्ही पाडल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. आमच्या एकी आहे, मुळता बेकी नाही, असा निर्वाळा मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने दिल्याची माहिती समितीचे सदस्य व राष्ट्रवादी (अजित पवार गटा)चे राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिली.

मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची बैठक झाल्यानंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या समितीमध्ये फूट पडले आहे अशी चर्चा गेले आठ-दहा दिवस तालुक्यात होत आहे. यामुळे बरेच समज-गैरसमज निर्माण झाले आहेत. याचा खुलासा करण्यासाठी या पत्रकार परिषदेच्या आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दीपक गायकवाड, मानाजी माने, संजय क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, जि. प. अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती विजयराज डोंगरे, ॲड. हिंदूराव देशमुख, ॲड. हेमंत शिंदे, सत्यवान देशमुख आदींसह समिती सदस्य उपस्थित होते.

उमेश पाटील म्हणाले की, विरोधकाकडून मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीवर टीका केली जाते. फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा फुटला, त्याला हे काम दिले, त्याला ते काम दिले अशा प्रकारची वक्तव्ये केली जात आहेत. परंतु तसे काहीही नाही. ज्यांना जी कामे मिळाली आहेत. ती शासनाची काम आहेत. त्याचे मागच्या सहा महिन्यापूर्वी शासनाचे निकष पूर्ण करीत टेंडर भरलेले असते. त्यामुळे अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. पहिले जे जे सदस्य आपल्यासोबत होते, ते सर्व आजही सोबत आहेत. सर्वजण बैठकीला उपस्थित होते. जरी अप्पर कार्यालयाचे उद्घाटन झाले असले तरी ते कधीही रद्द होऊ शकते. उच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधीन राहून हे सर्व रद्द होऊ शकते. जरी यातून तीन गावे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला असला तरी काही हरकत नाही. ती मागणी संघर्ष समिती स्थापन होण्याअगोदर करण्यात आली होती. त्यामुळे काही गैरसमज झाले होते, ते दूर झाले आहेत.

**राजकीय जोडे बाहेर ठेवणार**

राजन पाटील परिवाराकडे आमदार असल्यामुळे रजिस्टर ऑफिस, अप्पर तहसील कार्यालय अनगरला नेण्यासारखे जुलमी निर्णय जनतेवर लादले जात आहेत. त्याचं मूळ आमदारकीत दडलेले आहे. यशवंत माने हे राजन पाटील पुरस्कृत आमदार आहेत. यशवंत माने हे निमित्त आहेत. कर्ते-करविते राजन पाटीलच आहेत. त्यामुळे उद्या राजन पाटील कोणत्याही पक्षात जाऊ द्या, त्या पक्षाच्या विरोधात आम्ही सर्वजण आमच्या पक्षाचे राजकीय जोडे बाहेर ठेवून काम करणार आणि त्यांच्या पक्षाचा उमेदवार पाडणारच. राजन पाटील एक पक्ष, मोहोळ तालुक्याची जनता दुसरा पक्ष असेल इतर कोणीही मध्ये नसणार आहे, उमेश पाटील म्हणाले.





**जुलमी राजवट उद्ध्वस्त करण्यासाठी लढा**

आमचा लढा हा व्यक्ती स्वातंत्र्य वाचवण्यासाठी, अन्याय-आत्याचार वाचवण्यासाठी असेल. त्यांची जुलमी राजवट उद्ध्वस्त करणे व तालुक्यात परिवर्तन करणे एवढाच समितीचा उद्देश असेल. त्यासाठी सर्वच पक्षाचे लोक आमच्या सोबत असल्याचेही उमेश पाटील यांनी सांगितले.

## मंगळवेढ्यात गणरायाला भावपूर्ण निरोप

**पोलिस अधीक्षकांनी प्रत्यक्ष भेट देऊन मिरवणूक मार्गाची केली पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १९ सप्टेंबर-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात ढोल ताशाच्या पारंपारिक गजरात अकरा दिवसांच्या विश्रांतीनंतर श्री गणरायाला गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या.. च्या जयघोषात निरोप देण्यात आला. दरम्यान गणेशोत्सव कुठलाही अनुचीत प्रकार न होता शांततेत हा उत्सव पार पडल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

७ सप्टेंबर रोजी श्री गणरायाचे वाजत गाजत शहराच्या मुख्य मार्गावरुन मिरवणूका काढून गणेशोत्सव मंडळाने श्रींची प्रतिष्ठापना केली होती. दरम्यान यामध्ये शहरामध्ये ३९ ते ग्रामीण भागात १७० असे एकूण २०९ गणेशोत्सव मंडळाने श्रीची प्रतिष्ठापना केली होती. अकरा दिवसांच्या विश्रांतीनंतर दि.१७ रोजी वाजत-गाजत उत्साहात गावोगावी गणेशोत्सव मंडळाने श्रीला निरोप दिला. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंगळवेढा शहरातील ज्या मार्गावरुन गणपतीची मिरवणूक निघणार होती त्या सर्व मार्गांची प्रत्यक्ष पाहणी केली. मंगळवेढ्याच्या इतिहासात प्रथमच पोलीस अधिक्षकांनी अनंत चतुर्थी दिवशी प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केल्याने मंगळवेढेकरांच्या भुवया उंचावल्या होत्या. त्यांनी गणपतीचे विसर्जन करण्यात येणार्या श्री कृष्ण तलावालाही भेट देवून सुरक्षेच्या दृष्टीने बॅरीगेट लावलेत का याचीही पाहणी केली. दरम्यान येथे नगरपालिकेने मुर्ती संकलन केंद्र उभे केल्याने विविध मंडळाने गणपती मूर्ती येथे जमा केल्या. त्याच बरोबर प्रतीवर्षीप्रमाणे यंदाही नगरपालिकेत मुर्ती संकलन केंद्र उभे केले होते.



**मोठा पोलिस बंदोबस्त**

पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी य१ांच्या भेटी दरम्यान डीवायएसपी विक्रांत गायकवाड, पो. नि. महेश ढवाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे आदी उपस्थित होते. मिरवणुकीदरम्यान पोलीस प्रशासनाने मोठा बंदोबस्त चौकामधून ठेवल्याचे चित्र होते.



## करकंबमध्ये डीजेला फाटा... पारंपरिक वाद्यांचा थाट

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १९ सप्टेंबर-**

कडकडणारी हलगी, जोडीला ताशा, पिपाणी आणि वेगवेगळ्या प्रकारची सोंगे अर्थात जीवंत कार्टून बघण्यासाठी करकंब परिसरातील लोकांनी मोठी गर्दी केली होती. यंदा डीजेला फाटा दिल्याने पारंपारिक वाद्यांचा थाट विसर्जन मिरवणुकीत जाणवला.

करकंब येथील शिवरत्न सामाजिक बहुउद्देशीय संस्था व गणेश तरुण मंडाळाने आगळी-वेगळी मिरवणूक काढली. सुरुवातीला करकंबचे सपोनि सागर कुंजीर यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली. छत्रपती शिवाजी चौक, थोरली वेस, मारुती मंदिर, आतार चौक, पुरवत गल्ली, मेन रोड, शुक्रवार पेठ, धाकटी वेस, टिळक चौकमार्गे ही मिरवणूक काढण्यात आली. डॉल्बी किंवा इतर कर्णकर्कश आवाजातील भोंगे नसल्याने आणि पारंपरिक वाद्ये व वेगवेगळ्या वेशभूषा केलेले कार्टून सारखे दिसणारे जीवंत देखाव्यांनी मिरवणुकीत रंगत आणली. याप्रसंगी मंडळांचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी तर आभार अतुल अभंगराव यांनी मानले. करकंब पोलीस ठाण्यांतर्गत असणाऱ्या श्रीगणेश मंडळांपैकी शिवरत्न सामाजिक बहुउद्देशीय संस्था श्री गणेश मंडळाचा विशेष सन्मान व सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी करकंब पोलीस स्टेशनचे सपोनि सागर कुंजीर, पोह आर. आर. जाधव, विजय गोरवे, दयानंद हजारे, भांगे उपस्थित होते.

मंडळाचे हे २१ वर्ष असून आकर्षक विद्युत रोषणाई, प्रबोधनपर पोस्टर, सर्व रोगनिदान शिबिर, रक्तदान शिबीर, शालेय मुलींना दत्तक, वाचनालयास पुस्तके भेट, वृक्षारोपण, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान इत्यादी उपक्रम हे मंडळ राबविते.

**- विनायक राजगुरु,** अध्यक्ष

## कंत्राटी वायरमनचा मुलगा होणार डॉक्टर

**कंदलगावमध्ये आनंद; महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिल्या शुभेच्छा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापुरातील कंदलगाव येथे राहणाऱ्या महावितरणमधील कंत्राटी वायरमनच्या मुलाला डॉक्टर होण्याची संधी मिळाली आहे. याबाबत विविध स्तरातून त्याच्या गुणाचे कौतुक होत आहे.



समर्थ परशुराम राऊतराव असे त्या विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याचे वडील परशुराम राऊतराव हे महावितरणमध्ये हगलूर सेक्शनमध्ये कंत्राटी वायरमन आहेत. आई जयश्री या अंगणवाडी सेविका म्हणून गावातच कामकाज पाहतात. या दोघांनी अत्यंत कष्टातून डॉक्टर बनण्याचे मुलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. कंत्राटी वायरमनची ही जिद्द पाहून महावितरणच्या अधिकाऱ्यांनीही राऊतराव यांच्या मुलाचे कौतुक केले आहे. समर्थचे बारावीपर्यंत शिक्षण मंद्रुपमधील लोकसेवा हायस्कूलमध्ये झाले. ८६ टक्के मार्क घेऊन तो कॉलेजमध्ये तिसरा आला. त्यानंतर नेट परीक्षेत त्याला ५५२ मार्क मिळाले. तसेच कंदलगाव येथीलच वैष्णवी रमेश वाघमोडे हिला ५८५ गुण मिळाले. या दोघांनाही एमबीबीएसमध्ये शासकीय कोट्यातून प्रवेश मिळाला आहे. समर्थला पुणे येथील तळेगाव कॉलेजमध्ये एमबीबीएसला प्रवेश मिळाला आहे. डॉक्टर होण्याचे आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे त्याने सांगितले. कंदलगावातील चर्मकार समाजातील पहिला डॉक्टर होण्याचा मान समर्थला मिळणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून संत रोहिदास तरुण मंडळाने समर्थ व वैष्णवी हिचा सन्मान केला आहे. त्याचबरोबर समर्थच्या डॉक्टरकीला महावितरणचे अधीक्षक अभियंता माने, दक्षिणचे कार्यकारी अभियंता रमेश राठोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश मदने, उपअभियंता कलशेट्टी, शाखा अभियंता महेश शिंदे, चर्मकार समाजाचे नेते अशोक लांबतुरे, सुरेखा लांबतुरे, कंदलगावचे शावराप्पा वाघमोडे, बसवराज व्हनगुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

### मंद्रुपमध्ये शुक्रवारी कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन

**मंद्रुप, दि. १९ सप्टेंबर-**

सोनाई फाउंडेशनच्या वतीने ईद ए मिलादुन्नबीनिमित्त शुक्रवारी २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दक्षिणमधील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सोनाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड यांनी दिली. मंद्रुपमध्ये प्रथमच कव्वालीचा कार्यक्रम होत असून मुंबई येथील प्रसिद्ध हाजी सुलतान नाझा यांचा कव्वाली कार्यक्रम होणार आहे. यावेळी महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर, माजी सभापती गुरूसिद्ध म्हेत्रे, सरपंच अनिता कोरे, माजी कृषी सभापती अप्पाराव कोरे, सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिद्ध मुगळे यांच्या मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता मंद्रुप येथील मौलाना आझाद चौक येथे उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक युवराज राठोड व उत्सव समिती अध्यक्ष यासीन मकानदार यांनी केले आहे.

## उमेदमुळे महिलांच्या आत्मसन्मानाची वाट सक्षम

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १९ सप्टेंबर-**



छोट्या-मोठ्या लघुउद्योगातून महिला आर्थिक सक्षम, स्वावलंबी व स्वाभिमानी बनू लागल्या आहेत. बचत गटांमुळे महिला जागरूक होत असून सावकारी बंद होऊ लागली आहे. उमेद अंतर्गत स्वीकारण्यात आलेल्या दशसुत्रीमुळे स्त्रियांची बचत गटांची गुणवत्ता वाढत आहे. उपजीविकेचे स्रोत बळकट होत असून त्यांची आत्मसन्मानांची वाट अधिक सक्षम होत आहे, असे प्रतिपादन नीळकंठ कदम यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेदमार्फत राबविण्यात येत असलेल्या तडवळे येथील सूर्योदय महिला ग्रामसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्या पाटील होत्या. यावेळी पांडुरंग निमकर, हनुमंत भालेराव, रागिणी मोरे, ग्रामसेविका सीताबाई नागरगोजे, अर्चना आगलावे, कल्याणी ताटे, ग्रामसंघ अध्यक्षा सुवर्णा नवले, पौर्णिमा जाधव, शोभा पवार, मनिषा बनसोडे, विजया शिंदे, राणी मगर, स्वाती आवारे, सविता नवले, राणी वाघ, प्रियंका लोखंडे, श्रुतिका शेंडगे, रतन बनसोडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रिया घायतिडक, आदिती घोंगडे, आशावर्कर सुभद्रा निंबाळकर यांनी महिलांच्या बीपी, शुगरची तपासणी केली. यावेळी सीआरपी उज्ज्वला पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दीपाली माने यांनी केले तर आभार उज्ज्वला पवार यांनी मानले.

**निधीतून महिला बनल्या सबला**

सूर्योदय महिला ग्रामसंघांतर्गत २३ महिलांचे बचत गट कार्यरत असून २८७ महिला सहभागी आहेत. आतापर्यंत बचत गटांना बँकेचे कर्ज ५२ लाख ३५ हजार, समुहगुंतवणूक निधी २५ लाख, फिरता निधी ६ लाख, व्यवस्थापन निधी ७५ हजार, जोखीम प्रवणता निधी १ लाख ६५ हजार, उपजीविका निधी ९६ हजार, उत्पादक गटनिधी १ लाख ५० हजार, एसव्हीईपी १ लाख ७० हजार, ओएसएफ ७५ हजार एवढा निधी गटांना मिळालेला असून या निधीच्या माध्यमातून अनेक महिलांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले आहेत.

# औराद विभागातील अंगणवाड्यांमध्ये पोषणमाह सुरु

**दक्षिण सोलापूर एकात्मिक बालविकास सेवायोजना प्रकल्प**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर पंचायत समिती एकात्मिक बालविकास सेवा योजना दक्षिण सोलापूर प्रकल्पांतर्गत औराद विभागात १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पोषणमाह साजरा होत आहे.

या उपक्रमांतर्गत बालकांमध्ये निमिया, ग्रोथ मॉनिटरिंग, पूरक आहार, उत्तम प्रशासनासाठी तंत्रज्ञानाचा वापर, पोषण भी पढाई भी, 'एक पेड माँ के नाम' या संकल्पना डोळ्यासमोर ठेवून अंगणवाडीच्या माध्यमातून जनजागृती करणयात आले. निमिया आहे का हे कसे ओळखावे व निमिया मुक्तीसाठी आहार कसा असावा याबाबत महिला बैठका, चित्रफीत व ग्रहभेटीच्या माध्यमातून प्रत्यक्ष संवाद साधून अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी माहिती दिली.



अंगणवाडीमधील फबालकांना ग्रा मॉनिटरिंग सर्व अंगणवाडीमध्ये पोषण महानिमित्त




पालकांच्या उपस्थितीत बालकांची व ज न व उंची घेऊन बालकांच्या श्रेणीबद्दल पालकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. अंगणवाडीमध्ये हा विशेष उपक्रम राबवण्यात येत असून लोकसहभागातून एक खाऊ वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सर्व ३७ सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये पालकांच्या वतीने लोकसहभागातून खाऊ देण्यासाठी पालकांशी संपर्क साधला असता, औराद विभागातील औराद, सांजवाड, बोळकवठे, हत्तरसंग, कुडल, टाकळी, होनमुर्गी, कुरघोट, नांदणी, बिरनाळ, राजूर, हत्तूर, चिंचपुरातील पालकांचा प्रतिसाद मिळत आहे.

दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या संकल्पनेतून अंगणवाडीत पालकांचा संपर्क वाढला आहे. लोकांचा अंगणवाडीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक व्हावा, यासाठी हा प्रयत्न करण्यात आला. अंगणवाडीतील विविध उपक्रमामुळे अंगणवाडीत बालकांची उपस्थित वाढली आहे. या उपक्रमाला दक्षिण सोलापूर तालुक्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**-शोभा तडलगी, पर्यवेक्षिका, औराद विभाग**

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार ओबीसी विभाग कार्यकरणी बरखास्त : तोडकर

**श्रीपूर, दि. १९ सप्टेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष सोलापूर जिल्ह्याची कार्यकारिणी बरखास्त करण्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व ओबीसी प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांच्या सूचनेनुसार करण्यात आली असल्याची माहिती ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अरुण तोडकर यांनी दिली.

आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसी सेलच्या नवीन सक्रिय कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी मुलाखत घेऊन नवीन पदाधिकारी निवड करणार असून नवीन व जुन्यांचा मेळ घालून कार्यकारिणी तयार करणार असून उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, जिल्हा अध्यक्ष बळीरामकाका साठे, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, युवक अध्यक्ष गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन तालुकाध्यक्ष व जिल्हापदाधिकारी निवड करण्यात येणार आहेत. २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अरुण तोडकर यांच्या संपर्क कार्यालय, श्रीपूर येथे माळशिरस, पंढरपूर, सांगोला, करमाळा, माढा या तालुक्यातील पदाधिकारी निवड प्रक्रियेच्या मुलाखती होतील. २१ सप्टेंबर रोजी शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे मोहोळ, बार्शी, मंगळवेढा, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर येथील पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती होतील. त्याच दिवशी महिला ओबीसी सेलच्या जिल्हा कार्यकारणी व नूतन महिला तालुकाध्यक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती होतील. याप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष कृष्णात माळी, महिला जिल्हाध्यक्ष साधनाताई राऊत उपस्थित होत्या.



## संक्षिप्त वृत्त...



**बार्शी : बार्शीतील पाटील चाळ येथील गणेश मंडळ विसर्जन मिरवणुकीचे छायाचित्र.**




### लाडक्या बहिणींसाठी करमाळ्यात स्वाक्षरी मोहीम

**करमाळा, दि. १९ सप्टेंबर-**

लाडकी बहीण योजना येणाऱ्या काळात पुढील अनेक वर्ष कायम चालू राहावी याच्या समर्थनार्थ करमाळा विधानसभा मतदारसंघातील करमाळा शहरात राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या समर्थनार्थ स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. महिलांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उपक्रम करमाळा विधानसभेचे आ. संजयमामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष अभिषेक आव्हाड यांनी फुलसौंदर चौक, करमाळा येथे आयोजित केला होता. या मोहिमेत स्थानिक महिला व नागरिकांनी खूप मोठ्या मोठ्या प्रमाणात सहभागी होत स्वाक्षरी करत ही योजना यापुढेही अविरतपणे सुरु राहण्यासाठी पाठिंबा दर्शविला. यावेळी सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार, ज्येष्ठ नेते विवेक येवले, महिला जिल्हा उपाध्यक्ष नंदिनी लुंगारे, युवक जिल्हा खजिनदार राजेंद्र सूर्यवंशी, मकसूद बागवान आदी उपस्थित होते.



### धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे निर्माल्याचे संकलन

**अकलूज, दि. १९ सप्टेंबर-**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज येथे श्री अनंत चतुर्दशीदिवशी घरगुती व सार्वजनिक मंडळाच्या श्रीगणेश मूर्तीपुढील निर्माल्य संकलन करून व त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करण्यात येत आहे. याचा शुभारंभ मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केला. या उपक्रमास प्रतिष्ठानच्या श्री बैठक अकलूज, टेंभुर्णी, चाकोरे, वेळापूर, बोरगाव, महाळुंग, नेवरे, करोळे, मळोली येथील २३६ श्री सदस्यांनी निर्माल्य संकलन केले. अकलूज व परिसरातील घरगुती ५,९४९ व सार्वजनिक मंडळांचे १५७ श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. सुमारे ७,७२० किलो निर्माल्य संकलन करण्यात आले. आजपर्यंत प्रतिष्ठानच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता अभियान, महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, प्रौढ साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती, बसस्टॉप निवारा, जलाशय स्वच्छता, बोअर व विहीर पुनर्भरण, श्रवण यंत्रांचे वाटप, शालेय वह्या-पुस्तकांचे वाटप, कुराण व्यवस्थापनअसे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रतिष्ठानमार्फत मरवडे, पंढरपूर, मंगळवेढा येथेसुद्धा निर्माल्य संकलन करण्यात आले.



### ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीसपदी मंडलिक

**अकलूज, दि. १९ सप्टेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ओबीसी सेलच्या जिल्हा सरचिटणीसपदी वेळापूर येथील विजय मंडलिक यांची निवड करण्यात आली. अकलूज येथील उदय सभागृह येथे झालेल्या बैठकीत खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते मंडलिक यांना निवडीचे पत्र देण्यात आले. विजय मंडलिक यांनी आजपर्यंत रेशन कार्डधारक व दुकानदारांच्या समस्या मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अरुण तोडकर आदी उपस्थित होते.



### लायन्स क्लबतर्फे पोलिसांना भोजन

**अक्कलकोट, दि. १९ सप्टेंबर-**

लायन्स क्लब अक्कलकोटकडून गणेशोत्सव बंदोबस्तासाठी आलेल्या सर्व पोलीस बांधवांना जेवणाचे डबे, फुड पॅकेट देण्यात अनंत चतुर्थीच्या दिवशी आलेल्या १६० पोलीस बांधवांना सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते व लायन्स क्लबचे अध्यक्ष शिवानंद नंदर्गी, सचिव सुधीर माळशेट्टी, डीवायएसपी यामावर, पीआय राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते भोजन देण्यात आले. यावेळी खजिनदार डॉ. सुनील बिरादार, डॉ. प्रदीप घिवारे, मल्लिनाथ साखरे, शिरीष पंडित, सुभाष गडसिंग, प्रभाकर मजगे, शदीद वळसंकर, कल्याणी आळगी, महिबूब सलगरकर याच्यासह पदाधिकारी आणि पोलिस बांधव उपस्थित होते.

## माढ्याच्या औद्योगिक विकासाला मिळणार चालना

### आ. बबनराव शिंदे : मोडनिंब येथे नवीन एमआयडीसीसाठी अधिसूचना जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १९ सप्टेंबर-**

माढा मतदारसंघातील मोडनिंब येथे नवीन एम आयडीसी होण्याचा मार्ग मोकळा झाला असून मोडनिंब व परिसरातील ३४४ एकर क्षेत्रावर नवीन एमआयडीसी होण्यासाठी उद्योग विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळून बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार असल्याची माहीती आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

आ. शिंदे म्हणाले, माढा मतदारसंघातील मोडनिंब हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून मोडनिंब ही मोठी बाजारपेठ म्हणून सर्वत्र परिचित आहे. तसेच मोडनिंब हे शहर राष्ट्रीय महामार्गावर आहे. तसेच मोडनिंब हे गाव ब्रॉडगेज रेल्वे लाईन शेजारी येत असल्याने या ठिकाणी लहान मोठ्या उद्योगांना चालना मिळणार असल्याने या ठिकाणी नवीन एमआयडीसी होण्यासाठी स्थानिक नागरिक, व्यापारी, लहान-मोठे उद्योजकांकडून मागणी होत होती. या संदर्भात २०१८ पासून पाठपुरावा सुरु होता. तसेच तत्कालीन उद्योग राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी फेब्रुवारी २०२० रोजी मंबुई येथे सूचना दिलेल्या होत्या. त्यानंतर मोडनिंब येथील २८०.६७ हेआर व सोलकरंवाडी येथील ६३.४७ हे. आर. असे एकूण ३४४ एकर या जागेची क्षेत्रीय अधिकारी यांच्याकडून पाहणी करून भू-निवड समितीकडून अहवाल शासनास सादर करण्यात आला होता. शासनाच्या उच्च अधिकार समितीने या प्रस्तावित क्षेत्रास मान्यता दिलेली असून या क्षेत्राचा कंटूर सर्व्हेदेखील झाला आहे. २ जुलै २०२४ रोजी मुंबई येथे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या दालनात संबंधित अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक बोलावून मोडनिंब येथे नवीन एमआयडीसी होण्यासाठी महामंडळाचे प्रकरण लागू करून भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या होत्या. उद्योग मंत्रालयाकडून राज्यपालांच्या आदेशानुसार ३४४ एकर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केले. उद्योग विभागाचे सहसचिव संजय देगावकर यांच्याकडून हा अध्यादेश मिळाला आहे. यावेळी आ. शिंदे यांच्यासह करमाळ्याचे आ. संजय शिंदे व मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे मोडनिंब येथे नवीन एमआयडीसी होण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. या निर्णयामुळे बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



#### लवकरच होणार भूमिपूजन

टेंभुर्णी, कुर्डूवाडी येथे यापूर्वीच एमआयडीसी स्थापन करुन तरुणांना उद्योजकांना नवीन संधी निर्माण करुन दिलेली आहे. टेंभुर्णी येथील जागा संपलेली आहे. आता मोडनिंब येथे नवीन ३४४ एकराची एमआयडीसी मंजूर झाल्यामुळे येथील स्थानिक तरुणांना रोजगारांची संधी मिळणार असून ग्रामीण भागातील अनेक उद्योजक निर्माण होऊन विकासासाठी मदत होणार असल्याने मागील चार-पाच वर्ष सातत्याने पाठपुरावा केल्याने आज मंजूरीचे पत्र मिळाले याचे मला समाधान आहे. याची जागा निश्चित झाली असून आता लवकरच भूमिपूजन करणार आहे.

**- आ. बबनराव शिंदे**

## विधानसभेसाठी जोमाने तयारीला लागा

**● सांगोल्यात माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ सप्टेंबर-**

विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत नरेटीव्ह सेट केल्याने लोकसभेत पराभव झाला. कार्यकर्त्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी काम करावे.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपचे संघटन वाढविण्यासाठी जोमाने तयारीला लागावे असे आवाहन माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केले.

ते ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, सातारा जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे, सोलापूर जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, गणेश चिवटे, दिग्विजय बागल, शिवाजी गायकवाड, हणमंत सुळ, योगेश बोबडे, रामभाऊ ढाणे, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी आलदर, नवनाथ पवार, सोपान नानवर, बाळासाहेब सरगर, प्रतीक्षा गोफणे, संध्या कुंभेजकर उपस्थित होते. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या.



#### फेक नरेटिव्हला प्रत्युत्तर द्या : केदार-सावंत

भाजपचे संघटन मजबूत करण्यासाठी काम करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना संघटनेत काम करण्याची संधी देण्यात येणार आहे. विधानसभेसाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी रणनिती तयार करून कामाला लागावे. विरोधकांच्या फेक नरेटिव्हला त्याच भाषेत भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रत्युत्तर द्यावे. विरोधकांच्या फेक नेरेटिव्हला उत्तर देताना विकासाचा अजेंडाही पुढे घेऊन जावा. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने घेतलेले निर्णय लोकांपुढे घेऊन जावे असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

## महाराष्ट्राच्या फळांची गोवेकर चाखणार चव

**● विक्री केंद्राला लिंक होणार**
**● कृषीभूषण अंकुश पडवळे, शेतकरी शिष्टमंडळ, गोवा कृषी मंत्र्यांबरोबरच्या बैठकीत निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ सप्टेंबर-**

गोवा सरकारच्या फळे व भाजीपाला विक्री केंद्राला महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला लिंक करण्याबाबत कृषिमंत्री रवी नाईक यांनी आश्वासन दिले. गोवा फलोत्पादन महामंडळाचे अध्यक्ष आ. परमेंद्र शेट यांनी फळे व भाजीपाला सप्लाय करण्याबाबत चर्चा केली. यामुळे आता महाराष्ट्राच्या फळांची चव गोवेकरांना चाखता येणार आहे.

पहिल्या टप्प्यात फळे पुरवठा, टप्प्याटप्प्याने भाजीपाला पुरवठा करण्याबाबत निर्णय झाला. गोवा सरकार दीड हजार आउटलेटच्या माध्यमातून ग्राहकांना माफक किमतीत भाजीपाला व फळे देण्याचा उपक्रम राबवत आहे. फळे व भाजीपाला विक्री केंद्राचा उपक्रम देशात फक्त गोवा राज्यातच राबविला जात आहे. गोव्याचे कृषिमंत्री रवी नाईक यांच्याबरोबर कृषिभूषण अंकुश पडवळे व शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने चर्चा केली. यात कृषिभूषण अंकुश पडवळे, उपसरपंच प्रकाश भोसले, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन जयराम आलदर, दूध संस्थेचे चेअरमन भगवानराव चौगुले, माजी सरपंच संतोष वाले सहभागी होते.



**२० केंद्रांना दिल्या भेटी :** सोलापूरच्या शेतकरी शिष्टमंडळाने फळे व भाजीपाला सप्लायबाबत सविस्तर माहिती घेतली. शेतकरी शिष्टमंडळाने गोवा सरकारच्या गोव्यातील फळे व भाजीपाला २० विक्री केंद्रांना भेटी देऊन सविस्तर माहिती घेतली. सदर बैठकीत गोवा कृषी विभागाचे संचालक संदीप देसाई, गोवा राज्य फलोत्पादन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक चंद्रहास देसाई, व्यवस्थापक प्रसाद परब आदी अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

## गौडगावात ३० लाखांचा गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १९ सप्टेंबर-**

बार्शी-तुळजापूर रोडवर गौडगाव येथे गांजा व नशाकारक अंमली पदार्थाची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या चौघांवर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत सुमारे तीस लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १६ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास गौडगाव येथे करण्यात आली.

याबाबतची फिर्याद विजयकुमार भरले यांनी वैराग पोलिसात फिर्याद दिल्याने चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला गोपनीय माहिती मिळाल्याने त्यांनी गौडगाव हद्दीत गस्त घालत असताना त्यांना सोमवारी रावसाहेब भड यांच्या शेताजवळ भरधाव वेगाने इनोव्हा वाहनात अमली पदार्थ घेऊन जात असताना आढळून आले. त्यावेळी त्यामध्ये ६ लाख ६८ हजार ७०० रुपये किंमतीचा ३३ किलो गांजा, ५ लाख ७४ हजार रुपयांचा २८ किलो वजनाचा गांजा एकूण किंमत १२ लाख ४२ हजार ७०० रुपये १६ लाख रुपये किंमतीची कार आणि १ लाख ६२ हजार किंमतीचे ४ मोबाईल असा दोन्ही मिळून ३० लाख ४ हजार ७०० रुपयांच मुद्देमाल गुन्हे शाखेने जप्त केला असून धीरज मोरे अकलूज, शरद उबाळे फळवणी (ता. माळशिरस), समाधान गायकवाड, माढा, अमोल कांबळे (बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. सदर कारवाई पोलीस उपनिरीक्षक सूरज निंबाळकर यांच्या पथकाने केली.

## कपात रद्द करून वाढीव इष्टांक मिळावा

**● खा. धैर्यशील मोहिते पाटील : अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ सप्टेंबर-**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत जिल्ह्याच्या इष्टांकात केलेली कपात रद्द करून वाढीव इष्टांक मिळावा अशी मागणी माढा लोकसभेचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, १८ फेब्रुवारी २०२२ शासन निर्णयानुसार ग्रामीण भागासाठी अंत्योदय अन्न योजना शिधाप्रत्रिकाधारक संख्या ५५,८५१ व प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक संख्या १७,४५,७४१ दिलेला होता. त्यानंतर ४ सप्टेंबर २०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे, शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली आरसीएमएस महितीच्या आधारे, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत जिल्हा निहाय इष्टांकात सुधारणा करून शासन निर्णयानुसार अंत्योदय अन्न योजना शिधाप्रत्रिका ५२,२६३ व प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक संख्या १६,१३,४७२ असे सुधारित इष्टांक सोलापूर ग्रामीणसाठी दिला होता. पुढे २६ जून २०२४ शासन निर्णयानुसार अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका ५१,७०४ व वर प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक संख्या १६,२५,२३४ याप्रमाणे सुधारणा करण्यात आली.



तीन वर्षात, तीन शासन निर्णयामुळे अंत्योदय अन्नयोजनेमधील ४१४७ शिधापत्रिकाधारक व प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक संख्या १२,०५,०७ इतकी कमी झाली आहे. अंत्योदयेमध्ये पात्र असलेले लाभार्थी व प्राधान्य कुटुंब १२०५०७ लाभार्थी हे आधार सिडींग न झाल्यामुळे वंचित राहिले आहेत. यामुळे ऑपरेटर नेमणूक करून आधार सिडिंग होणे गरजेचे होते. दुकानदारांकडे लॉगिन आयडी देऊन आधारसिडिंग करुन धान्य मिळणे गरजेचे होते. तसे झाले नाही. यामुळे इष्टांक शिल्लक असल्याचे समजून इष्टांक कमी केल्यामुळे नवीन पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित रहावे लागत आहे. यामुळे लाभार्थ्यांना हक्काच्या धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याने लाभार्थ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.

#### दुकानदार कमिशनपासून वंचित

अंत्योदय शिधापत्रिकेवरील १,४५१ क्विंटल व प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक संख्येनुसार ६,०२५ क्विंटल धान्यासाठी ग्रामीण जिल्ह्याला मुकावे लागत आहे. तसेच ग्रामीण जिल्हयामधील धान्य दुकानदारांचे ११,२१,४०० रूपये कमिशन मिळण्यापासून वंचित रहावे लागत आहे, असे खा. मोहिते-पाटील यांनी म्हटले आहे.


## करकंबमधील शिवकालीन बारवची स्वच्छता

**● स्वच्छता अभियानात विविध सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्थांचा सहभाग**


**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १९ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, ईशाधीन शेळकंदे, जिल्हा व्यवस्थापन प्रमुख सचिन जाधव यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एक दिवस गावासाठी स्वच्छता अभियान उपक्रमाच्या माध्यमातून करकंब येथील ऐतिहासिक बारवची स्वच्छता करण्यात आली.

जागर स्वच्छता अभियान टीमच्यावतीने करकंबमधील सामाजिक, शैक्षणिक संस्थांना या स्वच्छता अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्या आव्हानास प्रतिसाद देत रामभाऊ जोशी हायस्कूलचे शिक्षक महादेव पुजारी, स्काउट्स गाईडचे विद्यार्थी, युगंधर आखाड्याचे राजू अनवते व कार्यकर्ते, श्रीराम बालगणेशोत्सव मंडळ अध्यक्ष ऋषी पवार व कार्यकर्ते, ग्राम पंचायत स्वच्छता कर्मचारी, प्राथमिक शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थांच्या सहभागातून स्वप्नवत वाटणारी शिवकालीन ऐतिहासिक बारव दोन ते अडीच तासांच्या अथक परिश्रमातून स्वच्छ करण्यात आली. गेल्या ३ वर्षांपासून जागर स्वच्छता अभियान टीमच्यावतीने प्रत्येक रविवारी २ तास एका भागाची स्वच्छता करण्यात येते. या स्वच्छता मोहिमेस प्रतिसाद देत असताना सर्वांनीच अनमोल योगदान दिले. यावेळी करकंब पोलीस स्टेशनचे एपीआय सागर कुंजीर यांनी भेट देऊन या उपक्रामाचे कौतुक करुन स्वच्छतादुतांना प्रोत्साहन दिले. श्रीगौरी गणेश विसर्जनानिमित्ताने जमा झालेले निर्माल्यही गोळा करून गांडूळ खत निर्मिती प्रकल्पास देण्यात आले. पर्यावरण रक्षणासाठी मदतच होईल. यापुढील काळातही पर्यावरण रक्षण, स्वच्छतामोहीम, करकंब गाव स्वच्छ दिसण्यासाठी प्रयत्न चालूच राहतील.



स्वच्छतेच्या आगोदर.



स्वच्छतेनंतर.

या स्वच्छता मोहिमेमध्ये जागर स्वच्छता अभियान टीम, रामभाऊ जोशी हायस्कूल स्काऊट गाईड विद्यार्थी, श्रीराम गणेश मंडळ, युगंधर आखाडा, ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी, प्राथमिक शिक्षक, विद्यार्थी, पत्रकार लक्ष्मण जाधव, ग्रामस्थांचा पुढाकार व स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

करकंब गाव स्वच्छ ठेवण्यासाठी जागर स्वच्छता अभियान टीमच्या माध्यमातून गेली ३ वर्षे काम करीत असताना सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनातर्फे स्वच्छतेसाठी १ दिवस हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आला.यातूनच प्रेरणा घेत बारव स्वच्छतेचे नियोजन केले. शैक्षणिक व सामाजिक संस्थांही उत्स्फूर्त व हिरीरीने सहभागी झाल्याने ही शिवकालीन ऐतिहासिक बारव स्वच्छता मोहीम यशस्वी झाली.

**-ज्ञानेश्वर दुधाणे,**
स्वच्छता दूत, करकंब

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आ.पाटील यांच्या हस्ते तेर येथे सिमेंट रस्त्याचे लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१९ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील प्रभाग क्रमांक ३ मध्ये १५ वा वित्त आयोग आणि २५१५ या योजनेतून पूर्ण झालेल्या सिमेंट रस्त्याचे लोकार्पण आ.र णाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, तेर सोसायटीचे चेअरमन सतिष कदम, नवनाथ नाईकवाडी, विठ्ठल लामतुरे, भास्कर माळी, अजित कदम, अर्शाद मुलांनी, नवनाथ पसारे, प्रभाकर शिंपले, किशोर काळे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### प्रयाग मल्टीस्टेटला सर्वोत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार प्रदान

**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रयाग म ल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी शाखेला १ कोटी २५ कोटी ठेवी गटात सर्वोत्कृष्ट संस्थेचा सन २०२२-२३ पुरस्कार शिर्डी येथे आशिष भूतानी, केंद्रीय सहकार सचिव, आ. सुभाष देशमुख, सुरेश वाभळे चेअरमन, काकासाहेब कोयटे, अंकलकोटे पाटील, राध्येश्याम चांडक, कडूभाऊ काळे, आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार प्रशिक्षण केंद्र, शिर्डी येथे दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. यावेळी प्रयाग मल्टिस्टेटच्यावतीने संस्थेचे तज्ञ संचालक मोहन जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कदम, संचालिका प्रा. वैशाली कदम व कृष्णा कदम यांनी पुरस्कार स्वीकारला.



### वराळे जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित

**तेर, दि.१९ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथील अजिंक्य वराळे यांना जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शासनाच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने कला, क्रीडा, सामाजिक इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल २०२२-२३ चा धाराशिव जिल्हा युवा पुरस्कार १७ सप्टेंबरला धाराशिव येथे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्माचिन्ह देऊन मुळेवाडी येथील अजिंक्य वराळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. मैनिक घोष, पोलिस अधीक्षक संजय जाधव, क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, भैरवनाथ नाईकवाडी, अक्षय बिराजदार, डिंपल ठाकरे, योगेश थोरबोले आदी मान्यवर उपस्थित होते.



### वाढदिवसानिमित्त जि.प. शाळेला दिली अनोखी भेट

**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
जिल्हा परिषद प्रशाला, जळकोट येथील भाषा विषय शिक्षिका कांबळे पुष्पलता यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शालेय पोषण आहार संबंधी आवश्यक असणारे साहित्य मोठे भात वाढण्यासाठी टोपले, वगराळ, पाण्यासाठी जग, ७ जेवणाचे ताट, तेलासाठी केटली आदि साहित्य भेट म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप तरमोडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष वीरभद्र पिसे, शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या कर्मचारी मीनाक्षी सोत्रे यांच्याकडे सुपूर्द केले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तुकाराम कुंभार, विजय पिसे, पुनम दूधभाते, अक्षरा कांबळे, शालिनी कडते तसेच सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

### हैद्राबाद मुक्ती संग्राम पुस्तकाचे प्रकाशन

**लोहारा, दि.१९ सप्टेंबर -**
१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून लोहारा शहरातील व तालुक्यातील शासकीय कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आले. तर याच दिनाचे औचित्य साधून लोहारा हायस्कुल शाळेचे माजी शिक्षक तथा निवृत्त शिक्षणाधिकारी लेखक साहित्यिक बाबुराव माळी लिखित हैद्राबाद मुक्ती संग्राम पुस्तकाचे प्रकाशन सोहळा पाटोदा येथे पार पडले. या प्रसंगी लोहारा हायस्कुल शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा संवाद मेळावा निमित्त गाठी भेटी करत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी साहित्यिक बाबुराव माळी लिखित हैद्राबाद मुक्ती संग्राम पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत काळे होते. तर प्रमुख म्हणुन सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बागल, डॉ. अविनाश ढगे, दिलीप चव्हाण पुणे, विनोद गोयर आदि उपस्थित होते.

### कुलस्वामिनी आश्रम शाळेत मराठवाडा मुक्ती दिन साजरा

**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
मराठवाडा मुक्ती संग्राम दिन श्री कुलस्वामिनी प्राथमि क माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, जळकोट येथे विविध उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून कुलस्वामिनी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका पवार, गुरव, कारले व राठोड यांची उपस्थिती होती. म हावाचन उत्सव उपक्रम २०२४ मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्राचे वितरण व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा मध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ योजनेत धाराशिव जिल्ह्यात ३ लाख ९२ हजार महिला लाभासाठी पात्र

### आतापर्यंत ४ लाख महिलांनी केले अर्ज...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
धाराशिव राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १६ सप्टेंबरपर्यंत धाराशिव जिल्ह्यात ४ लक्ष ३ हजार ८५१ महिलांनी अर्ज केले आहे. त्यापैकी ३ लक्ष ९२ हजार ४२४ महिलांचे अर्ज योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले आहे. आता या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर करण्यात आली आहे.


आता केवळ अंगणवाडी सेविकेमार्फतच अर्ज स्विकारले जाणार आहे. जिल्ह्यातील कोणतीही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी यंत्रणा काम करीत आहे. जिल्ह्यात १६ सप्टेंबरपर्यंत ३ लक्ष ९२ हजार ४२४ महिलांचे अर्ज या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले. यामध्ये २ लक्ष ४ हजार २१५ अर्ज संकेतस्थळावर आणि नारीशक्ती दूत अँपवर प्राप्त झालेल्या १ लक्ष ८८ हजार २०९ अर्जाचा समावेश आहे. ज्या महिला या योजनेसाठी पात्र ठरत आहे अशा महिलांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये दरमहा १५०० रुपये जमा करण्यात येत आहे. पात्र महिलांच्या बँक खात्यात स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्टपासून जुलै आणि ऑगस्ट महिन्याची एकत्र ३ हजार रुपये रक्कम जमा करणे सुरू झाले आहे. जिल्ह्यात ३ लक्ष २४ हजार ६५९ पेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट दिले असतांना पात्र ठरणाऱ्या महिलांची संख्या जास्त आहे. बहुतांश पात्र लाभार्थी महिलांनी अर्ज भरले आहे. उर्वरित पात्र महिलांची अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे.आता ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील कोणतीही पात्र म हिला या योजनेच्या लाभापासून आता वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.



१६ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यातील ४ लक्ष ३ हजार ८५१ महिलांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ऑनलाईन व नारीशक्ती दूत अँपवर अर्ज केले. यापैकी नारीशक्ती दूत अँपवर १ लक्ष ८९ हजार ८९२ महिलांनी अर्ज केले. तर पोर्टलवर अर्ज करणाऱ्या महिलांची संख्या २ लक्ष १३ हजार ९५९ इतकी आहे. नारीशक्ती अँपवर प्राप्त १ लक्ष ८९ हजार ८९२ अर्जापैकी १ लक्ष ८८ हजार २०९ महिलांच्या अर्जांना मान्यता दिली. पोर्टलवर २ लक्ष १३ हजार ९५९ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी २ लक्ष ४ हजार २१५ अर्जाना मंजुरी मिळाली. अशा एकूण ३ लक्ष ९२ हजार ४२४ अर्जाना तालुका समित्यांनी मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जिल्ह्यातील ३ लक्ष २४ हजार ६५९ महिलांना लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापेक्षा जास्त महिलांनी अर्ज केले. ज्या पात्र महिलांचे अर्ज सादर करणे बाकी आहेफ त्या महिलांचे आता नागरी आणि ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रात बालवाडी सेविका, अंगणवाडी सेविकामार्फत ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहे.

बँक खाते आधार संलग्न करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांनी अर्ज करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

## माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचा परंड्यात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ सप्टेंबर -**
नुकताच ३ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते राष्ट्रकुल संसदीय मंडळ म हाराष्ट्र शाखेतर्फे देण्यात येणारा महाराष्ट्र विधान परिषद उत्कृष्ट भाषण पुरस्कार माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना नुकताच देण्यात आला. त्यांची सदिच्छा भेट घेऊन पवार परीवार कडून सत्कार करण्यात आला.

त्यावेळी मी वडार महाराष्ट्राचा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष तथा चेअरमन सुनिल पवार व अनिल पवार व शंकर पवार उपस्थित होते. कै. दिगंबर पवार भोजेकर यांचे व ठाकूर यांचे जिव्हाळ्याचे सबंध होते. कै दिगंबर पवार हे २००७ दशका पर्यंत ग्राम पंचायत व जिल्हा परिषद, पंचायत समिती, मजुर फेडरेशन, जिल्हा मध्यवर्ती बँक, लोकसभा, विधानसभा, अनेक निवडणूकीत महत्त्वाची भूमिका बजावली होती. ते आण्णा नावाने परिचित होते. आण्णा च्या निधनानंतर ही त्यांच्या कुटुंबाने ही वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेकांशी राजकीय पलीकडे जिव्हाळ्याचे आपुलकीचे सबंध जपले आहेत.

पवार कुटुंबाकडून ठाकूर यांचा सन्मान करण्यात आल्यानंतर कै. दिगंबर पवार यांच्या आठवणी ला उजाळा दिला.

## वाढदिसानिमित्त जळकोटमध्ये वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील उबाठाचे युवा सेनेचे तालुका उपप्रमुख रोहन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जळकोट येथील जि.प. प्रशाला व जि.प.प्रा.मुलांची शाळा या शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी राहुल पाटील, वैभव स्वामी, अविनाश पटणे, शिरीष छत्रे, धनराज पाटील, आकाश डांगे, ओमकार यादगौडा, अक्षय मडके, रोहित कलशेट्टी, अथर्व छत्रे, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## तडवळे ग्रामपंचायतकडून केंद्रीय शाळेला साहित्य वितरण



**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१९ सप्टेंबर -**
जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथे ग्रामपंचायत कार्यालय यांच्या वतीने पंधराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत दीड लाखाच्या साहित्य लोकार्पण सोहळा घेण्यात आला. तसेच मंथन परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी सहा कपाट, दोन ऑफिस टेबल, बारा खुर्च्या, डेस्क इत्यादी जवळपास दीड लाखाचे साहित्य देण्यात आले.

मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून गावच्या सरपंच स्वाती जम ाले, ग्राम विस्तार अधिकारी संजय आडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल पवार, अरुण पाटील, विशाल जमाले, ग्राम पंचायत सदस्य धनाजी होगले, गणेश करंजकर, सुभाष धनके, हारूण शेख, धनाजी कोरे, राजाभाऊ कानगे, सुरेंद्र आवटे, मुख्याध्यापक केशव पवार, सर्व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंथन राज्यस्तरीय साम ान्यज्ञान स्पर्धेतील गुणवत्ता यादीतील विद्यार्थी अनुज क्षिरसागर, कैवल्य माळी, स्वरूप हिंगमिरे, फैजल शेख, फारुख पिंजारी, शौर्य वडगणे, शिवांश करंजकर, अर्णव करंजकर, श्रवण बोडके, अहिल कोरबू, ज्ञानराज जम ाले, शौर्य करंजकर, सोहम जमाले, सोहम करंजकर, समर्थ घुले, समर्थ शिंदे या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन उपस्थितांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## पार्वती प्रशालेत हिंदी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
१४ सप्टेंबर हा दिवस जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेत हिंदी दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम या होत्या. हिंदी दिनाचे महत्त्व समजावून सांगत असताना त्या म्हणाल्या, हिंदी संत कवी तुलसीदास यांनी रामचरितम ानस व प्रेमचंद, मैथिली शरण गुप्त, जयशंकर प्रसाद यांच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरे व्ही. एस. यांनी केले.

## लोहारा शहरासह तालुक्यात गणपत्ती बप्पा मोरयाच्या जयघोषात गणेश विसर्जन




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ सप्टेंबर -**
लोहारा शहरासह तालुक्यात गणपत्ती बप्पा मोरय्या पुढच्या वर्षी लवकर या, अशा जयघोषात गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. वीरशैव कक्कया गणेश मित्र मंडळ, लोहारा, स्थापना १९८५ यावर्षीचा गणपती साई मंदिर येथे बसविण्यात आले होते.

गणपती बाप्पाची दररोज सकाळ, संध्याकाळ भक्तिभावाने पूजा करण्यात आली. त्याचबरोबर यावर्षीच्या गणेश मंडळाकडून संगीत खुर्ची, लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, डान्स, भाषणकला, गीत, असे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. याचे नंबर काढून बक्षीस वितरण करण्यात आले.

काही लहान मुलं बाहेरुन आले होते तर काही लहान मुलं समाजातीलच सांस्कृतिक कला व डान्स सादर केले. त्यांना प्रोत्साहन म्हणून लोकांनी शंभर, दोनशे, पाचशे, हजार या रूपात बक्षिसाचा वर्षाव केला.

### श्री सिद्धेश्वर विद्यालयातील परसबाग...

## सर्व शाळांसाठी एक रोल मॉडेल ठरेल : विठ्ठलराव बदोले




**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१९ सप्टेंबर -**
उमरगा तालुक्यातील श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी (ता. उमरगा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांचे आदर्श घेऊन कमवा आणि शिका संकल्पनेतील संस्थेच्या २० गुंठे जमिनीवरती शालेय परिसरात परसबाग तयार करण्यात आले आहे. या परिस्थितीत बागेतील भाजीपाला इयत्ता पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांच्या शालेय पोषणातील खिचडी, वरण-भात, उसळ भात यामध्ये पोषण आहार म्हणून वापरण्यात येणार आहे.

शासन निर्देशांनुसार परसबाग तयार करण्याचे निर्देश जरी असले. आमच्या शाळेचा परसबाग इतर शाळांना आदर्श ठरेल असे उद्गार संस्थेचे सचिव विठ्ठलराव बदोले यांनी यावेळी बोलून दाखवले. या परसबागेत फळभाज्या म्हणून भोपळा, दोडका, कारले, वांगी, पानकोबी, टोमॅटो, हिरवी मिरची, पालेभाज्या म्हणून पालक, मेथी, कोथिंबीर, शेपू, चुक्का आदींचे लागवड करण्यात आले आहे. ही सर्व परसबाग विद्यार्थ्यांच्या श्रमातून तयार करण्यात आले आहे.

शिक्षणाबरोबर शेती विषयक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे हा यामागचा हेतू आहे. हा परस्पर गावातील ट्रॅक्टरच्या माध्यमातून मोफत लागवड जमीन तयार करण्यात आले आहे.

या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे, उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत, सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले, संचालक राम मोरे, विश्वनाथ नंदर्गे, भीमाशंकर बोरुटे, बसवराज कुंभार, भीमाशंकर नंदर्गे, विनय बदोले, मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे यांच्या वतीने पाहणी करण्यात आले.

## मुलींसाठी मोफत उच्च व तंत्र शिक्षण सवलतींचा शासन निर्णय निर्गमीत होवूनही संस्थाचालक अंमलबजावणी बाबत उदासीन




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ सप्टेंबर -**
महाराष्ट्र राज्यात राज्य शासनाने पुर्वीपासून एससी.एसटी.व्हिजे एनटी या प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्क माफ करणेत आलेले होते. तसेच आता उर्वरितही एसबीसी, ओबीसी, एसईबीसी या प्रवर्गातीलही मुलांची ५० टक्के सवलत कायम ठेवत मुलींना मात्र १०० टक्के शिक्षण शुल्क माफीची आता सवलत देण्यात आलेली आहे. या घोषणेचे शासन निर्णय ही निर्गम ीत होऊन, प्रवेश प्रक्रियेत महत्वाची भुमिका बजावणाऱ्या सिईटी सेल आदी सर्व स्तरावरून अंमलबजावणी करण्याकरीता प्रभावी प्रबोधन केले जात आहे.

दरम्यान आता वैद्यकीय विभागाच्या एमबीबीएस, बीएमएस, बिडीएस, बीएचएमएस, बियूएम एस, बिपीटीएच, बीओटीएच, बीएएसएलपी, बीपी अ‍ॅन्ड ओ या अभ्यासक्रमांचे एक एक राउंड झालेले आहेत. यावेळी पालक व विद्यार्थ्यांना अत्यंन्त वाईट अनुभवांचा सामना करावा लागतो आहे. शासनाने शासन निर्णय निर्गम ीत करून तो सर्व महाविद्यालयांच्या डिन, प्राचार्य यांना किंवा आस्थापना पाठवून तसेच शासनाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विवीध बैठका-मि टींगा घेवून त्यात फिस सवलती व संस्थांच्या अडचणींचा १०० टक्के निपटारा केल्यानंतरही बहूतांश म हाविद्यालय हे संबंधीत विद्यार्थी व विद्यार्थिनींकडून १०० टक्के फिसची मागणी करत हमीपत्रे, बंधपत्रे लिहून घेत असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. याबाबत महाविद्यालयातील सबंधीतांशी चौकशी केल्यास अज्ञानी व उद्धट लोकांच्या अर्धवट बोलण्याम ुळे सामान्य विद्यार्थी व पालकांची चिंता कायमच वाढताना दिसून येते. एकुणच राज्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा आदर्श राज्यकर्ते देवेंन्द्र फडणविस, तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या या धडाकेबाज निर्णयाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करताना संस्थाचालक सहकार्य करताना दिसत नाहीत. हे त्रीवार सत्य असल्याचे मत कळंब येथील शिवतेज वैद्यकीय शिक्षण प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्राचे संचालक संतोष भांडे यांनी म्हटले आहे.

तसेच याबाबीकडे शासनातील तत्सम यंत्रणांनी गांभीर्याने लक्ष देवून दरम्यान पालक व संस्थाचालकांत निर्माण होणारे सततचे संघर्ष टाळावेत, अशी मागणीही अनेक पालक, विद्यार्थी व विद्यार्थीनींतून होत आहे.

## पार्वती कन्या प्रशालेत ‘पेड माँ के नाम’ उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**
मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आवाहनानुसार एक पेड माँ के नाम ही उपक्रम पार्वती कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी यांच्या विनंतीनुसार सर्व शिक्षकांनी आपल्या आईच्या नावाने एक चिंचेचे झाड लावून राबवले.

मुख्याध्यापिका यांच्या हस्ते प्रशालेमध्ये ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले.

मुख्याध्यापिका लता सोमवंशी यांनी शांताबाई जयेंद्र सोमवंशी यांच्या नावे, अभिमन्यू कदम यांनी शारदाबाई कदम यांच्या नावे, विजय मोरे यांनी सुधामती मोरे यांच्या नावे, तसेच आदिंनी यांच्या नावे वृक्षारोपण करण्यात आले.

एकूण १० चिंचेचे वृक्ष लोखंडी जाळीसह लावण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...



### हंगरगा येथे गणेश उत्सवनिमित्त शालेय स्तरीय निबंध, रांगोळी स्पर्धा

**जळकोट, दि.१९ सप्टेंबर -**

येथून जवळच असलेल्या हंगरगा (नळ) येथे प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी गणेश उत्सव निमित्ताने जय शिवा तरुण गणेश मंडळ यांच्यावतीने शालेय स्तरीय निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण राजीव गांधी शाळेमध्ये करण्यात आले. निबंध स्पर्धेमध्ये चंदना संजय वाघोले (प्रथम), सरस्वती गुंडेराव पाटील (द्वितीय), श्रद्धा चन्नप्पा मुळे (तृतीय) या तीन स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये यश मिळवले आहे.तसेच रांगोळी स्पर्धाही शालेय स्तरीय घेण्यात आली होती. या स्पर्धेत भक्ती भागवत तेली (प्रथम), निकिता अनिल चव्हाण (द्वितीय), गायत्री राजेंद्र कलशेट्टी (तृतीय) या तीन स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये यश मिळवले. विजेत्या स्पर्धकांना जय शिवा तरुण गणेश मंडळाच्यावतीने सन्मान चिन्ह व शालेय साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सरपंच अतुल कलशेट्टी, माजी उपसरपंच दयानंद चौगुले, संजय वाघोले, विशाल पाटील, प्रवीण चौगुले, रामेश्वर मुदगडे, पंकज पाटील, सिद्धेश्वर वाघोले, अमोल बिराजदार, परमेश्वर आपशेट्टी, समर्थ पाटील, योगेश मुदगडे, किरण वाघोले, सुनील कलशेट्टी, संदीप वाघोले, रामेश्वर मगे, महादेव चौगुले, अमोल वाघोले, अविनाश पाटील, राहुल सुरवसे, पप्पू केदार, सुभाष जमादार, ओमकार पाटील, माणिक आपशेट्टी, युवराज शिरगुरे, सचिन पोद्दार, नितीन कलशेट्टी, संतोष चौगुले, चेतन पाटील, अमोल व्हनाजे, शिवानंद स्वामी आदि मंडळाच्या सदस्यांनी या स्पर्धेसाठी सहकार्य केले व यांच्यावतीने बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमानिमित्त घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा राजीव गांधी विद्यालयचे मुख्याध्यापक घोडके यांनी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पंकज पाटील यांनी केले.



### सोजर मतिमंद निवासी शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**कळंब, दि.१९ सप्टेंबर -**

सोजर मतिमंद निवासी शाळेत १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कळंब शहरातील सामाजीक व अध्यात्मिक क्षेत्रात काम करणारे ह.भ.प.श्री.महादेव महाराज आडसुळ, ज्येष्ठ समाजसेवक व सेवा निवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय कुलकर्णी व ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपुत यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम मराठवाडा मुक्ती संग्रामचे जनक स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन महादेव महाराज अडसूळ, डि. के.कुलकर्णी. माधवसिंग राजपूत व शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत बेडके यांनी केले तर ध्वजारोहण महादेव महाराज अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे यांनी मुक्तीसंग्राम दिनाविषयी माहिती सांगितली. पाहुण्याचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक चद्रकांत बेडके व शाळेतील शिक्षकांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी केले. शिक्षक मनोगत अभिजीत होनराव व शाळेविषयी माहिती बळीराम मिटकरी यांनी सांगितली. आभार शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत बेडके यांनी मानले.

# २५० कोटी ठेवी व शुन्य टक्के एनपीएचे उद्दिष्ट : चेअरमन शरण पाटील

## उमरगा जनता बँकेची सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ सप्टेंबर -**

मागील २८ वर्ष कठोर परिश्रम, सभासद व ठेवीदारांचा विश्वास संपादन करुन बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करुन सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला आहे. सोने तारण, सोलार कर्ज, मराठा तरुणांना व्यवसायासाठी आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत कर्ज माफक व्याजदराने वाटप करण्यात येत आहे. मागील दोन वर्षात एनपीए कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. चालू आर्थिक वर्षात २५० कोटींच्या ठेवीचे उद्दिष्टासह शुन्य टक्के एनपीए करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले असुन याला सर्व सभासदांनी सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन शरण बसवराज पाटील यांनी केले.



उमरगा जनता सहकारी बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी उमरगा येथे अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर काशी, श्रीशैल्यम व उजैन पिठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे व्हा.चेअरमन अॅड. विरसंगप्पा आळंगे, संचालक प्राचार्य डॉ.दिलीप गरुड, मदन पाटील, रफिक तांबोळी, विनय बदोले, भरत मारेकर, अॅड. संजय बिराजदार, अण्णाराव कांबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित भरडे, मल्लीनाथ दंडगे, शिवलिंग माळी, रशीद शेख, दत्ता चटगे, गोविंद पाटील, प्रल्हाद काळे, बसवराज कस्तुरे, सतीश पवार, माजी सभापती सचिन पाटील, योगेश राठोड, महालिंग बाबशेट्टी, अनिल सगर, महेश माशाळकर, यशपाल कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री पाटील म्हणाले की, चैतन्यमुर्ती माधवराव काका पाटील यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या उमरगा जनता बँकेने बसवराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इवल्याशा रोपटयाचा वटवृक्षात रुपांतर झाले आहे. धाराशिव, लातुर, सोलापूर जिल्हयात बँकेच्या शाखा आहेत. लातुरला लवकरच शाखा सुरू करण्यात येईल. सभासदांनी जागृत होऊन वेळेवर कर्जाची परतफेड करणे गरजेचे आहे. ठेवीचा २१५ कोटींच्या ठेवीचा विक्रम नोंदवला आहे. सभासदांचे भागभांडवल ८ कोटी ६ लाख, राखीव निधी १८ कोटी १७ लाख, सभासदांना १०० कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. बॅकेचा १ कोटी ३० लाख रुपयाचा नफा, खेळते भांडवल २४७ कोटी, गुंतवणूक ७६ कोटी रुपये आहे. बँकेच्या ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत असून हे ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे चेअरमन शरण बसवराज बसवराज पाटील यांनी सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सर्व संचालक, शाखाधिकारी, सभासद, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्हा. चेअरमन ड. व्ही. एस. आळंगे यांनी प्रास्ताविक करुन अहवाल वाचन केले. सौ. पुजा अंकुश काळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करुन श्रध्दांजलीचा ठराव मांडला तर संचालक मदन पाटील यांनी आभार मानले.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पतसंस्थांची बैठक

## जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली होणार बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीमधील सुधारणा करण्याच्या संबंधाने जिल्हयातील सर्व पथसंस्थांची बैठक २० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथील डी.पी.डी.सी सभागृहात होणार आहे.



उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सक्षमीकरणासाठी जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समितीची नियुक्त केलेली आहे. या समितीने बँकेच्या कामकाजामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने जिल्हयातील सर्व नागरी पतसंस्था, मल्टीस्टेट, नागरी बँक व पगारदार सहकारी संस्थाना व्यवहार पुर्ववत होण्याच्या दृष्टीकोनातून कायदेशीर अडचणी व त्यावरील उपाययोजनांचे संबंधाने चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीस जिल्हयातील सर्व नागरी पतसंस्था, मल्टीस्टेट, नागरी बँक व पगारदार सहकारी संस्थाचे प्रतिनिधी, अध्यक्ष,कर्मचारी यांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा बँक सनियंत्रण समिती, उस्मानाबाद जिल्हा बँकेचे अध्यक्ष व संचालकाचे वतीने जिल्हा उपनिबंधक तथा समिती सचिव बालाजी काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विजय घोणसे यांनी केले आहे.



**उमरगा-** भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड शाळेत दि.१७ सप्टेंबर रोजी मंगळवार मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन स्वातंत्र्य सेनानी कै.नरसिंग सगर यांच्या पत्नी चिंगूबाई व मुख्याध्यापक जयवंत मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच खाऊचे वाटप करून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महेश सूर्यवंशी तर आभार नितीन राठोड यांनी मानले. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठीत नागरिक प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी तर्फे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय, धाराशिव येथे ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व मराठवाड्यामध्ये मोठ्या उत्साहात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा केला जात आहे.राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# श्रीगणेशाची आरती करण्याचा मान अक्षरवेल साहित्य मंडळातील भगिनींना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव आयोजित गणपती उत्सवाअंतर्गत श्रीगणेशाची आरती करण्याचा मान अक्षरवेल साहित्य मंडळातील भगिनींना मिळाला. प्रेमा सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि भोसले ज्युनियर कॉलेजच्या वतीने संपन्न झालेल्या या सोहळ्यासाठी अक्षरवेल महिला साहित्य मंडळातील जवळजवळ पंचवीस महिलांच्या हातून आरती करण्यात आली.

अक्षरवेल मंडळाच्या मार्गदर्शिका जेष्ठ लेखिका कमलताई नलावडे, या संस्थेच्या अध्यक्षा डॉ.सुलभाताई देशमुख, संस्थापक अध्यक्षा डॉ. रेखाताई ढगे, उपाध्यक्षा प्रा.विद्या देशमुख यांच्यासह सर्व सदस्यांचा त्यांच्या लेखनसातत्याबद्धल यथोचित सन्मान करण्यात आला.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचा सत्कार हा माहेरच्या सत्कारासारखा आहे म्हणून याचे मोल मोठे आहे. प्रेमा वहिनींच्या रूपाने बप्पांचा सेवाभावाचा वसा असाच पुढे चालू राहणार आहे असे आपल्या मनोगतात विद्या देशमुख म्हणाल्या.

तर धाराशिव जिल्हाला प्रेमाताईंच्या रुपाने एक आदर्श अशी सून लाभली आहे असे सत्काराला उत्तर देताना कमलताई नलावडे यांनी प्रतिपादन केले.अक्षरवेल महिला साहित्य मंडळाकडून प्रेमाताई सुधीर पाटील आणि मंजुळा आदित्य पाटील यांचाही शैक्षणिक क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्धल सत्कार करण्यात आला. कवयित्रींच्या कविता सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नगरपालिकेला दिव्यांग ५ टक्के निधी बाबत निवेदन



**परंडा, दि.१९ सप्टेंबर -**

परंडा शहरातील दिव्यांग बांधवांना नगरपालिका हद्दीतील शहरातील दिव्यांगाना हक्काचा दिव्यांग कायद्यानुसार तसेच शासन निर्णयानुसार दिव्यांग ५ टक्के निधी मिळावा. गेल्या वर्षी देखील आम्हाला दिव्यांग निधी मिळालेला नाही. मुख्याधिकारी नगरपरिषद परांडा यांनी सर्व दिव्यांग बांधवांचा विचार करावा आपल्या नगरपालिकेकडून आम्हाला मदत व्हावी, आम्हाला आमचे जीवन जगणे मुस्किल आहे. त्यात आपण निधी दिला नाही, आम्ही कसे जगावे. याकरिता आपण दिव्यांगांना पाच टक्के निधी सरसकट वाटप करावा, या मागणीसाठी सर्व दिव्यांग बांधवांच्या वतीने निवेदन देण्यात आले. निवेदन देताना दिव्यांग उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हाप्रमुख धाराशिव तानाजी घोडके, शहराध्यक्ष गोरख देशमाने, संजय गांधी निराधार समितीचे सदस्य दत्तात्रेय रणभोर, महेश देशमुख, महेबुब दामटे, नासेर शेख, अनंत लोखंडे, नाना तुटके, शेख तसेच शहरातील दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# राहुल गांधी यांच्या जीविताला धोका निर्माण करण्याच्या धमक्या देणाऱ्यांविरोधात काँग्रेसचे तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

गेल्या काही दिवसांपासून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची हत्या करण्याच्या, त्यांची जीभ छाटण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे राहुल गांधी यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.

दिल्लीत राहुल गांधींची अवस्था त्यांची आजी इंदिरा गांधी सारखी करू अशी खुलेआम धमकी दिली आहे. राहुल गांधींना दहशतवादी म्हंटले आहे. राहुलजींची जीभ छाटणाऱ्याला ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. राहुल गांधी यांच्या जिभेला चटके दिले पाहिजे असे वक्तव्य केले आहे.

विविध पक्षांच्या नेत्यांची ही वक्तव्ये अत्यंत गंभीर असून राहुलजींच्या जीविताला यांच्यापासून धोका आहे हे स्पष्ट झाले आहे. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून कारवाई करण्याची मागणी केली आहे. पण सरकारने अद्यापही या धमक्या देणाऱ्या नेत्यांवर कोणतीही कारवाई केली नाही.

त्यामुळे हे सर्व जाणीवपूर्वक सुरू आहे हे स्पष्ट झाले आहे. म्हणून या विरोधात धाराशिव येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र निदर्शने आंदोलन करण्यात येणार आले.




आंदोलनात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धीरज पाटील, माजी अध्यक्ष विश्वासराव शिंदे, वरिष्ठ उपाध्यक्ष सय्यद खलील सर, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभिजित चव्हाण, धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, उमरगा तालुकाध्यक्ष सुभाष राजोळे, सेवादल जिल्हाध्यक्ष विलास शाळू, बाजार समितीचे संचालक उमेश राजे निंबाळकर, महिला प्रदेश सचिव शिलाताई उंबरे, महिला जिल्हाध्यक्ष ज्योती सपाटे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आयुब पठाण, मागासवर्गीय जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे,

ओबीसी जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत, जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, सचिव सुरेंद्रदादा पाटील, सचिव अनंत घोगरे, प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, प्रभाकर लोंढे, मानवाधिकार विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिमान पेठे, युवा नेते अमोल कुतवळ, अनिलकुमार लबडे,

महिला कार्याध्यक्ष तनुजा हेड्डा, सुवर्णा ढवळे, प्रेम सपकाळ, अभिषेक बागल, शहाजी मुंडे सर, सलमान शेख, प्रभाकर डोंबाळे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष स्वप्नील शिंगाडे, जिल्हा सचिव सौरभ गायकवाड,

भारत काटे, संकेत पडवळ, रोहित पडवळ, अश्रूबा माळी, संजय देशमुख, महादेव पेठे, भूषण देशमुख, संतोष पेठे, सुभाष हिंगमोरे, सचिन धाकतोडे, संजय गजधने यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.प्रतापसिंह पाटील, युवक राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव रोहित बागल, प्रदेश सचिव आदित्य पाटील सहभागी झाले होते.

# देशाच्या विकासात मराठवाड्याचे महत्वपूर्ण योगदान

## श्रीराम साळुंखे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विद्या समितीचे अध्यक्ष तथा कोल्हापूर विभागाचे विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे हे लाभले होते. यावेळी बोलताना श्रीराम साळुंखे यांनी वरील उद्गार काढले.

मराठवाड्याच्या मातीमध्ये गुणवत्ता आहे. या मातीने देशाला अनेक महापुरुष दिलेले आहेत. राजकीय क्षेत्रात आणि शैक्षणिक क्षेत्रात देखील मराठवाडा अव्वल आहे. महाराष्ट्राचे अनेक मुख्यमंत्री देखील मराठवाड्यातील होऊन गेले. त्यामुळे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासात मराठवाड्याचे खुपच योगदान आहे.असे ते यावेळी म्हणाले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व करणारे श्री स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ व ज्यांनी ज्यांनी हुतात्मे पत्करले त्यांना विनम्र अभिवादन करतो.



गुरुदेव कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणाले की, आपण सर्वजन शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या संस्कारातून संस्कारक्षम झालेलो आहोत आणि संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण कार्य करत आहोत त्यामुळे विद्यार्थी केंद्रबिंदू म्हणून आपण निष्ठेने कार्य करत आहात त्याबद्दल आपले आभार. यापुढे शिक्षण क्षेत्रात चिरकाल बदल घडवून आणण्यासाठी आपण आपल्या महाविद्यालयाचा सामंजस्य करार परकीय देशातील विद्यापीठांशी करावा अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सावता फुलसागर यांनी देखील मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

याप्रसंगी श्रीराम साळुंखे आणि डॉ.सावता फुलसागर यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले .

यावेळी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य बबन सूर्यवंशी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सह समन्वयक डॉ.संदीप देशमुख डॉ. केशव क्षिरसागर आदींसह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# तेर ग्रामपंचायतचे दरबार गल्ली, पेठ विभागातील आरओ प्लॅट कोणाचे?

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१९ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे ग्रामपंचायतने करार केलेले अधिकृत चार आर ओ तर दरबार गल्ली व पेठ विभागात असलेले आर ओ प्लॅट नेमके कोणाचे असा प्रश्न पडलेला आहे.



धाराशिव तालुक्यातील तेर येथे ग्रामपंचायतने करार केलेल्या इंटक्ट अप्लायन्सेस प्रा.लि.पुणे यांच्या वतीने चार आर ओ प्लॅट चालविले जातात. परंतू त्यामध्ये दरबार गल्ली व पेठ विभागातील अरो प्लॅट नेमके कोणाचे, पेठ विभागातील आर ओ प्लॅट बंद आहे तो चालू करणे आवश्यक आहे. तर दरबार गल्लीतील आर ओ प्लॅट नेमका कोणाचा, आर ओ फ्लॅटच्या पाणी विक्रीचे रक्कम किती जमा झाली व किती खर्च झाली व उर्वरित रक्कम कोणाकडे आहे हा संशोधनाचा विषय आहे. याची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे. ग्रामपंचायतने करार केलेले चार आर ओ प्लॅट इंटक्ट अप्लायन्सेस प्रा.लि.पुणे चालवितात. याचीही सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### 'मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन म्हणजे क्रांतिकारकांचे स्मरण : वट्टमवार

**उदगीर, दि. १९ सप्टेंबर-**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर प्रबोधनकार ठाकरे, स्वामी रामानंद तीर्थ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते गणितीय प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सायली कुलकर्णी या विद्यार्थिनीने मुक्ती संग्रामाचा लढा व क्रांतिकारकाने दिलेले बलिदान आपल्या मनोगतातून मांडले व स्वराली हंचनाळे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनीने संस्कृत भाषेतून आपले मनोगत व्यक्त केले .आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एकनाथ राऊत यांनी स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले त्यांच्या बलिदानातूनच मराठवाडा मुक्त झाला असे वक्तव्य केले अध्यक्षीय समारोपात संतोष कुलकर्णी यांनी एकूणच मराठवाडा परिसरातील हुतात्मा स्मारकांची आठवण व त्यांच्या बलिदानाने मराठवाडा मुक्त होऊन पावन झाला असे प्रतिपादन केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी प्रमुख अतिथी एकनाथ राऊत स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकर वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासुणे, लक्ष्मीकांत नेलवाडकर, परमानंद निलंगे, अशोक कुलकर्णी, चंद्रकांत धनबा, मोहिनी अचोले, वसंत कलकोटे, मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नेमट यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन नीता मोरे, प्रास्ताविक संतोष गजलवार, वैयक्तिक गीत बालाजी पडलवार व आभार मीनाक्षी कस्तुरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख रामेश्वर मलशेट्टे, राजकुमार म्हेत्रे, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख आशा गौतम व विजया गोविंदवाड तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. वंदे मातरम या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



### आदर्श शिक्षक प्रा. महेमूद जहागीरदार यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

**उदगीर, दि. १८ सप्टेंबर-**

जळकोट येथील पाटोदा खुर्द गावचे सुपुत्र उदगीर येथील जमहूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक जहागीरदार महेमूद अली यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार उर्दू शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य (माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग) द्वारे शिक्षक आमदार विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते कॉक्सिट महाविद्यालय अंबाजोगाई रोड लातूर येथे दिला गेला. याबद्दल ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा खुर्दद्वारे त्यांचा सत्कार व सन्मान केला गेला. याप्रसंगी त्यांचा सत्कार सरपंच सललिता गीत्ते यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी मुख्याध्यापक मारुती नागरगोजे, माजी प्राध्यापक गोपीनाथ नागरगोजे, माजी प्राचार्य बापूराव नागरगोजे, आदर्श शिक्षक राजू नागरगोजे, बळीराम नागरगोजे, प्रकाश नागरगोजे, बापूराव गडकर, गंगाराम गडकर, चेअरमन किशन नागरगोजे, ज्ञानेश्वर नागरगोजे, मुमताज मिया, लायक मिया, आजम शेख, काझम शेख, पांडुरंग नागरगोजे, नारायण पैलवान, नामदेव नागरगोजे, लक्ष्मण नागरगोजे, अरुण नागरगोजे, संजय गुरुजी, रामराव नागरगोजे, बाळू नागरगोजे, मोहन पाटील, लक्ष्मण मुंडे आदी ग्रामस्थांच्या उपस्थितीत केला गेला. बळीराम नागरगोजे यांनी आभार मानले. प्रकाश नागरगोजे यांनी सूत्रसंचालन केले.



### सामान्य रुग्णालय उदगीरच्या वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ. दोडके

**उदगीर, दि. १९ सप्टेंबर-**

उदगीर येथील सामान्य रुग्णालय येथे भोर (जि. पुणे) येथील वेद्यकीय अधीक्षक ड्रॉ पांडुरंग केशवराव दोडके यांची उदगीर येथे बदली झाली आहे त्यानी नुकतेच सामान्य रुग्णालय त पदभार स्वीकारला. यावेळी रुग्णालयात निवृत्त मुख्याध्यापक शंकरराव साबणे व डॉ. शाम पवार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### आ. देशमुख यांच्याकडून हुतात्म्यांना अभिवादन

**लातूर दि. १९ सप्टेंबर-**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील हुतात्मा स्मारकस्थळी जाऊन मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून आपल्या सहकार्यासमवेत अभिवादन केले. दरम्यान यावेळी त्यांनी या ठिकाणी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला व बाल गोपालांच्या समवेत छायाचित्रे काढली. यावेळी विलास सह. साखर कारखाना व्हा.चेअरमन- रवींद्र काळे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष ॲड.किरण जाधव, माजी महापौर प्रा.स्मिता खानापूरे, माजी नगराध्यक्ष-लक्ष्मण कांबळे, संतोष देशमुख, माजी नगरसेवक-दत्ता लोखंडे, सेवादलाचे सुपर्ण जगताप, इम्रान सय्यद, डॉ. बी. आर. पाटील, शाम जैन, राहुल देशमुख, सुनील गायकवाड,पांडुरंग देडे रहीम शेख,चंद्रकांत धायगुडे, पिराजी साठे उपस्थित होते.

## महादेव कोळी समाजाचे डॉ. बाबासाहेबांना दंडवत

### मराठवाड्यातील प्रश्न सोडवण्यासाठी छत्रपती शिवाजी चौक ते आंबेडकर पुतळ्याला दंडवत



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १९ सप्टेंबर-**

मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीकडे सबळ पुरावे असतानाही जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे शासनाला सद्बुध्दी देऊन तत्काळ प्रश्न सोडवावा व अनुसूचीत जमाती प्रवर्गासाठी रक्त नात्याचे तात्काळ परिपत्रक काढावे या मागणीसाठी येथील छत्रपती शिवाजी चौक ते भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर हजारो सकल आदिवासी कोळी महादेव जमातीने गुरूवारी ता. १९ रोजी दंडवत आंदोलन करून नतमस्तक झाले.

सकल आदिवासी समाजाचे नेते चंद्रहंस नलमले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये महादेव कोळी, मल्हार कोळी यांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. हा समाज पूर्वीपासून अनुसूचीत जमातीमध्ये आहे. परंतु या जमातीला सुलभतेने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी जाणीवपूर्वक अडचणीत आणले जाते. ठराविक मतदार संघातील आदिवासी आमदाराची लाबी राज्यातील जात पडताळणी समित्याचा कारभार चालवते. विस्तारित क्षेत्रातील जमातीवर अन्याय केला जात आहे. अनुसूचीत जाती व इतर मगासवर्गीय प्रवर्गासाठी रक्त नात्याचा निर्णय लागू केला आहे त्याप्रमाणे अनुसूचीत जमातीसाठी हा निर्णय लागू करण्यात करावा व या समाजाचे प्रश्न तात्काळ सोडवावा या मागणीसाठी दंडवत आंदोलन केले. यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, रिपाई आठवले गटाचे अंकुश ढेरे, सकल मराठा समाज, वंचित बहूजण आघाडीचे सुनील सूर्यवंशी, धनगर समाजाचे झटींगराव म्हेत्रे, लहूजी शक्ती सेना, गणराज्य संघ यासह आदी संघटनेकडून पाठिंबा दिला. यावेळी महादेव कोळी समाजाकडून निझाम गझेट लागू करावे, जनगणनेनुसार कोळी ही मुख्य जमात असून त्यानूसार महादेव कोळी, मल्हार कोळी, डोंगरे कोळी या उपजमाती आहेत. तत्कालीन आदिवासी मंत्री मधुकर पिचड, गोविद गारे यांचा निकष लागू करा यासह आदी मागण्यांसाठी हजारो समाज, महीला, विद्यार्थांनी दंडवत आंदोलनात सहभाग घेतला होता.

## टाकळी येथे विद्युत पोल पडून युवक जागीच ठार



**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. १९ सप्टेंबर-**

तालूक्यातील टाकळी येथे अनाधिकृतपणे वृक्ष तोडीचे काम सुरु होते. यावेळी एक धक्कादायक घटना घडली. झाड तोडत असताना ते शेजारील विजेच्या पोलवर पडले. त्यामुळे पोलजवळ उभ्या असलेल्या तरूणाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान मृत मुलाच्या नातेवाईकांनी निष्काळजीपणे व विनापरवाना वृक्ष तोड करणाऱ्यांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केल्या शिवाय अंत्यसंस्कार न करण्याचा निर्णय घेतला आहे.

अल्ताफ हमजा नाईकवाडे (२०) असे त्या तरूणाचे नाव आहे. डोक्यावर विद्युत पोल पडल्याने अल्ताफ जखमी झाला. यावेळी गावकऱ्यांनी वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वलांडी येथे उपचारासाठी आणले असता अल्ताफची प्रकृती चिंताजनक असल्याने व वलांडी येथे कोणतेही सोयी-सुविधा नसल्याने रुग्णास उपजिल्हा रूग्णालय उदगीर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान अल्ताफ नाईकवाडे याचा मृत्यू झाला. अल्ताफच्या अशा अपघाती निधनामुळे त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बुधवार दि १८ सप्टेंबर रोजी इस्माईल हामजू नाईकवाडे (रा. टाकळी) यांच्या फिर्यादीवरून सादेव धोंडीराम माने, माधव धोंडीराम माने, प्रमोद धोंडीराम माने रा.आळवाई ता भाल्की कर्नाटक व हबीब मूल्लां,हाजी मूबा,रा टाकळी यांच्या विरोधात गून्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पो. उपनिरीक्षक प्रदीप गौंड करीत आहेत.

## ओबीसींच्याच उमेदवारांना निवडून द्या : प्रा. हाके

### अहमदपूर येथील ओबीसी आरक्षण मेळाव्यास हजारो बांधव उपस्थित



**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. १९ सप्टेंबर-**

अहमदपूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सकल ओबीसी समाजाच्यावतीने महा यल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास चाकूर तालुक्यातील हजारो समाज बांधव महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या मेळाव्यामुळे लातूर नांदेड महामार्गावर संपूर्ण ओबीसी समाज बांधवांचे तोफेच्या ताफे मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

चाकूर, चापोलीसह विविध ठिकाणी प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे ओबीसी समाज बांधवांच्या वतीने फटाक्यांच्या आतिषबाजीत काठी आणि घोंगडी देऊन भव्य स्वागत करण्यात आले. प्रा. लक्ष्मण हाके सभेला संबोधित करताना म्हणाले की, अहमदपूर मध्येच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसींच्याच उमेदवारांना निवडून द्यावे जर कोणत्या पक्षाला ओबीसींचे मते हवे असतील तर त्यांनी ओबीसींचे जास्तीत जास्त उमेदवार द्यावे अन्यथा त्यांचे उमेदवार नक्की ओबीसी समाज पाढणार असे लक्ष्मण हाके यांनी सांगितले. हैद्राबाद गॅजेट हे स्वातंत्र्य पुर्वीचे आहे ते लागू करता येणार नाही.धनगर समाजासाठी एस.टीच्या आरक्षणाचा जिआर काढण्याचा अधिकार मुख्यमंत्री यांना नाही, राष्ट्रपतीचे अधिकार, आरजीआयचे अधीकार मुख्यमंत्री यांच्याकडे कधी आले तसेच मुख्यमंत्री यांनी धनगर समाजासाठी जिआर काढावाच असे लक्ष्मण हाके म्हणाले.या सरकारने ओबीसींच्या लोकांना शंभर टक्यापैकी फक्त एक टक्काच योजना दिल्या आहेत. असे लक्ष्मण हाके महायल्गार मेळाव्यास संबोधित करताना म्हणाले. या मेळाव्यासाठी चाकूर तालुक्यातून हजारो ओबीसी बांधव अहमदपूर येथे उपस्थित होते.

## किल्लारी कारखाना ५० रुपये वाढीव दर देणार

### मिल रोलर पूजनात आ. अभिमन्यू पवार यांचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १९ सप्टेंबर-**

अनेक वर्षापासून बंद पडलेल्या किल्लारी साखर कारखान्याला पुनर्जिवीत करून ७० हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले आहे. सर्व शेतकऱ्यांना एक महिन्यात ऊसाचे बील दिले आहे. पाहिली उच्चल २६५० रुपये प्रतिटन दिले असून एकही रुपयाही देणे ठेवले नसून या हप्त्यात आणखी ५० रुपयांची वाढ करून देण्यात येणार आहे, असे आश्वासन आमदार अभिमन्यू पवार यांनी दिले आहे.

औसा तालुक्यातील किल्लारी सहकारी साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन करण्यात आले. यावेळे आ. पवार बोलत होते.भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, बंडू कोद्रे, समीर डेंग, गोविंद भोसले, श्रीराम पाटील, बाबासाहेब पाटील, कार्यकारी संचालक तुकाराम पवार, चिफ अकाउंटंट संतोष वाडीकर सल्लागार सुनील देशमुख, चिफ इंजिनिअर विनोद भोसले, चिफ केमिस्ट पाटोळे, मुख्य शेतकी अधिकारी कल्याण शिंदे उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, मृत अवस्थेत असलेला किल्लारी कारखाना विकण्याचा घाट घातला होता. पण श्री निळकंठेश्वराच्या आशीर्वादाने आपण हा कारखाना चालू करून तो पुन्हा शेतकऱ्यांच्या मालकीचा ठेवला आहे. म्हणून कारखाना आपल्याला जपायचा असल्याने सर्व कर्मचाऱ्यांनी अगदी मन लावून काम करावे. असा सल्लाही त्यांनी कामगारांना दिला. कारखान्याची लवकरच गाळप क्षमता वाढ करायची असून सभासदांनी वाढीव सभासद आकारणी भरून किल्लारी कारखान्याचे सभासद व्हावे. कामगारांनी अचूक व प्रामाणिकपणे काम केले तर एकही दिवस कारखाना बंद पडणार नाही. तरच किल्लारी कारखान्यास पुनर्वैभव मिळण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे कारखाना आपल्या जिवा भावाचा आहे. अस समजून निळकंठेश्वराच्या आशीर्वादाने सर्व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करावे, असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १९ सप्टेंबर-**

येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रथमतः स्वामी रामानंद तीर्थ, राष्ट्रपिता महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्था सचिव प्राचार्या रेखाताई हाके-तरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे, माध्यमिक मुख्याध्यापिका मीना तोवर प्रमुख पाहुणे आदर्श शिक्षिका चंद्रकला राजे, प्रा. समशान पटेल, तुलसी हांडेसह मान्यवर उपस्थित होते. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उत्कृष्ट सादरीकरणा बद्दल विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. आदर्श शिक्षिका चंद्रकला राजे, प्रा. समशान पटेल यांनी मराठवाड्याच्या स्वातंत्र्य लढ्याविषयी मनोगतपर भाषणे केली. प्रास्ताविक मीना तोवर यांनी केले. सूत्रसंचालन सतीश साबणे यांनी केले तर आभार आशा रोडगे यांनी मानले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातुरात भाजपा नेत्यांच्या विरोधात आंदोलन




**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. १९ सप्टेंबर-**

कोंग्रेसचे नेते संसदेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर बेताल वक्तव्ये करणाऱ्या भाजपा नेत्यांचा लातूर जिल्हा महिला काँग्रेसकडून लातुरात गुरुवारी महात्मा गांधी चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी खासदार बोंडे आमदार गायकवाड यांचा निषेध करण्यात आला जिल्हा महिला काँगेसच्या अध्यक्षा शिला पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले

यावेळी शिला पाटील यांनी सत्तेवर असलेल्या भाजपा खासदार बोंडे व शिवसेनेचे आमदार गायकवाड यांनी खासदार राहुल गांधी यांच्यावर बेताल वक्तव्ये केले त्याचा निषेध करून यांच्यावर कायदेशीर कारवाई करा, अशी मागणी केली लवकरात लवकर कारवाई न केल्यास आम्ही पुन्हा रस्त्यांवर येवून आंदोलन करू असा इशारा शिला पाटील यांनी दिला आहे यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विद्या पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आंदोलनात लातूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षा राजमाने, सई गोरे, ज्योती डोळे, जिल्हा पदाधिकारी डांगे, हादवे, मंगला मोरे, डीग्रसे, खोडसे, पतंगे, पल्लवी जाधव उपस्थित होत्या.

## 'प्रकृति, पर्यावरण एवं आपदा प्रबंधन' जनजागृती अभियान



**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १९ सप्टेंबर-**

महाराष्ट्रातील उदयगिरी महाविद्यालयात प्रकृति, पर्यावरण एवं आपदा प्रबंधन जनजागृती अभियान अंतर्गत पियुष यांनी आपल्या महत्वपूर्ण भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमात त्यांनी नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी सज्ज असण्याचे आवाहन केले.

आपल्या भाषणात निसर्गसंवर्धन, पाण्याचा योग्य वापर, वनीकरण आणि जैवविविधतेचे जतन या मुद्द्यांवर विशेष भर दिला. तंत्रज्ञानाच्या मदतीने पर्यावरण रक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी बनवण्याचे महत्त्व त्यांनी विषद केले. कार्यक्रमात अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी पाण्याचे संरक्षण आणि त्याचे शाश्वत व्यवस्थापन, जैवविविधतेचे रक्षण आणि वनीकरणाचे महत्त्व, आपत्ती व्यवस्थापनाच्या उपाययोजना आणि जागरूकता वाढवणे याविषयी माहिती दिली. ब्रह्मकुमारी ज्योती यांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य मस्के यांनी केले. यावेळी विष्णू भाई, किरण भाई, दुर्गा उपस्थित होते. सूत्रसंचालन स्टाफ सेक्रेटरी ग्रंथपाल डॉ.एल.बी. पेन्सलवार यांनी केले तर आभार प्रा.डॉ.व्ही.एस.नागपूर्णे यांनी मानले.

## मराठवाडा मुक्तिसंग्रामाची शौर्यगाथा प्रेरणादायी : जिल्हाधिकारी

### लातूर येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. १९ सप्टेंबर-**

मराठवाड्याच्या भूमीला निजामाच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी लढल्या गेलेल्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गौरवशाली शौर्यगाथा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या प्रेरणादायी इतिहासाला साक्षी ठेवून जिल्ह्याच्या विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे आयोजित मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रारंभी हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभास जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे व मान्यवरांच्या हस्ते मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय



अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह स्वातंत्र्य सेनानी, त्यांचे कुटुंबीय, लोकप्रतिनिधी, पत्रकार बांधव, अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते. उपस्थितांसह जिल्ह्यातील नागरिकांना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सभामंडपात उपस्थितीत स्वातंत्र्य सेनानी व त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींची आस्थेवाईक विचारपूस करुन भेट घेतली. जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने राष्ट्रगीतासह महाराष्ट्र गीत गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

### जिल्ह्यात 'एक पेड माँ के नाम' अभियान

लातूर जिल्ह्यात वन क्षेत्र अतिशय कमी आहे. त्यामुळे वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने 'माझं लातूर, हरित लातूर' अभियान सुरु केले आहे. जून महिन्यापासून सुरु असलेल्या या अभियानामध्ये आतापर्यंत जवळपास ३३ लाखपेक्षा अधिक वृक्ष लागवड झाली आहे. जिल्ह्यात 'एक पेड़ माँ के नाम' अभियान राबविले जात आहे.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## लातुरचे डॉक्टर रविराज पोरे सन्मानित

**लातूर, दि. १९ सप्टेंबर-**

होमिओपॅथिक क्षेत्रातील योगदानाबद्दल लातूर येथील डॉ. रविराज पोरे यांना उत्कृष्टतेचा पुरस्कार बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर मेडिकल महाविद्यालयांच्या वतीने राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी आयुष्यमान भारत मिशनचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांच्यासह मान्यवर दिसत आहेत





## संक्षिप्त वृत्त



### नाफेड अंतर्गत लातुरात सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात यावेत : पाटील-कव्हेकर

**लातूर दि. १९ सप्टेंबर-**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगले दर मिळावे म्हणून सोयाबीन व इतर २३ धान्याचे दर निश्चित केलेले आहेत. यामध्ये केंद्र शासनाने सोयाबीनला दिलेला दर ४८९२ रूपये आहे. परंतु लातूर मार्केटमध्ये सोयाबीन ४५०० रूपये क्विंटल प्रमाणे आडत व्यापारी खरेदी करीत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी प्रशासनाने आदेशीत करून नाफेड अंतर्गत सोयाबीन धान्याचे खरेदी केंद्र तात्काळ सुरू करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा,अशा मागणीचे निवेदन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना दिलेले आहे. लातूर मार्केट हे राज्यातच नाही तर देशभरात प्रसिध्द आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगले दर मिळावे म्हणून सोयाबीन व इतर २३ धान्याचे दर निश्चित केले आहे. ज्यामध्ये सोयाबीनचे केंद्र शासनाने दिलेले दर ४८९२ रूपये आहेत. सोयाबीनचे पीक लातूर जिल्हा व संपूर्ण मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात परेले जाते. या धान्याचे लातूर मार्केटमध्ये ४५०० रू दर क्विंटल आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचे दर क्विंटलला ४०० ते ४५० रू नुकसान होत आहे. त्यामुळे सोयाबीन धान्याच्या खरेदी केंद्राची शासनाच्यावतीने त्वरीत सुरुवात करावी आणि शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी अपेक्षाही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.



### आ. रमेश कराड यांच्याकडून चव्हाण परिवाराचे सांत्वन

**लातूर दि. १९ सप्टेंबर-**

गरसुळी येथील भाजपाचे कार्यकर्ते नवनाथ चव्हाण यांचे वडील नागोराव श्रीपती चव्हाण यांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांच्या निवासस्थानी जाऊ आ. रमेश कराड यांनी चव्हाण परिवाराचे सांत्वन केले. गावातील आणि परिसरातील आध्यात्मिक व इतर सार्वजनिक कार्यक्रमात सक्रियपणे सहभाग घेणारे वयोवृद्ध श्रीपती चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. सदरील निधनाची माहिती मिळाल्याने आ. रमेश कराड यांनी गरसूळी येथे जाऊन भाजपाचे कार्यकर्ते नवनाथ चव्हाण आणि त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. यावेळी विक्रम शिंदे, नवनाथ भोसले, ॲड. दशरथ सरवदे, ज्ञानोबा भिसे, वसंत करमुडे, अभिषेक आकनगिरे, पत्रकार रामेश्वर बद्दर, श्रीमंत नागरगोजे उपस्थित होते. याप्रसंगी चव्हाण कुटुंबातील मयत नागोराव यांच्या पत्नी, मुलगा नवनाथ चव्हाण, चंद्रकांत चव्हाण, भाऊ भाऊसाहेब चव्हाण उपसरपंच सुधाकर चव्हाण, संतोष चव्हाण, भास्कर चव्हाण, सुरेश चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, अरुण कातळे, शिवराज नरवटे, शरद काळे, दिलीप कातळे, ऋषिकेश चव्हाण उपस्थित होते.



### गुरुराज माऊली राष्ट्रसंतांचा संजीवन समाधी सोहळा

**अहमदपूर, दि. १९ सप्टेंबर-**

गुरुराज माऊली राष्ट्रसंत माऊलीचा नामघोषण हजारो भाविकांच्या उपस्थितीत राष्ट्रसंत सद्गुरू शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा भक्ती स्थळावर भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. भाद्रपद शुद्ध पौर्णिमा या दिवशी राष्ट्रसंत भक्ती स्थळावर समाधीस्थ झाले त्यानिमित्त दरवर्षी संजीवन समाधी सोहळा साजरा होत असतो. यानिमित्त अखंड शिवनाम सप्ताह आयोजन करण्यात आले होते. वाळकेवाडी, मंगनाळी शिवडी, बाजीराव, लोहा ,खेडकर वाडी ,लांडगेवाडी आधी गावातून भगवा ध्वज पताका घेऊन अनेक दिंड्या भक्ती स्थळावर दाखल झाल्या होत्या. राष्ट्रसंतांच्या पादुकाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शि.भ. प भगवंतराव पाटील चांभारेकर यांचे कीर्तन झाले दुपारच्या सत्रात धर्मसभेत राष्ट्रसंतांचे उत्तराधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, शंभू लिंग शिवाचार्य महाराज उदगीरकर, डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज पूर्णकर, शंकर लिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळ,महादेव शिवाचार्य महाराज कळमनुरी, संगणबसपा शिवाचार्य महाराज निलंगा, आचार्य गुरुराज स्वामी महाराज उपस्थित होते यावेळी प्रा. मनोहर धोंडे यांचे भाषण झाले भक्ती स्थळ ब दर्जाची तीर्थक्षेत्र असून त्यासाठी शासनाने ३० कोटींचा निधी मंजूर केला असून येत्या वर्षात त्याचा कामाचा आरंभ होणार असल्याचे प्रा. धोंडे यांनी सांगितले. व्यासपीठावर उमाकांत शेटे दत्ता खंकर भक्ती स्थळाचे विश्वस्त सिद्धेश्वर पाटील बाबुराव देशमुख मनमत आप्पा पालापुरे सुप्रियाताई घोटे शीला शेटकर, रजनी मंगलगे, पद्मिनी खराडे, शिवलिंग पाटील, किनीकर, हवगी, देवणे, चैतन्य सौंदळे रतिकांत स्वामी, चंद्रकांत हैबतपुरे, निळकंठ बिराजदार उपस्थित होते.

## एस.टी.आरक्षणास चाकूर तालुक्यातील धनगर समाजाचा पाठिंबा

### तहसीलदार नरसिंग जाधव यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. १९ सप्टेंबर-**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) आरक्षणाची अंमलबजावणी करावी, यासाठी महाराष्ट्रभर धनगर समाज बांधव उपोषणास बसले आहेत.

यामध्ये पंढरपूर, लातूर, नेवासा याठिकाणी विविध धनगर समाज बांधव अन्नत्याग करून मागील अकरा दिवस झाले अनुसुचित जमाती (एस.टी) आरक्षण अंमलबजावणीसाठी उपोषण करीत आहेत. त्यामुळे सरकारने धनगर समाजाला तात्काळ अनुसूचित जमाती (एस.टी) अंमलबजावणी करून जिआर काढावा, अशी मागणी धनगर समाज बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे.



त्या उपोषणास बसलेल्या उपोषणकर्त्यास चाकूर तालुक्यातील सर्व सकल धनगर समाज बांधवांचा जाहीर पाठिंबा असून एस.टी.आरक्षणाची अंमलबजावणी तात्काळ करावी अशा आशयाचे निवेदन दि.१९ सप्टेंबर रोजी चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव यांना देण्यात आले.

यावेळी निवेदन दिल्यानंतर सरकारचा निषेध व्यक्त करीत घोषणा देण्यात आल्या. आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण अंमलबजावणी झालीच पाहिजे, यळकोट यळकोट जय मल्हार आदी घोषणा देण्यात आल्या.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे, माधव भिंगोले, हनमंत शेळके, नारायण राजुरे, हणमंतवाडी सरपंच हणमंत नरवटे, दशरथ भंडे, बळीराम भंडे, बालाजी मलिशे, काशिनाथ वागलगावे, नारायण काचे, भगवाण हाके, शिवशंकर मुदाळे, सिद्धेश्वर सूर्यवंशी, मरोती तिवडे, माधव तिवडे, शंकर तिवडे, राम भंगे, गणपत सुरवसे, दत्तात्रय मुदाळे, परमेश्वर मिसे, गणपत सुरवसे, लक्ष्मण हाके, रामेश्वर हाके, साई सुळ, मुकेश बाजगिर, भुजंग सुरवसे, धनराज सुळ, हाणमंत नरवटे, परमेश्वर पाटील, डिगांबर सुरणे, भगवान हाके, खंडेराव बेडदे आदी धनगर समाज बांधवांच्या स्वाक्षरीचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

### देवेंद्र फडणवीस यांची कॅबिनेट कधी होणार : दयानंद सुरवसे

देवेंद्र फडणवीस यांची पहिली कॅबिनेट कधी होणार व धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण अंमलबजावणी कधी होणार असा सवाल उपस्थित करीत दयानंद सुरवसे यांनी फडणवीस सरकारचा तिव्र निषेध व्यक्त केला.तसेच आरक्षणाची अंमलबजावणी कधी करण्यात येईल,अनुसूचित जमातीच्या सवलती लागू करण्यात येथील असे खोटे आश्वासन फडणवीस यांनी दिले होते.त्यामुळे धनगर समाजाने फडणवीस सरकारला भरघोस मताधिक्य देऊन निवडून देऊन दहा वर्षे झाली मात्र पहिल्या कॅबिनेट मध्ये अनुसूचित जमातीची अंमलबजावणी करतो म्हणून अनेक कॅबिनेट झाल्या पण अनखिनही अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी तात्काळ करावी अन्यथा येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत या सरकारला धनगर समाज त्यांची जागा दाखवून देईल, असे माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे यांनी बोलताना सांगितले.

## लातूर जिल्ह्यातील मुलींचा हॉकी संघ ठरला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १९ सप्टेंबर-**

लातूर : लातूर जिल्ह्यातील बिंदगीहाळ या गावातील हनुमान विद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला असून नांदेड येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत हा ग्रामीण भागातील संघ विजेता ठरला आहे. विशेष म्हणजे या संघाचे पालकत्व माझं लातूर परिवाराने ७ वर्षांपूर्वी स्वीकारत संघाला भक्कम आधार देण्याचे कार्य केले आहे.

लातूर जिल्ह्यातील हॉकी या आपल्या राष्ट्रीय खेळास हनुमान विद्यालयाच्या मुलींच्या संघाने राष्ट्रीय पातळीवर लौकीक मिळवून दिला आहे. ग्रामीण भागातील या संघातील २ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर तर तब्बल २०० च्या वर खेळाडूंनी राज्यस्तरावर लातूरचे प्रतिनिधित्व केलेले आहे. ग्रामीण भागातील गरीब आणि होतकरू मुली या संघाचे प्रतिनिधित्व करतात. क्रीडासाधनांचा अभाव, मैदान, गणवेश अशा अनेक अडचणींचा सामना करीत या संघाने मिळविलेले यश उल्लेखनीय आहे.

ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन दिले पाहिजे या उद्देशाने माझं लातूर परिवाराने या संघाचे २०१७ साली पालकत्व घेतले. तत्कालीन जिल्हाधिकारी जी श्रीकांत यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०१७ साली या संघातील मुलींना हॉकी स्टिक आणि अभ्यासासाठी वह्या देऊन या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर ही खेळाडूंना इतर क्रीडा साहित्य देत परिवाराने आपली सामाजिक बांधिलकी जपली. १३ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी या संघाला आपल्या कार्यालयात बोलावून खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि या संघाला विभागीय स्पर्धेत यशस्वी होण्याचे आवाहन केले. यावेळीही माझं लातूर परिवाराच्या वतीने संघातील सर्व खेळाडूंना अद्यावत आणि उच्च प्रतीच्या हॉकी स्टिक देण्यात आल्या होत्या. याप्रसंगी मुलींनी आम्ही खुप परिश्रम घेऊ आणि नक्की यश मिळवू असे आश्वासन पोलीस अधीक्षक मुंडे आणि माझं लातूर परिवाराला दिले होते. आज ते शब्द या मुलींनी खरे ठरवीत दैदिप्यमान यश मिळविले आहे.

ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द, कठीण सराव आणि कर्तुत्वाने मिळविलेले हे यश इतर खेळाडूंना प्रोत्साहन देत राहील. मात्र शासन स्तरावर अशा होतकरू खेळाडूंना मदतीची गरज आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शासनाचे क्रीडा, शिक्षण विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी योग्य दिशेने प्रयत्न केले तर राष्ट्रीय पातळीवर लातूरचा लौकीक वाढल्याशिवाय राहणार नाही हे मात्र निश्चित.

## ई-केवायसी न केल्यास आता रेशन होणार बंद

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि.१९ सप्टेंबर-**

देशातील नागरिकांसाठी केंद्र सरकार अनेक योजना राबवत आहे. देशातील अनेक लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. ज्यामध्ये बहुतांश गरीब गरजू लोकांचा समावेश आहे. राष्ट्रीय अन सुरक्षा योजनेअंतर्गत गरीब गरजू लोकांना अत्यंत कमी दरात रेशन मिळते. दरम्यान, आता केंद्र सरकारने शिधापत्रिका धारकांसाठी नवीन नियमावली लागू केली असून, शिधापत्रिकेची ई-केवायसी केली नाही, तर १ नोव्हेंबरपासून रेशन बंद होणार आहे.

कमी किमतीच्या रेशन योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे शिधापत्रिका असणे खूप आवश्यक आहे. आता सरकारने शिधापत्रिका धारकांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार १ नोव्हेंबरपासून रेशन बंद होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांनी ई- केवायसी करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती अन्न आणि सार्वजनिक मंत्रालयाने यापूर्वीच जारी केली होती.

मात्र अनेक शिधापत्रिकाधारकांची अवस्था अशीच आहे. ज्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यांचे रेशन १ नोव्हेंबरपासून बंद होणार आहे. विभागाने दिलेल्या माहितीनुसार ई-केवायसीसाठी ३१ ऑक्टोबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

शिधापत्रिकाधारकाने ३१ ऑक्टोबरपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्याला पुढचा महिना रेशन मिळणार नाही. अशा शिधापत्रिकाधारकांची नावेही शिधापत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. ई-केवायसी नसलेल्या शिधापत्रिका रद्द केल्या जातील. यानंतर या लोकांना सरकारच्या रेशन योजनेचा लाभ मिळणार नाही,

असे स्पष्ट सूचित करण्यात आले आहे. हयात नसलेल्यांची नावे वगळली जाणार रेशनकार्डवर बरीच नावे अशी आहेत, जे हयात नाहीत. त्यामुळे ती नावे वगळली जाणार आहेत. त्यामुळे आता सर्व शिधापत्रिकाधारक म्हणजेच कुटुंबाच्या शिधापत्रिकेत ज्यांची नावे नोंदलेली आहेत, या सर्वांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. त्यासाठी ते त्याच्या जवळच्या अन्न पुरवठा विभागाच्या कार्यालयात जाऊ शकतात. कोणत्याही सदस्याने ई-केवायसी न केल्यास त्याचे नाव शिधापत्रिकेतून काढून टाकले जाणार आहे.



## शास्त्री शाळेत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १९ सप्टेंबर-**

लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे यांच्या हस्ते प्रमुख ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे तर प्रमुख वक्ते म्हणून माधव अण्णाराव केंद्रे व प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य बालाजी चटलावार,अर्थ समिती अध्यक्ष गजानन जगळपूरे, मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे, सेवानिवृत्त शिक्षिका मदणे, उज्वला सुरनर, विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी उपस्थित होते. सर्व मान्यवर पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन श्याम गौंडगावे यांनी केले तर आभार सुरेखाबाई कुलकर्णी यांनी मानले.

## कर्मवीर भाऊराव पाटील भूषण पुरस्काराने कालिदास माने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १९ सप्टेंबर-**

लातूर येथील दयानंद सभागृहात मंगळवारी दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार-२०२४ सोहळ्यात सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष कालिदास माने यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. केवळ या ठिकाणी यांचाच सन्मान झाला असेनाही तर याप्रसंगी यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुरेखा माने आणि चिरंजीव मनोज माने यांनाही याप्रसंगी सन्मानित करण्यात आले

याप्रसंगी मंचावर खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे(दिल्ली), मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, प्रा. विठ्ठल कांगणे, हभप अनंत माने महाराज, जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, जिल्हाध्यक्ष अशोक देडे, शहराध्यक्ष महादेव डोंबे आदी उपस्थित होते.

### गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान




याप्रसंगी शैक्षणिक, राजकीय, उद्योग, सहकार, आरोग्य,क्रीडा, प्रशासन, आदि क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय सामाजिक क्षेत्रातील तसेच मॉर्निंग वॉक ग्रुप, संस्थाचालक संघटना, शिक्षक संघटना, साने गुरुजी शैक्षणिक संकुल, शिक्षक, मुख्याध्यापक आदी सर्वच क्षेत्रातून अभिनंदन करण्यात आले.तसेच या कार्यक्रमास शिरूर अनंतपाळ तालुक्यातील प्रतिनिधि उपस्थित होते यात ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव कदम, राजनारायण बिरादार, शंकर मिटकर, बाबूराव बोरोळे, शिवहार कोटे,राम बालवाड, नितेश झांबरे तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी केले तर आभार शहराध्यक्ष महादेव डोंबे यांनी मानले.

## लाडक्या बाप्पाला लातुरवासीयांनी दिला वाजत-गाजत निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १९ सप्टेंबर-**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील गंजगोलाई या ठिकाणी विलासराव देशमुख युवा मंचकडून उभारण्यात आलेल्या श्री विसर्जन मिरवणूक स्वागत मंडपास भेट दिली. यावेळी शहरातील विविध भागातून विसर्जनास जाणाऱ्या गणेश मंडळाच्या मिरवणुकांचे स्वागत केले व सर्व गणेश मंडळ पदाधिकारी, गणेश भक्तांना अनंत चतुर्दशींच्या शुभेच्छा दिल्या.दहा दिवसांच्या मुक्कामानंतर मंगळवारी लातूरच्या गणेश भक्तांनी वाजतगाजत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. या निमित्ताने लातूर शहरातील विसर्जन मार्गावर विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षाच्या वतीने गणेश मंडळाच्या मिरवणुकांचे स्वागत करून गणेश भक्तांचा उत्साह वाढविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, गंजगोलाई, सुभाष चौक यांसह अनेक ठिकाणी श्री विसर्जन मिरवणूक स्वागत मंडप उभारण्यात आले होते.



माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्याकडून विश्व भारती गणेश मंडळ अध्यक्ष सुरज राजे यांच्यासह संजय काथवटे अन्य मंडळ पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.तसेच गणेश मंडळाकडून साकारण्यात आलेले देखावे, नृत्य सादरीकरनाचा आनंद घेतला. दरम्यान शहरातील सुभाष चौक भागातील सार्वजनिक उत्सव समिती स्वागत मंडप व सुभाषचंद्र बोस मित्र मंडळ स्वागत मंडपास भेट देऊन गणेश मंडळाचे स्वागत केले. मंडळ पदाधिकारी,सदस्यांचा उत्साह वाढविला व सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, रवींद्र काळे, ॲड. दीपक सूळ, प्रा. प्रवीण कांबळे, सुपर्ण जगताप, व्यंकटेश पुरी, नागसेन कामेगावकर, संतोष देशमुख, सचिन बंडापल्ले, विजयकुमार साबदे, महेश काळे, यशपाल कांबळे, मोहन सुरवसे,तबरेज तांबोळी, प्रवीण सूर्यवंशी, पंडित कावळे, इम्रान सय्यद, विकास कांबळे, विजय टाकेकर, करीम तांबोळी, सुलेखा कारेपूरकर, अभिजित इगे, पिराजी साठे उपस्थित होते.